• पुणे, रविवार, २० ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 309 • वर्ष ३ रे, अंक ३०९ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



पंडित श्री वसंतराव गाडगीळ
**चालते बोलते 'ज्ञानपीठ'**
P3



न्यूझीलंडला १०७ धावांचे लक्ष्य
**टीम इंडियाने गटांगळ्या खाल्ल्या; ५४ धावांत ७ विकेट्स**
P12

## दहा लाख महिला हप्त्यापासून राहणार वंचित

# लाडक्या बहिणीला आचारसंहितेची नजर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आगामी विधानसभा निवडणुकीमुळं राज्यात लागलेल्या आचारसंहितेचा फटका महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेला बसला आहे. लाडकी बहीण योजनेचे हप्ते तूर्त थांबवण्याचा निर्णय महिला व बालकल्याण खात्याने घेतला आहे. त्यामुळे १० लाख महिला नोव्हेंबर महिन्याच्या हफ्त्यापासून वंचित राहणार आहेत.

मतदारांवर थेट प्रभाव टाकणाऱ्या आर्थिक लाभाच्या योजना ताबडतोब थांबवल्या जाव्यात, अशा सूचना मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या आहेत. या आदेशानंतर अशा योजनांचा नव्यानं आढावा घेण्यात आला. महिला व बालकल्याण विभागाची 'लाडकी बहीण' योजना मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या योजनांमध्ये मोडत असल्याचं निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आलं. मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी राज्य सरकारच्या सर्व विभागांकडून याबाबतचा तपशील मागवला. मात्र, महिला व बालकल्याण विभागानं या योजनेतून निधी वितरण चार दिवसांपूर्वी थांबवल्याची माहिती आयोगाला दिली आहे. लाडक्या बहिणींना मिळणारे हप्ते तूर्त थांबवण्यात आले असले तरी २ कोटी ३४ लाख महिलांच्या बँक खात्यावर नोव्हेंबर महिन्याचा हफ्ता आधीच जमा झाला आहे. आचारसंहितेच्या आधीच पुढील महिन्याचा हप्ता मिळेल याची काळजी सरकारनं घेतली होती. त्यामुळं ऑक्टोबर महिन्यातच दोन हप्ते महिलांना मिळाले आहेत. तर, काही महिलांच्या खात्यावर चार ते पाच महिन्यांचे पैसे एकाचवेळी जमा झाले आहेत. वेळेअभावी केवळ १० लाख महिलांच्या खात्यावर पैसे जमा झालेले नाहीत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.







## At a Glance

### पंतप्रधान निवासस्थानी ड्रोन हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**तेल अवीवः :** हिजबुल्लाह'ने शनिवारी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या खासगी घरावर ड्रोन हल्ला केला. पंतप्रधान कार्यालयाने हा हल्ला लेबनॉनमधून झाल्याचे म्हटले आहे. हल्ल्याच्या वेळी नेतन्याहू आणि त्यांची पत्नी सारा घरी नव्हते. सध्या या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. इस्त्रायली संरक्षण दलाने (आयडीएफ) सांगितले, की लेबनॉनमधून शनिवारी इस्रायलवर तीन ड्रोन उडवण्यात आले. यापैकी एक सीझरिया शहरातील इमारतीवर पडले. लेबनॉनमधून आणखी दोन ड्रोन सोडले गेले. त्यामुळे गिलोट लष्करी तळावर अलार्म वाजू लागला. 'आयडीएफ'ने कबूल केले, की त्यांची हवाई संरक्षण यंत्रणा हल्ला रोखण्यात हे हल्ले अयशस्वी ठरली. ड्रोन कसा घुसला, याचा तपास करत असल्याचे त्यांनी सांगितले.

### बाँबच्या धमकीने विमान उतरवले




**जयपूर :** जयपूर आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहाटे १.२० वाजता एअर इंडिया एक्सप्रेसच्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. शुक्रवारी विमानाने दुबईहून जयपूरला उड्डाण केले होते. प्रवासादरम्यानच विमानात बॉम्ब असल्याची माहिती मिळाली. यानंतर » पान ४ वर

### दोन दहशतवाद्यांना काश्मीरमध्ये अटक

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील पूंछमध्ये शनिवारी सकाळी सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ३ ग्रेनेड आणि १ पिस्तूलही जप्त करण्यात आले आहे. हे दोघेही जम्मू-काश्मीर गझनवी फोर्स नावाच्या संघटनेशी संबंधित हायब्रीड अतिरेकी असल्याचे » पान ४ वर

## बँक कर्मचाऱ्यांना लागली लॉटरी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** आता देशातील सरकारी आणि खाजगी बँकांमध्ये पाच कामकाजाचे दिवस सुरू होण्याची अपेक्षा आहे. ही खुशखबर डिसेंबरमध्ये बँक कर्मचा-यांना मिळू शकते. बँक कर्मचारी अनेक दिवसांपासून सरकारकडे आठवड्यात पाच दिवस कामाची मागणी करत होते. ज्यावर सरकारने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र या वर्षअखेरीस सरकार प्रलंबित मागण्या मान्य करू शकते, असे समजते. सध्या बँक कर्मचा-यांना महिन्याच्या दुस-या आणि चौथ्या शनिवारी सुटी मिळते तर पहिल्या, तिस-या आणि पाचव्या शनिवारी कामकाज करावे लागते. याबाबत कर्मचारी संघटना आणि बँक संघटना यांच्यात अनेक दिवसांपासून वाद सुरू आहे. आठवड्यातून पाच तर महिन्यात १५ दिवस कामाची मागणी सरकारने मंजूर केल्यास बँक कर्मचा-यांच्या कामाच्या वेळाही बदलतील. अहवालानुसार, पाच दिवसांच्या कामात तास सुमारे ४० मिनिटांनी » पान ४ वर

# जागावाटपाचा तिढा सुटला!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र विधानसभेचा जागावाटपाचा तिढा सोडवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित पवार हे दिल्लीमध्ये गेले होते. या तिन्ही नेत्यांची अमित शाहा यांच्यासोबत रात्री उशिरा एक बैठक पार पडली. या बैठकीत महायुतीतील जागावाटपावर चर्चा झाली. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ७० आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला ६० जागा मिळणार असल्याची माहिती आहे. भाजपाच्या कोट्यातूनच मित्रपक्षांना जागा दिल्या जाणार आहेत. पुढील २४ तासात जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर होण्याची शक्यता आहे.

ज्या जागांवर वाद चालू होता, तो सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामध्ये महायुतीला ब-यापैकी यश आल्याचे म्हटले जात आहे. अमित



**महायुतीचे ठरले!**

शाह यांच्या निवासस्थानी पार पडलेली ही बैठक एकूण अडीच तास चालली. जागावाटपाचा तिढा अमित शाह यांच्या समक्ष सोडवण्यात आला असून आता फक्त काहीच जागांचा प्रश्न असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

महायुतीचे भाजपा, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट) हे तिन्ही पक्ष जास्तीत जास्त जागा मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार भाजपाला कमीत कमी १५० जागा हव्या आहेत. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची ९० जागांची मागणी होती. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला कमीत कमी ६० जागा हव्या आहेत. असे असताना जागावाटपाची ही चर्चा सध्या अंतिम टप्प्यात आहे.

त्यामुळे कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.असे असले तरी, महायुतीत एकीकडे जागावाटपावर चर्चा चालू आहे. मात्र दुसरीकडे महायुतीतील तिन्ही पक्षांपुढे अंतर्गत बंडखोरी रोखण्याचे मोठे आव्हान असणार आहे. ब-याच मतदारसंघांसाठी महायुतीत एकापेक्षा जास्त नेते इच्छुक आहे. या नेत्यांची त्या-त्या मतदारसंघांत तयारीदेखील चालू आहे. त्यामुळे एका पक्षाला जागा सुटल्यास दुस-या पक्षातील नेत बंड करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी स्थिती निर्माण झाल्यास बंड शांत करण्याचे आव्हान महायुतीच्या तिन्ही प्रमुख नेत्यांपुढे असणार आहे.

### झारखंडमध्ये 'इंडिया' आघाडीचे जागावाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांची :** झारखंडमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटपावर 'इंडिया' आघाडीच्या पक्षांमध्ये एकमत झाले आहे. या संदर्भात शनिवारी दुपारी रांचीमध्ये आघाडीच्या पक्षांची बैठक झाली. बैठकीनंतर मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी जागावाटपाबाबत माहिती दिली. ते म्हणाले, की राज्यातील ८१ विधानसभा जागांपैकी ७० जागा काँग्रेस आणि झारखंड मुक्ती मोर्चामध्ये विभागल्या जातील, तर उर्वरित ११ जागा इतर मित्रपक्षांसाठी सोडल्या जातील.पत्रकार परिषदेत त्यांनी असेही सांगितले, की या विधानसभा निवडणुकीत डावे पक्षही 'इंडिया' आघाडीच्या बॅनरखाली लढतील. याचा अर्थ असा की ७० जागांनंतर बाकीच्या ११ जागांवर डावे आणि राष्ट्रीय जनता दलासारखे इतर सहयोगी आपले उमेदवार उभे करतील; » पान ४ वर

# कांग्रेसमध्ये अंतर्गत वाद वाढण्याची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी निवडणुकीत काँग्रेस पक्षाला तीन विधानसभा मतदारसंघात जागा मिळणार आहे. या मध्ये कसबा, पुणे कॅन्टोन्मेंट व शिवाजी नगर फिक्स आहेत. मात्र या मतदार संघात जाहीर नावांच्या व्यतिरिक्त इच्छुक ही जास्त आहेत. त्यामुळे कांग्रेस मधील अंतर्गत वाद वाढले आहेत.

धंगेकर पॅटर्नमुळे पोटनिवडणुकीच्या निमित्ताने लक्षवेधी ठरलेला कसबा यावेळी काँग्रेस पक्षासाठी डोकेदुखी ठरणार आहे. कसबा विधानसभा मतदारसंघातून पुन्हा एकदा रवींद्र धंगेकरांनाच उमेदवारी मिळणार हे जवळजवळ निश्चित आहे. काँग्रेस पक्षातील इतर इच्छुकांकडून मात्र उघड उघड नाराजी व्यक्त होत आहे.

काँग्रेस पक्ष सामान्य कार्यकर्त्यांना कधी न्याय देणार असा सवाल माजी नगरसेविका संगीता तिवारी यांनी उपस्थित केलाय. तर यावेळी काही झालं तरी निवडणूक लढवणारच अशी भूमिका माजी महापौर कमल व्यवहारे यांनी घेतली आहे. शहर काँग्रेसमधील दोन महिला पदाधिकाऱ्यांनी विरोधी सूर आळवल्यामुळे विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर यांचं टेन्शन वाढण्याची शक्यता आहे.

तर कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसमध्ये उमेदवारीवरून रस्सीखेच सुरू आहे. माजी आमदार रमेश बागवे उमेदवारीसाठी आग्रही आहेत. तर पक्षात नव्याने पक्षात आलेले अविनाश साळवी हे ही कॅन्टोन्मेंट मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. त्यामुळे या मतदारसंघामध्ये काँग्रेस नेमकं कोणाला » पान ४ वर

### राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी विजया रहाटकर


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी विजया किशोर रहाटकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर डॉ. अर्चना मजुमदार यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या नवीन सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भारत सरकारच्या महिला आणि बाल विकास मंत्रालयाने यासंदर्भात आदेश जारी केला आहे. विजया रहाटकर यांनी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणूनही जबाबदारी पार पडली आहे. राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या त्या पहिल्या मराठी व्यक्ती ठरल्या आहेत. त्यांना केंद्रीय राज्यमंत्री पदाचा दर्जा असेल. महिलांच्या उन्नतीसाठी घटनात्मक » पान ४ वर

## निधी अभावी तब्बल २०० कोटींच्या निविदांना स्थगिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** कोणत्या भागात कोणती कामे करायची याच्या यादीसह निधीची मागणी महापालिकेने केली होती. त्यानुसार शासनाकडूनही सीमा भिंतींचा स्पष्ट उल्लेख करून, त्यासमोर खर्चाची तरतूद केली. मात्र, शहरात आठ विधानसभा मतदारसंघांत नाले असताना महापालिकेने केवळ पाचच मतदारसंघात हा निधी वितरीत करून त्यानुसार निविदा काढल्या होत्या. त्यामुळे महापालिकेवर टिकाही केली जात होती.

त्यामुळे, निविदा मान्यतेसाठी आल्यानंतर प्रशासनाने अचानक शासनाचा निधी आलेला नसल्याचे कारण देत या निविदा थांबविल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पावसाळ्यात नाल्यांना येणाऱ्या पुरामुळे रहिवासी भागात पूरस्थिती उद्भवते. ती रोखण्यासाठी शासनाने महापालिकेस तब्बल २०० कोटींचा निधी मंजूर केला आहे. त्यातून भारतीय जनता पक्षाच्या शहरातील » पान ४ वर

**कितीची निविदा**

- खडकवासला – ४१.२३ कोटी रुपये
- शिवाजीनगर – २४.८० कोटी रुपये
- कॅन्टोन्मेंट – ३९.०४ कोटी रुपये
- पर्वती – ४१.१५ कोटी रुपये
- कोथरूड – १९.९० कोटी रुपये

### कार उलटून एक ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भरधाव वेगातील कार उलटून झालेल्या अपघातात एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी पुणे-नगर रस्त्यावर घडली आहे. या घटनेत अन्य एक तरुण जखमी झाला असून, त्याच्यावर भरधाव मोटार चालवून अपघातास जबाबदार ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनुपम महेश असेरकर (वय २३, रा. विजयविहार हाऊसिंग सोसायटी,नगर रस्त वाघोली) असे ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे. अपघातात कारचालक देव पटनाईक (वय २३, रा. वाघोली पुणे) हा जखमी झाला. अपघातास जबाबदार ठरल्याप्रकरणी देव याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## अंतर्गत प्रवेश प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार?

# तीन मेडिकल कॉलेज चौकशीच्या भोवऱ्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खासगी अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयामार्फत प्रवेश निश्चित करताना विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य पद्धतीने डेव्हलपमेंट फी घेणे, यासह इन्स्टिट्यूशनल कोटा अंतर्गत प्रवेश प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारीची चौकशी करण्याचे आदेश वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष कार्यालयाने दिले आहेत.याबाबतचा अहवाल येत्या आठ दिवसांत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यानुसार राज्यातील एकूण नऊ वैद्यकीय महाविद्यालयांची चौकशी होणार आहे. यामध्ये पुण्यातील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेजसह तीन महाविद्यालयांचा समावेश आहे.



राज्य सीईटी सेलमार्फत राज्यातील विविध सरकारी आणि खासगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये एमबीबीएस,बीडीएस अशा पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. खासगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सुमारे 15 टक्के जागा या इन्स्टिट्यूशनल कोट्यातून प्रवेशासाठी » पान ४ वर

" आम्ही तक्रार केलेल्या खासगी वैद्यकीय महाविद्यालयांची दोन सदस्यीय समितीकडून चौकशी करण्याचे आदेश दिले असून, त्याचा अहवाल आठ दिवसांत सादर करण्याचे आदेश दिले आहे. या संपूर्ण प्रकाराच्या तळाशी जाऊन मुजोर महाविद्यालयांवर कारवाई होईपर्यंत; तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे परत मिळेपर्यंत हा लढा सुरूच ठेवण्यात येईल.

**– कल्पेश यादव, सहसचिव, युवासेना**

**या महाविद्यालयांची चौकशी होणार**

- भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज ,माईर्स मेडिकल कॉलेज तळेगाव-दाभाडे, पुणे , अश्विनी मेडिकल कॉलेज, सोलापूर , एमआयएमएसआर मेडिकल कॉलेज, लातूर,तेरणा मेडिकल कॉलेज नवी मुंबई,वेदांता मेडिकल कॉलेज, पालघर डॉ.एन.वाय.तासगावकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, कर्जत, प्रकाश इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च इस्लामपूर, सांगली

## दिवाळी २०२४ विशेष रेडियन्स् प्रदर्शनाचे उदघाटन

# पन्नास टक्के महिला २०३० पर्यंत होणार उद्योजक : डॉ.नीलम गोऱ्हे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महिला कायमच विविध उपक्रम राबवित असतात त्यांनी बनविलेल्या उत्पादनांचा दर्जा अभिमान वाटावा अशा प्रकारचा आहे. समाजाचा आणि सरकारचा महिला उद्योजकांवरील विश्वास वाढताना दिसत आहे आगामी काळात तो आणखीन दृढ होत जाणार असून २०३० पर्यंत पन्नास टक्के महिला उद्योग क्षेत्रात कार्यरत असतील असा विश्वास शिवसेना नेत्या तथा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

महिला उद्योजकांना प्रोत्साहन व त्यांच्या उज्वल भविष्याला दिशा मिळावी या हेतूने रीझारी प्रस्तुत दिवाळी २०२४ विशेष रेडियन्स् प्रदर्शनाचे आयोजन शुभारंभ लॉन्स् डीपी रोड, पुणे येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उदघाटन शनिवार दि. १९ ऑक्टोबर रोजी शिवसेना नेत्या तथा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आले.



> महिला उद्योजकांनी बनविलेल्या उत्पादनांकरिता बाजारपेठ मिळण्यासाठी असे उपक्रम अतिशय महत्वाचे आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये महिलांनी बचत गट व इतर माध्यमातून जे उद्योग उभारले आहेत त्याच्यामध्ये बँकांच्या परतफेडीची जे प्रमाण आहे ते ९९% टक्के आहे. तसेच महिला उद्योजक सतत नाविन्यपूर्ण प्रयोग करताना दिसतात. त्यामुळे महिला उद्योजक निश्चितपणे कौतुकास पात्र आहे. या उपक्रमाचे आयोजन करणाऱ्या स्वाती देवळे या कार्पोरेट क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत असून देखील त्यांनी महिला उद्योजकांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी 'रेडियन्स्' प्रदर्शनाचे आयोजन करून स्तुत्य उपक्रम राबविला आहे."
>
> **— डॉ. नीलम गोऱ्हे** शिवसेना नेत्या तथा उपसभापती

याप्रसंगी, आकार चॅरिटेबल ट्रस्ट च्या अध्यक्षा स्वाती देवळे, सिद्धेश्वर मारटकर गुरुजी, भोसले ग्रुपचे अध्यक्ष किसन भोसले, उद्योजक पोपट खरमाटे, आदी मान्यवर उपस्थित होते.

समाजात अशा प्रकारच्या प्रदर्शनाच्या माध्यमातून महिलांना प्रोत्साहन मिळते.

# बायोटेक्नोलॉजीमध्ये उज्ज्वल भविष्य : तज्ज्ञांचा सल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रेडिओलॉजी क्षेत्र आरोग्य सेवेच्या जगात सर्वात विकसित क्षेत्रांपैकी एक मानले जाते. वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध असून भविष्यात रोजगारामध्ये झापाट्याने वाढ होण्याची अपेक्षा आहे. पॅरामेडिकल आणि बायोटेक्नोलॉजी क्षेत्रातील ज्ञान केवळ समृद्ध करत नाही, तर आरोग्य आणि विज्ञान क्षेत्रातील संभाव्य करिअरच्या मार्गाचा शोध घेण्यासाठी त्यांना प्रेरणाही देत.' असे मत जैवतंज्ञज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले.

अलार्ड स्कूल ऑफ हेल्थ अँड बायोसायन्सच्या वतीने अलार्ड विद्यापीठातील या कार्यशाळेत 'पॅरामेडिकल सायन्स आणि बायोटेक्नॉलॉजीमधील संधी आणि अलीकडील ट्रेंड' या विषयी सहभागींनी मते मांडली.

कार्यशाळेत जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. अभिजीत, संजी सिंग व प्रमोद आदी वक्ते सहभागी झाले होते. यावेळी अलार्ड विद्यापीठाचे संस्थापक आणि कुलपति डॉ. एल.आर. यादव, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पूनम कश्यप आणि शाळेचे डीन डॉ. अजय कुमार जैन उपस्थित होते. वक्त्यांनी रूग्णालये, संशोधन आणि विकास, कॉर्पोरेट कंपन्या अशा विविध क्षेत्रात पॅरामेडिकल क्षेत्रात उपलब्ध विविध संधींवर चर्चा केली.



## » Selected

### जेईई मुख्य परीक्षेत आता पर्याय बंद

**पुणे :** जेईई मुख्य परीक्षेच्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीने संयुक्त प्रवेश परीक्षेच्या पॅटर्नमध्ये मोठा बदल केला आहे. यानुसार आता पेपरच्या सेक्शन बीमध्ये फक्त पाच प्रश्न दिले जाणार आहेत. उमेदवारांना हे सर्व प्रश्न सोडवावे लागतील. यापूर्वी पेपरच्या विभाग बी मध्ये १० प्रश्न दिले जात होते. त्यात ५ प्रश्न सोडवावे लागत होते, मात्र आता हा पर्याय बंद करण्यात आला आहे. एनटीएने अधिकृत वेबसाईटवर जारी केलेल्या अधिसूचनेत ही माहिती दिली आहे. एजन्सीने पुढे सांगितले आहे की, 'कोविड काळात प्रश्नांचे पर्यायी स्वरूप बंद करण्याचा निर्णय घेतला होता. या अंतर्गत विभाग बीमध्ये प्रत्येक विषयासाठी फक्त ५ प्रश्न असतील आणि उमेदवारांना पाचही प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. जेईई मेनसाठी जारी केलेल्या माहिती बुलेटिनमध्ये त्याचे तपशील दिले जातील, जे उमेदवारांना परीक्षेची पद्धत समजून घेण्यास मदत करेल.'

### थंडीचे आगमन किंचित लांबणार

**पुणे :** यंदा दिवाळीपर्यंत म्हणजे ३१ ऑक्टोबरपर्यंत पाऊस सुरू राहील. त्यामुळे थंडीचे आगमन किंचित लाबणार असून नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून थंडी पडेल, असा अंदाज पुणे हवामान शास्त्रज्ञांनी वर्तविला आहे. यंदा मोठा पाऊस २६ सप्टेंबरपासून पूर्ण थांबला आणि लगेच कडक उन्हाचे चटके जाणवू लागले. राज्यात सर्वत्र चांगला पाऊस झाल्याने जमीन अजूनही खूप ओली आहे. तसेच बंगालच्या उपसागरासह अरबी समुद्रात निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यांमुळे राज्यात सतत बाष्पयुक्त वारे येत आहेत. त्यामुळे जमिनीसह वातावरणातील बाष्पापासून दिवसाच्या कडक उन्हामुळे ढगांची निर्मिती वेगाने होत आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी धो धो पाऊस पडत आहे. शास्त्रज्ञांच्या मते, हा स्थानिक परिणाम असून त्या त्या गावातील बाष्पाच्या प्रमाणानुसार हा पाऊस कमी किंवा जास्त पडतो आहे. परतीचा मान्सून राज्यातूनच नव्हे, तर देशातून १५ ऑक्टोबर रोजीच गेला. मग हा अवकाळी पाऊस का पडतोय, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. त्याचे कारण हवामान शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे. शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, सध्या ऑक्टोबर हीटचा चटका आहेच.

### ग्रंथालयामध्ये आगीने पुस्तकांचे मोठे नुकसान; वाचकांकडून हळहळ व्यक्त



**नवी पेठ :** पुण्यामध्ये आगीच्या घटना वाढल्या आहेत. शहरातील मध्यवर्ती भागामध्ये असलेल्या ग्रंथालयाला आग लागली असून यामध्ये पुस्तकांचे मोठे नुकसान झाले आहे. ग्रंथालयातील पुस्तके आगीमध्ये खाक झाली असून यामुळे वाचकांनी हळहळ व्यक्त केली आहे. पुण्यातील नवी पेठेमध्ये गांजवे चौकाजवळ ही आग लागली आहे. या परिसरामध्ये अनेक स्पर्धा परिक्षांचे विद्यार्थी वाचन आणि अभ्यास करत असतात. यातील 'ध्रुवतारा' अभ्यासिकेला आग लागली. तिसऱ्या मजल्यावर असलेल्या या ग्रंथालयाला आग लागली. घटनेची माहिती कळताच अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाकडून चार वाहने आणि दोन वॉटर टँकर दाखल झाले आहेत. अग्निशमन दलाकडून अर्धा तासामध्ये आगीवर नियंत्रण आणण्यात आली. या आगीमध्ये पुस्तक, कपाट आणि ग्रंथालयातील कॉम्पुटर यांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. ग्रंथालयामध्ये काल रात्रीच पेस्ट कंट्रोल करण्यात आले होते. परंतु, ग्रंथालयामध्ये आग नेमकी का लागली याचे स्पष्ट कारण समोर आलेली नाही.

### आचारसंहितेत 'नो' निर्णय

**पुणे :** सद्यस्थितीत राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने या कालावधीत एखाद्या प्रस्तावास मान्यता देणे व कार्यवाही करण्याबाबत प्रशासकीय विभाग आग्रही असल्यास अशा प्रस्तावांवर केंद्रीय निवडणूक आयोगाकडून निर्णय घेतले जाणार आहे. असे प्रस्ताव पाठविण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दोन सदस्यांची समिती स्थापन केली असून, त्यामार्फत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविले जातील. आयोगाच्या या आदेशामुळे राज्य शासनाला आता कोणताही थेट निर्णय घेता येणार नाही. राज्य शासनाच्या एखाद्या विभागाच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी आदर्श आचारसंहितेच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन ही समिती प्रस्तावांची छाननी करेल. त्यावर शिफारशींसह मुख्य निवडणुक अधिकाऱ्यांना पाठविण्यात येईल. छाननी समितीने शिफारस केलेले प्रस्ताव मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या अभिप्रायासह केंद्रीय निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात येतील. सर्व विभागांनी कोणतेही प्रस्ताव थेट केंद्रीय निवडणूक आयोगाकडे पाठवू नयेत, अशा सूचना मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून दिल्या आहेत.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

# यूजीसी नेट परीक्षेचा निकाल जाहीर

### ५३ हजार ६९४ उमेदवार पात्र

**अधिकृत संकेतस्थळावर उमेदवारांना निकाल उपलब्ध**

**पुणे :** देशातील विद्यापीठ व महाविद्यालयात सहायक प्राध्यापक पदासाठी अनिवार्य असलेल्या यूजीसी नेट परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. एकूण ५३ हजार ६९४ उमेदवार सहायक प्राध्यापक पदासाठी पात्र ठरले असल्याचे निकालावरून स्पष्ट होत आहे. नेटची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या संशयावरुन पुन्हा एकदा ही परीक्षा घेण्यात आली होती. रद्द झालेली परीक्षा १८ जून रोजी देशातील विविध शहरांमध्ये १२०० पेक्षा जास्त केंद्रावर दोन टप्प्यांत घेण्यात आली होती. महत्त्वाचे म्हणजे ९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. या परीक्षेचा निकालासाठी लाखो उमेदवार प्रतिक्षेत होते. मात्र नॅशनल टेस्टिंग एजन्सीने नेट परीक्षेचा निकाल जाहीर करीत विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे.

**नेट परीक्षेच्या उत्तीर्ण उमेदवारांपैकी पात्र उमेदवार**

| परिक्षा | उमेदवार |
|---|---|
| ज्युनिअर रिसर्च फेलोशिप | ४ हजार ९७० |
| पीएचडी प्रवेश | १ लाख १२ हजार ७० |
| सहाय्यक प्राध्यापक पद | ५३ हजार ६९४ |
| **एकूण** | **६ लाख ८४ हजार २४४** |

या आधीची यूजीसी नेट परीक्षा २१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२४ या कालावधीत घेण्यात आली होती. ही परीक्षा दोन सत्रात घेण्यात आली. दरम्यान, याआधी घेण्यात आलेल्या परीक्षेचा पेपर लिक झाल्याच्या संशयामुळे ही परीक्षा रद्द करण्यात आली होती. नवीन परीक्षा केवळ ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आली. दरम्यान, नेट परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी सर्वसाधारण श्रेणीतील उमेदवारांना किमान ४० टक्के गुण, तर एससी, एसटी आणि ओबीसी यासारख्या राखीव श्रेणीतील विद्यार्थ्यांना ३५ टक्के गुण निश्चित करण्यात आले आहे.

# सजली बाजारपेठ

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** दिवाळीनिमित्त पुण्यातील बाजारपेठ सजली आहे. बाजारपेठेत विविध प्रकारचे आकाशकंदील आणि इलेक्ट्रिक माळा विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. यामध्ये देवी - देवतांचे फोटो असलेले आकाशकंदील लक्षवेधी ठरत आहेत.

## पुणेकरांना अनुभवता येणार फ्रान्सच्या संस्कृतीचे दर्शन

# हडपसरमध्ये 'रोझेओ' चित्तथरारक एअर शो

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दी फ्रेंच इन्स्टीट्यूट ऑफ इंडिया, अलायन्स फ्राँसेज नेटवर्कच्या साथीने पुणेकरांसाठी एक चित्तथरारक अनुभव देणारा 'rozeo' (रोझेओ) हवाई शो घेवून आले आहे. विशेष म्हणजे फ्रेंच संस्कृतीची झलक दाखविणाऱ्या या हवाई शो ने नुकतेच पॅरिस येथे झालेल्या ऑलिंपिक २०२४ स्पर्धेच्या उद्‌घाटन सोहळ्यात आपल्या सादरीकरणाने चार चांद लावले आहेत. ग्रात सिएल या फ्रेंच कंपनी तर्फे सादर होणारा `रोझेओ हा एअर शो आज २० ऑक्टोबर २०२४ रोजी अमनोरा मॉल, मगरपट्टा, हडपसर येथे संध्याकाळी ५.३० वा. सादर केला जाणार आहे. सर्व प्रेक्षकांसाठी हा शो विनामूल्य असणार आहे, अशी माहिती संयोजिका स्टेफान जेरार्ड आणि अलयांस फ्राँसेज पुणेच्या संचालिका आमेली विजल यांनी दिली.

**वैशिष्ट्य**

- किमान ६ मीटर उंचीच्या धातूच्या खांबांवर हलक्या हाताने डोलणाऱ्या आकृत्या, कॅमर्ग्यूच्या रीडबेडवर जागृत केल्या जातात. संगीताच्या लयबद्ध तालीवर इलेक्ट्रॉनिक्स आणि फिल्ड रेकॉर्डिंग व साऊंडस्केपसह ४२ मिनिटांची ही सुंदर प्रस्तुती प्रेक्षकांमध्ये एक चिंतनशील वातावरणाची निर्मिती करते.

**अविस्मरणीय अनुभव**

> 'रोझेओ' आणि इतर रोमांचक विविध सांस्कृतिक प्रस्तुतींसह अलायन्स फ्रँन्सासेस नेटवर्क भारत आणि फ्रान्स या दोन देशांमधील कलात्मक देवाणघेवाण आणखी मजबूत करीत आहे. ही नाविन्यपूर्ण निर्मिती आमच्या कलात्मक समुदायांना जोडणारे एक बंधन म्हणून काम करेल."
>
> **— आमेली विजल**

## राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याहस्ते होणार उद्‌घाटन

# आठवे आंतरराष्ट्रीय डेअरी व फिड एक्स्पो

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डेअरी, पोल्ट्री, मत्स्यपालन, पशुखाद्य व्यावसायिक आणि शेतकऱ्यांसाठी आयोजित आठवे आंतरराष्ट्रीय डेअरी व फिड प्रदर्शन दि. २४ ते २६ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत आटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटर, पिंपरी पुणे येथे होणार आहे. येत्या गुरुवारी (दि. २४) सकाळी १०.३० वाजता केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते या एक्स्पोचे उद्‌घाटन होणार आहे. गोकुळ दुध संघांचे चेअरमन अरुण डोंगळे, संचालक डॉ. चेतन नरके, चितळे बंधू मिठाईवालेचे इंद्रनील चितळे यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे. तेव्हा डेअरी व पशुखाद्य निर्मिती व्यावसायिकांनी, युवक, युवतींनी या संधीचा लाभ घेत प्रदर्शनाला भेट देऊन आपला व्यवसाय अत्याधुनिक व वृद्धिंगत करावा, अशी माहिती संयोजक, बेनिसन मीडियाच्या प्राची अरोरा व सहयोगी आनंद गोरड यांनी पत्रकार परिषदेत दिली.



> या डेअरी व फिड प्रदर्शनात अभ्यासपूर्ण सेमिनार्स, वर्कशॉप्स, चर्चासत्रांसह गोठा व्यवसाय, जनावरांचे आरोग्य व आहार व्यवस्थापन, क्लीन मिल्क प्रोडक्शन, लॅबोरेटरी सेटअप, लॅब तपासणीच्या पद्धती, डेअरी प्लांट मशीनरी, दूध प्रक्रिया व दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचे आधुनिक तंत्रज्ञान, आईस्क्रीम व मिठाई उत्पादन, पॅकेजिंग व साठवणूक तंत्रज्ञान, डेअरी प्रॉडक्ट्स निर्यातीमधील संधी, डेअरी व्यवसाया व आयातनिर्यात, पशुखाद्य निर्मिती तंत्रज्ञान, मशीनरी सेट-अप, कच्च्या मालाची निवड व फॉर्मुलेशन, पोल्ट्री, मत्स्य व पशुखाद्य मार्केटची स्थिती अशा डेअरी व पशुखाद्य निर्मिती उद्योगासंबंधीच्या देशविदेशामधील सुमारे १०० कंपन्यांच्या मशिनरींची प्रात्यक्षिके पाहता येतील.
>
> **-प्राची अरोरा**

> गावी दूध संकलन करणारे उद्योजक दुग्धजन्य पदार्थांची वाहतूक, वितरण, विक्री यासारखे व्यवसाय करीत आहेत. यामुळेच अत्याधुनिक तंत्रज्ञान शिकून घेण्यासाठी, डेअरी व पशुखाद्य प्रदर्शनांना ग्रामीण युवकांचा मिळणारा प्रतिसाद वाढतच असून प्रदर्शनांमधील प्रत्यक्षिके पाहून व विविध वर्कशॉप, सेमिनार्स, चर्चासत्रे यांमध्ये ग्रामीण युवक, युवती फार मोठ्या संख्येमध्ये सहभाग घेत आहेत. प्रकल्पामधील शिल्लक उत्पादन क्षमतेच्या संधी मिळण्यासाठी, उत्पादित मालाला स्थानिक, राष्ट्रीय व तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठ कशी मिळवता येईल यासंबंधीची माहिती या प्रदर्शनांमध्ये देण्यात येणार आहे.
>
> **-आनंद गोरड**


# नवीन वर्षात शाळेच्या सुट्ट्या होणार कमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वर्षभरात अभ्यासक्रमाचा कार्यभार प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक लागू करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार वर्षभरातील राष्ट्रीय-राज्य सुट्ट्या, सत्र सुट्टी, अन्य सुट्ट्या विचारात घेतल्यानंतर २३४ दिवस कामकाज अपेक्षित असल्याने शाळांचा एकूण कामकाजाचा वेळ वाढणार. कामकाज पुर्ततेसाठी वसुट्या कमी करण्याची शक्यता आहे. त्याबाबतचे संकेत राज्य अभ्यासक्रम आराखड्यात दिले आहेत. सध्या पूर्ण वेळ शाळा सहा ते साडेसहा तास भरतात, तर अध्यापनासाठी चार ते साडेचार तास असतात. इमारत अपुरी किंवा विद्यार्थिसंख्या जास्त असल्यामुळे अनेक शाळा दोन सत्रांत चालवाव्या लागतात. या शाळांना उपलब्ध वेळेचा विचार करावा लागेल. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार शाळांना आवश्यक कामकाज कालावधी, राष्ट्रीय श्रेयांक आराखड्यानुसार निश्चित केलेली श्रेयांक पातळी पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा अध्ययन कालावधी उपलब्ध करून देणे आवश्यक असेल.

## फटाका स्टॉलमध्ये महापालिकेला 'आपट बार'

# तब्बल ४३ लाख रूपयांचे नुकसान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नव्याने झालेल्या लिलावात पालिकेच्या स्टॉलला गतवर्षाच्या तुलनेत अत्यल्प उत्पन्न मिळाल्याने महालिकेचे नुकसान झाले आहे. वर्तक बाग येथील फटाका गाळ्यांच्या लिलावात संगनमत झाल्याचे दिसून आल्याने फेरलिलाव करण्यात आले. त्यातही गेल्यावर्षीपेक्षा बोली लावण्यात आल्याने उत्पन्न कमी मिळाले आहे. महापालिकेकडून शहरात फटाका स्टॉल विक्रीसाठी शनिवार पेठेतील वर्तक उद्यानाच्या मागील बाजूस नदीपात्रातील जागा लिलावाने दिली जाते. यावर्षी दोन आठवड्यापूर्वी लिलाव प्रक्रीया राबविण्यात आली. मात्र, त्यात रिंग झाल्याने महापालिकेने फेर लिलाव प्रक्रिया राबविली मात्र, यावेळीही रिंग झाल्याने महापालिकेस गेल्या वर्षाच्या तुलनेत तब्बल ४३ लाख रूपयांचे नुकसान झाले आहे.

**संशयामुळे लिलाव 'रद्द'**

- महापालिकेतर्फे दिवाळीमध्ये फटाके विक्रीसाठी १५ क्षेत्रीय कार्यालयाच्या ठिकाणी महापालिकेच्या मालकीच्या जागा व्यवसायिकांना स्टॉलसाठी भाड्याने दिल्या जातात. यापूर्वी ऑफलाइन लिलाव केला जात होता. पालिकेने मागील वर्षापासून ऑनलाइन लिलाव सुरू केले. वर्तकबाग येथील ३५ गाळ्यांमधून ६२ लाख ९० हजार ८७२ रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. मात्र, यावेळी प्रत्येक गाळ्याला पालिकेने निश्चित केलेल्या शुल्का पेक्षा चार ते पाच हजार रूपये अधिकची बोली आली. त्यामुळे पालिकेला संशय आल्याने तपासणी केली असता या सर्व गाळयासाठी एकाच संगणकावरून बोली लावण्यात आल्याचे समोर आले म्हणून पालिकेने हा लिलाव रद्द केला.
- मागील वर्षी या ठिकाणच्या ३५ गाळ्यांसाठी पालिकेला ६२ लाख ९० हजार रूपयांचे भाडे मिळाले होते.
- मात्र, यावर्षी पालिकेचे हे सर्व गाळे लिलावात १९ लाख ९० हजार रूपयांना गेले असून महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.
- महापालिका अधिकारी आणि विक्रेत्यांच्या संगनमतामुळेच हे नुकसान झाल्याची चर्चा रंगली आहे.

> पुढच्या वर्षी यात आणखी सुधारणा करून जास्त उत्पन्न मिळेल, खुली स्पर्धा होईल याची काळजी घेतली जाईल."
>
> **— मुकुंद बर्वे,** सहायक आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन विभाग

#रा




# धूम्रपान आणि मनारोग्य

माणसाने अनेक विचित्र सवयी स्वतःला लावून घेतलेल्या आहेत. त्यामध्ये नाका-तोंडातून धूर काढणाऱ्या धूम्रपानाचा समावेश होतो. 'नाकाचा वापर धुराड्यासारखा व्हावा अशी देवाची इच्छा असती तर त्याने नाकपुड्या उफराट्या ठेवल्या नसत्या का?' असे महान कृषीशास्त्रज्ञ जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांनी म्हटले होते. 'धूम्रपान आरोग्यासाठी घातक असते', असे वाक्य सिगारेटच्या पाकिटावरही लिहिलेले असते; पण तरीही अनेक जण त्याकडे दुर्लक्ष करतात आणि सर्रास धूम्रपान करतात. धूम्रपानाचा परिणाम केवळ आपल्या शारीरिक आरोग्यावरच नाही, तर तो मानसिक आरोग्यावरही होत असतो. जर धूम्रपान करणार्याने धूम्रपानास तिलांजली दिली तर त्याचे मानसिक आरोग्य सुधारते, असे मत वॉशिंग्टन विद्यापीठातील एका संशोधकाने व्यक्त केलेले आहे.

हृदयविकाराचा झटका येऊन गेलेल्या रुग्णाने जर धूम्रपान सोडले, तर त्याचे फायदे त्याला लगेच मिळतात. त्याचे दैनंदिन जीवन सुधारते आणि त्याच्या मानसिक आरोग्यातही बर्यापैकी सुधारणा होतात. धूम्रपान सोडल्यास महिनाभरात त्याचे मानसिक परिणाम तुम्हाला जाणवायला लागतात, असे वॉशिंग्टन विद्यापीठातील औषधोत्पादन विभागचे सहायक प्राध्यापक शेरॉन क्रेसी यांनी सांगितले. धूम्रपान सातत्याने करणार्याला हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका असतो. हृदयविकाराचा पहिला झटका येऊनही जो धूम्रपान सोडत नसेल तर त्याला दुसरा झटका येण्याची किंवा मृत्यू येण्याची भीती असते. पण, हृदयविकाराचा पहिला झटका आल्यानंतर धूम्रपान कायमचे सोडून दिले तर दुसरा झटका येण्याची शक्यता काही प्रमाणात कमी होते. रुग्णाच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. दैनंदिन जीवनात त्याला प्रसन्न वाटते आणि विचारशीलतेलाही चालना मिळते, असे क्रेसी सांगतात. ◆◆◆

# मागे उडू शकणारा पक्षी



**हा पक्षी आपल्या वजनाच्या दुप्पट खातो अन्न**


**ह्यू निसर्गाने आपल्याला अनेक अद्भुत आश्चर्ये दिली आहेत. त्यापैकी एक म्हणजे हमिंगबर्ड, जगातील एकमेव असा पक्षी जो मागे उडू शकतो. हमिंगबर्ड हा जगातील सर्वात लहान पक्षी आहे. त्याचं वजन फक्त २ ते २० ग्रॅम असतं. पण, त्याच्या आकाराइतकंच त्याचं कौशल्य देखील लक्षणीय आहे. हा पक्षी एका सेकंदात आपले पंख सुमारे ५० ते ८० वेळा फडफडवतो.**

**हमिंगबर्डची सर्वात आश्चर्यकारक क्षमता म्हणजे मागे उडणे या वेगवान पंखांच्या हालचालीमुळे त्याला '८' च्या आकारात उडता येते, तसंच तो हवेत एका जागी स्थिर राहू शकतो.पण, हमिंगबर्डची सर्वात आश्चर्यकारक क्षमता म्हणजे मागे उडणे. इतर कोणताही पक्षी हे करू शकत नाही. हमिंगबर्ड आपल्या पंखांना अशा प्रकारे वळवतो की तो सरळ मागे उडू शकतो. ही क्षमता त्याला फुलांमधून मध गोळा करताना अतिशय उपयोगी पडते. तो फुलाजवळ थांबतो, मध पितो आणि मग सरळ मागे जातो.**

**हमिंगबर्डची ही विशेष क्षमता त्याच्या अन्नसंकलनासाठी महत्त्वाची आहे. तो दररोज आपल्या वजनाच्या दुप्पट अन्न खातो. त्यासाठी तो दिवसभरात सुमारे १००० ते २००० फुलांना भेट देतो. त्याचे हृदय एका मिनिटात १२०० वेळा धडकते, जे मानवी हृदयाच्या धडकण्यापेक्षा २० पट जास्त आहे. हमिंगबर्डच्या या अद्भुत क्षमतेमुळे तो परागीभवनात महत्त्वाची भूमिका बजावतो. तो एका फुलावरून दुसऱ्या फुलावर जाताना परागकण वाहून नेतो, ज्यामुळे वनस्पतींचं प्रजनन होते. अशा प्रकारे, निसर्गाच्या संतुलनात हा छोटासा पक्षी मोठे योगदान देतो. हमिंगबर्ड आपल्याला शिकवतो की, आकार लहान असला तरी कौशल्य मोठे असू शकते. त्याची मागे उडण्याची क्षमता आपल्याला सांगते की, कधीकधी अपारंपरिक मार्ग स्वीकारणं, हेच यशाचे गमक असू शकते.** ◆◆◆

# मुंग्यांचं चमत्कारीक विश्व

**मुंग्या लहान असल्या, तरी त्यांचे जग आश्चर्यकारक असते आणि त्यांच्या क्षमतांनी आपण सगळे थक्क होऊन जावे, इतके ते अफाट शक्तिशाली असतात! काय आहेत त्यांची चकित करणारी रहस्ये, याचा हा लेखाजोखा...**



मुंग्याचे जबडे इतके शक्तिशाली आहेत की, ते आपल्या वजनाच्या ५० पटीने वजन उचलू शकतात. मुंग्या एकमेकांशी विशेष फेरोमोन नावाच्या रसायनाच्या माध्यमातून संवाद साधतात, ज्यामुळे त्यांना मार्ग शोधणे आणि इतरांशी माहिती शेअर करणे सोपे होते.

मुंग्यांच्या मेंदूची रचना त्यांच्या आकारमानाच्या तुलनेत अतिशय जटिल आहे. ते समस्या सोडवू शकतात, मार्ग ओळखू शकतात आणि अगदी खेळही खेळू शकतात. मुंग्यांचा समाज अतिशय सुव्यवस्थित असतो. त्यांच्यात राणी, डंख मारणारे मेल मुंग्या, आणि कामगारही असतात. प्रत्येक मुंगीची त्यांच्या समाजात विशिष्ट भूमिका असते.

काही राणी मुंग्या ३० वर्षांपर्यंत जिवंत राहू शकतात, ज्यामुळे त्यांना सर्वांत दीर्घायुषी कीटकांमध्ये गणतात. काही मुंग्या जमिनीखाली बुरशी वाढवून ते अन्न म्हणून वापरतात, जणू त्या स्वतः शेतकरीच असतात.

काही प्रजातींमध्ये गुलामगिरी पद्धत असते. त्या दुसऱ्या मुंग्यांच्या वसाहतींवर हल्ला करून त्यांच्या कामगारांना गुलाम बनवतात. मुंग्यांच्या शरीरात काही नैसर्गिक ॲन्टिबायोटिक्स असतात, ज्यामुळे त्यांना संसर्गांपासून संरक्षण मिळते.

मुंग्या एका सेकंदात जवळपास ४०० पट त्यांचे पाय हलवू शकतात, ज्यामुळे त्यांचा वेग प्रचंड असतो. मुंग्यांचा इतिहास जवळपास १० कोटी वर्षांपूर्वीचा आहे, म्हणजेच डायनासोर काळापासून त्या पृथ्वीवर आहेत. ●●●



# आता आवाजाने चार्जिंग


सेलफोनही आता दैनंदिन गरजेची वस्तू बनलेला आहे. मात्र, त्याचे चार्जिंग हा नेहमी डोकेदुखीचा विषय असतो. चार्जिंग संपले आणि चार्जर जवळ नसेल तर पंचाईत होते. सेलफोनचे चार्जिंग कशा प्रकारे करता येऊ शकते, याचे काही भन्नाट मार्गही शोधले जात असतात. ब्रिटनमध्येही याबाबतचे एक संशोधन झालेले आहे. त्यानुसार वाहतुकीचा, संगीताचा आवाज, फुटबॉल मैदानावरील गोंधळाचा आवाज अशा अनेक प्रकारच्या आवाजांमुळे मोबाईल चार्ज करता येईल.

लंडनच्या क्वीन मेरी विद्यापीठातील वैज्ञानिकांनी आवाजापासून ऊर्जा तयार करणारा नॅनो जनरेटर तयार केलेला आहे. त्याचा वापर सेलफोन चार्जिंगसाठी करता येईल. रोज आपण जे आवाज ऐकतो त्या सर्वप्रकारच्या ध्वनी ऊर्जेचा उपयोग करून विद्युत ऊर्जा तयार करता येईल. वैज्ञानिकांच्या पथकाने झिंक ऑक्साईडचे गुणधर्म बघितले असता त्यात असे दिसून आले, की ते ताणले किंवा पिळले तर त्यातून व्होल्टेजची निर्मिती होते व त्यातील ऊर्जेचे रूपांतर हे विद्युत ऊर्जेत करण्यासाठी नॅनो रॉड्स (सूक्ष्म दंडगोल) वापरले जातात. नॅनो रॉड्स विविध पृष्ठभागांवर लावता येतात त्यामुळे ऊर्जा मिळवणे सोपे जाते. ज्या पृष्ठभागावर नॅनो रॉड्स बसवले आहेत ते ताणले तर त्यातून जास्त व्होल्टेज निर्माण होते. नॅनो रॉड्स हे स्पंदने व रोजच्या आवाजाने निर्माण होणाऱ्या स्पंदनांना प्रतिसाद देतात. त्यानंतर रॉड म्हणजे दंडगोलाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या विद्युत संपर्काचा वापर करून व्होल्टेजची निर्मिती केली जाते, त्यामुळे मोबाईल चार्जिंग होते. संशोधकांनी प्रथमच नॅनो रॉड्सवर काही रसायने फवारून त्यांना झिंक ऑक्साईडसह प्लास्टिकच्या थरात बसवले आहे. जेव्हा रसायनांचे मिश्रण ९० अंशाला तापवले जाते तेव्हा नॅनो रॉड्स सगळ्या प्लास्टिक थरात पसरत जातात. पारंपरिक पद्धतीने सोन्याचा वापर विद्युत संपर्कासाठी केला जात असे; पण या चमूने ॲल्युमिनियमचा वापर केला आहे. या यंत्राने ५ व्होल्ट इतके व्होल्टेज तयार होते, ते फोन चार्जिंगसाठी पुरेसे असते. ◆◆◆



# कच्च्या भाज्या खाताय?

चांगले आरोग्य राखण्यासाठी, लोक सहसा आहारात फळे आणि भाज्या समाविष्ट करण्याची शिफारस करतात. पण, जर तुम्हाला ही फळे आणि भाज्या खाण्याची योग्य पद्धत माहीत नसेल, तर तुम्हाला फायदा होण्याऐवजी नुकसान होऊ शकते. खरे तर, काही भाज्यांमध्ये नैसर्गिक टॉक्सिन आणि पचायला कठीण शर्करा असतात. ज्यामुळे एखाद्या व्यक्तीसाठी गॅस्ट्रो नॉमिकल रोगांचा धोका वाढू शकतो. काही भाज्या आणि फळे फ्रूट क्लिनरने धुवून, तुम्ही त्यांच्यातील कीटकनाशके आणि दूषित पदार्थ काढून टाकू शकता. परंतु, तरीही डॉक्टर त्यांना कच्चे खाण्याची शिफारस करत नाहीत.



बटाटा - कच्चा बटाटा तुमची चवच खराब करत नाही, तर तुमच्या पचनाशी संबंधित समस्या देखील निर्माण करू शकतो. कच्च्या बटाट्यामध्ये असलेल्या स्टार्चमुळे पोट फुगणे आणि गॅस होऊ शकतो. अशा परिस्थितीत कोणत्याही प्रकारची गॅस्ट्रो नॉमिकल समस्या टाळण्यासाठी, बटाटे खाण्यापूर्वी ते बेक करणे, भाजणे किंवा शिजवण्याचा सल्ला दिला जातो. कोबी कुटुंबातील भाज्या जसे की फुलकोबी, ब्रोकोली आणि स्प्राऊट्स कच्च्या स्वरूपात खाणे टाळावे. या भाज्यांमध्ये असलेल्या साखरेचे प्रमाण पचण्यास कठीण असते. या भाज्या कच्च्या खाल्ल्याने पोटासंबंधी अनेक समस्या उद्भवू शकतात. जर तुम्ही आधीच थायरॉईडचे रुग्ण असाल, तर या भाज्यांचे सेवन केल्याने तुमच्या समस्या वाढू शकतात. वांग्यामध्ये सोलॅनिन नावाचे संयुग असते जे कॅल्शियमचे शोषण रोखते. शरीरातील सोलॅनिनमुळे मळमळ, चक्कर येणे, उलट्या होणे आणि मुरडा येणे यासह अनेक न्यूरोलॉजिकल आणि गॅस्ट्रो इंटेस्टाइनल समस्या उद्भवू शकतात. वांगी खाण्यास सुरक्षित बनवण्यासाठी ते शिजवून खाणे आवश्यक आहे. लक्षात ठेवा की वांग्याची भाजी बनवण्यापूर्वी चांगल्या क्लिनरच्या मदतीने स्वच्छ करा. कच्चे किंवा अर्धवट शिजलेल्या राजमामध्ये मोठ्या प्रमाणात टॉक्सिन, ग्लायकोप्रोटीन लेक्टिन असते. जे सेवन केल्याच्या काही तासांत एखाद्या व्यक्तीमध्ये मळमळ, उलट्या आणि जुलाब यांसारखी लक्षणे दिसू शकतात. राजमा शिजवण्यापूर्वी ५ तास भिजवल्यास त्यातील हानिकारक घटक नष्ट होण्यास मदत होते. बरेच लोक मशरूम कच्चे देखील खातात. पण, त्यात असलेली पोषकतत्त्वे चांगली मिळवायची असतील तर ते शिजवून खा. यासाठी तुम्ही तळलेले, ग्रील्ड मशरूमचे सेवन करू शकता. अशा मशरूममध्ये कच्च्या मशरूमपेक्षा जास्त पोटॅशियम असते. मशरूम खाण्यापूर्वी त्यांना चांगल्या फ्रूट क्लिनरने चांगले धुवा, असे तज्ज्ञ सांगतात. ◆◆◆




# झोपेबाबत नवं संशोधन

दिवस उगवल्यावर जागे होणे आणि रात्री झोप येणे या क्रिया मानवासह बहुसंख्य प्राणिमात्रांमध्ये अनादि काळापासून चालू आहेत. आपल्या अनेक शरीरक्रिया त्यावर अवलंबून असतात. जीवशास्त्राच्या भाषेत त्याला 'सरकॅडियन र्हिदम' किंवा 'बॉडी क्लॉक' (जैविक घड्याळ) असे म्हणतात. मात्र, दररोज नित्यनेमाने ही क्रिया कशी चालते, याबाबत शास्त्रज्ञांना कायमच कुतूहल होते. प्राण्यांच्या शरीरात अशी कोणती कळ (स्वीच) आहे, ज्यामुळे झोपणे आणि जागे होणे या क्रिया नियंत्रित होतात. त्यावर अनेक वर्षे संशोधन सुरू होते आणि ही जैविक कळ शोधून काढण्यात एका भारतीय वंशाच्या अमेरिकी संशोधकाला यश मिळालेले आहे.

रवी अल्लादा असे या संशोधकाचे नाव असून, ते अमेरिकेच्या इलिनॉइस प्रांतातील नॉर्थ वेस्टर्न विद्यापीठात जीवशास्त्राचे संशोधक आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अनेक वर्षे प्राण्यांच्या झोपेवर संशोधन केले आहे. त्यात फ्रूट फ्लायसारख्या साध्या रचनेचे आणि उंदरांसारख्या जटिल रचनेच्या प्राण्यांचा समावेश होता. जनुकीय रचनेत काही बदल झालेल्या माशांमध्ये झोपेचे नैसर्गिक चक्र बिघडलेले आढळून आले. त्यांचा अधिक अभ्यास केल्यावर लक्षात आले की मेंदूच्या चेतापेशींना ठरावीक वेळी झोपण्याचे आणि जागे होण्याचे संदेश पोहोचवले जातात. त्यात पेशींमधील सोडियम आणि पोटॅशियम चॅनेल्सची (वाहिन्या) भूमिका महत्त्वाची असते. दिवस उगवल्यावर या चेतापेशींच्या सोडियम चॅनेल्समध्ये अधिक क्रिया दिसून येते, तर दिवस मावळताना पोटॅशियम चॅनेल्समधील प्रक्रियेत वाढ झालेली दिसून आली. यावरून शास्त्रज्ञांनी असा निष्कर्ष काढला की, चेतापेशींमधील ही सोडियम आणि पोटॅशियम चॅनेल्स एखाद्या सायकलच्या पेडल्सप्रमाणे क्रमाक्रमाने प्राण्याचे झोपणे आणि जागे होणे नियंत्रित करतात. रवी अल्लादा यांच्या मते जर उंदरांमध्ये ही प्रक्रिया अस्तित्वात आहे तर ती माणसांमध्येही असणार. कारण, दोघांचीही शरीररचना बरीचशी सारखीच आहे. सध्या निद्रानाश आणि झोपेसंबंधी अन्य विकारांनी मानवी आरोग्यावर मोठा परिणाम होत आहे. अनेक कंपन्यांमध्ये दिवस-रात्र पाळ्यांमध्ये (शिफ्ट्स्) काम केल्यानेही झोपेचे हे नैसर्गिक चक्र बिघडत आहे. अशा अनेक व्याधींवर या संशोधनातून उपाय शोधणे शक्य होईल. ◆◆◆

# क्युरिऑसिटीची चाके झिजली

मंगळ ग्रहावर 'नासा'ची अनेक रोव्हर फिरत आहेत. त्यापैकी एक आहे क्युरिऑसिटी रोव्हर. बारा वर्षांपासून मंगळभूमीवर वावरत असलेल्या या रोव्हरच्या चाकाला मोठे भोक पडले असल्याचे दिसून आले आहे. हे एकच भोक पडलेले नसून, अशी अनेक छिद्रे रोव्हरच्या चाकांना पडलेली आहेत. ५ ऑगस्ट २०१२ मध्ये हे रोव्हर मंगळभूमीवर उतरले होते. ते केवळ दोन वर्षे काम करील, अशी सुरुवातीची अपेक्षा होती. मात्र, हे रोव्हर बरेच टिकाऊ निघाले आणि बारा वर्षांनंतरही ते अद्याप काम करीत आहे.



या लाल ग्रहावर क्युरिऑसिटी रोव्हरने आपले ४३२३ मंगळ कालगणनेचे दिवस व्यतीत केले आहेत. गेल क्रेटर असे नाव दिलेल्या मोठ्या विवराच्या चारही बाजूने या रोव्हरने आतापर्यंत ३२ किलोमीटरपेक्षाही अधिक प्रवास केला आहे. सुरुवातीला हे रोव्हर या विवरातच उतरले होते. त्याच्या साहाय्याने खगोलशास्त्रज्ञांनी या विवराचा अभ्यास केला. मंगळावर एकेकाळी सूक्ष्म जीवांच्या स्वरुपात का होईना जीवसृष्टी होती का याचा तपास यावेळी करण्यात येत होता. तसेच तेथून सूर्याच्या मागील हिश्श्याचेही निरीक्षण करण्यात आले होते. या रोव्हरने अनेक अनोख्या गोष्टीही शोधल्या आहेत. त्यामध्ये पुस्तकाच्या आकाराचा एक दगड आणि एका खनिज फुलाचा समावेश आहे. क्युरिऑसिटीच्या मार्स हँड लेन्स इमेजरने त्याच्या चाकांची छायाचित्रे टिपली आहेत. ती 'नासा'ने अलीकडेच प्रसिद्ध केली. त्यामधून दिसून येते की दीर्घ प्रवासानंतर आता या रोव्हरची चाके झिजून त्यामध्ये छिद्रे निर्माण झाली आहेत. हे मोठे भोक सर्वप्रथम कधी बनले हे स्पष्ट झाले नाही. अर्थात, चाकांची अशी अवस्था झाली असली तरीही या रोव्हरचे काम सुरूच आहे. ते भविष्यातही असेच सुरू राहील, असे संशोधक एश्ले स्ट्रुप यांनी सांगितले. ◆◆◆

# जगावेगळी 'जेली'

**संशोधकांनी समुद्रातील खोल पाण्यात राहणाऱ्या कॉम्ब जेलीबाबत एक अनोखे निरीक्षण केले आहे. ही जेली दुखापत झाल्यावर आपले अंतर्गत अवयव एकमेकांमध्ये मिसळून संयुक्त चेतासंस्था व पोटांची निर्मिती करते. असा असामान्य बदल यापूर्वी अन्य कोणत्याच प्रजातीमध्ये पाहण्यात आलेला नसल्याचे संशोधकांनी म्हटले आहे. प्रयोगशाळेत अपघातानेच त्यांची ही प्रवृत्ती दिसून आली.**

**ब्रिटनच्या एक्सेटर युनिव्हर्सिटीतील तसेच जपानच्या ओकाझाकी येथील नॅशनल इन्स्टिट्यूटस् ऑफ नॅचरल सायन्सेसमधील क्रमिक विकास जीवशास्त्रज्ञ केई जोकुरा यांनी याबाबतची माहिती दिली आहे. ते म्हणाले, अशा जेलींना पाहून आम्ही आश्चर्यचकित आणि उत्साहित झालो. मी तत्काळ अशा फ्युज्ड कॉम्ब जेलीज बाहेर काढल्या व त्या अन्य सहकाऱ्यांना दाखवल्या. कॉम्ब जेलींना टेनोफोर्स असेही नाव आहे. हा शंभरपेक्षाही अधिक प्रजातींचा एक मोठा समूह आहे. त्यामध्ये ब्लॉबसारख्या छोट्या, कंगव्याच्या आकाराचे टेंटिकल्स असलेल्या जिलॅटिनसम जीवांचा समावेश आहे. होतो. हे जीव पृथ्वीवरचे आहेत की परग्रहावरचे, असे कधी कधी वाटावे, इतके ते अनोखे आहेत. जेलीफिशसारखे दिसणारे हे जीव खोल समुद्रात कधी कधी प्रकाशाने चमकत असतात. त्यांच्या पारदर्शक शरीरातील काही पेशी असा प्रकाश निर्माण करतात. खोल समुद्रातील सर्वात अनोख्या जलचरांपैकी हे जीव आहेत. ते जीवसृष्टीच्या विकासातील सर्वात प्राचीन पूर्वजांपैकी असल्याचेही मानले जाते. याबाबतच्या संशोधनाची माहिती करंट बायोलॉजी या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली** ◆◆◆



## पुरंदर हवेली विधानसभा मतदारसंघाची निवडणूक तयारी पूर्ण

# आयोगाच्या आचारसंहिता पालनाचे आव्हान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**सासवड :** पुरंदर हवेली विधानसभा २०२ मतदार संघाची विधानसभा निवडणुकीची तयारी पूर्ण झाली आहे निवडणूक काळामध्ये निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व राजकीय पक्षांनी आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा लांडगे यांनी केले पुरंदर हवेली विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीच्या तयारी पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्या बोलत होत्या

विधानसभा निवडणुकीसाठी पुरंदर तहसील कार्यालयात २२ ते २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करावयाचा असुन दि ३० ऑक्टोबरपर रोजी छाननी केली जाईल २० नोव्हेंबर रोजी मतदान २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी २३ विशेष पथके ११ एस एस टी ९ एफ एस टी ४व्ही एस टी आणि ३ व्हीएसटी अशा विविध प्रकारच्या पथकांची नेमणूक करण्यात आली आहे

पुरंदर हवेली मतदार संघामध्ये आज अखेर दोन लाख अडतीस हजार एक पुरूष मतदार आणि दोन लाख विसहजार दोनशे एकोणपन्नास मतदार आहेत व इतर दोनशे ब्याऐंशी मतदार असून एकुण चार लाख अठ्ठालन्न हजार दोनशे ब्याऐंशी इतकी मतदार संख्या आहे दिव्यांग मतदारांची संख्या चार हजार पंच्याहत्तर एवढी असुन पंच्याऐंशी वय असणाऱ्या मतदारांची संख्या ८हजार ४२८ माजी सैनिक मतदार ६१३ आहेत सदर निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी २१९८ मनुष्यबळ नियुक्ती करणे प्रस्तावित आहे

४१३ मतदान केंद्रावर मतदान होणार असून नवीन प्रशासकीय इमारत पुरंदर येथे सुरक्षा कक्ष तयार केले आहेत

त्याच ठिकाणी साहित्य वाटप व स्विकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे असे लांडगे यांनी सांगितले निवडणूक प्रक्रिया साठी मनुष्यबळाची मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे केली असल्याची माहिती वर्षा लांडगे यांनी माहिती देताना सांगितले

## विधानसभा निवडणुकीत बारामती व इंदापुरात रासपचे धनगर उमेदवार

**बारामती :** लोकसभा निवडणूक लढविल्यानंतर रासपच्या भूमिका बदलत चालल्या आहेत.



महायुतीतून बाहेर पडल्यानंतर राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांनी २८८ विधानसभा मतदारसंघात उमेदवार उभे करण्याचे घोषित केले आहे.पहिल्या संभाव्य पंचवीस उमेदवारांची यादी रासपकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये पुणे जिल्ह्या तील बारामती आणि इंदापूर विधानसभा मतदारसंघाचा देखील समावेश केला आहे. बारामती मतदार संघातून संदीप चोपडे आणि इंदापूर मधून ताना जी शिंगाडे ही धनगर समाजा तील दोन नावे संभाव्य यादीमध्ये आहेत

## Selected

## उरुळी कांचन विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी जयसिंग बाबुराव कांचन


जयसिंग कांचन, अध्यक्ष


संजय गायकवाड, उपाध्यक्ष

**उरुळी कांचन :** उरुळी कांचन विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी जयसिंग बाबुराव कांचन व उपाध्यक्षपदी संजय रामचंद्र गायकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेचे मावळते अध्यक्ष विजय मुरकुटे व उपाध्यक्ष अमोल कांचन यांनी आपल्या पदांचे राजीनामे दिल्यानंतर ही पदे रिक्त झाली होती. या पदांच्या निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी एस.एल. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली संस्था संचालक मंडळाची बैठक होऊन या बैठकीमध्ये, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजाराम कांचन यांच्या मार्गदर्शनाखाली जयसिंग बाबुराव कांचन व संजय रामचंद्र गायकवाड यांची अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. याप्रसंगी यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष कांचन, माजी उपसरपंच युवराज कांचन, सागर कांचन (डालकरी), सचिव संतोष चौधरी यांच्या सह सर्व संचालक उपस्थित होते. निवडी नंतर बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष जयसिंग कांचन यांनी सांगितले की, सर्व सभासदांच्या हिताचे निर्णय घेत सर्वांना बरोबर घेऊन संस्थेची वाटचाल अधिक गतिमान केली जाईल.

## टीसीच्या सोमनाथ कदम यांची युवा राजदूतपदी निवड



**बारामती :** बारामती येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्या लयातील सांस्कृतिक प्रतिनिधी सोमनाथ रोहिदास कदम यांची ओडिसा सरकारच्या प्रोजेक्ट पॉइंट, ओडिसा या संपूर्ण भारता त सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेवर महाराष्ट्रातून युवा राजदूत म्हणून निवड झाली आहे. कदम यांना यापूर्वी ओडिसा येथे राष्ट्रीय युवा पुरस्कारने सन्मानित करण्यात आले होते. प्राचार्य डॉ.अविनाश जगताप व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.भीमराव तोरणे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सांस्कृतिक विभागाने पंजाब येथे डान्स स्पर्धत प्रथम क्रमांक मिळवला होता.ओडिसा येथे द्वितीय,जल्लोष-२०२४ या विद्यापीठ स्तरीय स्पर्धेत पुणे ग्रामीणचे विजेतेपद पटकवण्यात त्यांचा सहभाग होता.या निवडी बद्दल 'अनेकान्त'चे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर व प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले आहे.

पान १ वरून

## बँक कर्मचाऱ्यांना लागली लॉटरी!

वाढले जाऊ शकतात. या कालावधीत बँका सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सुरू राहतील तर सध्या सरकारी सुटी वगळता दुस-या आणि चौथ्या शनिवारी बँका बंद राहतात. बँकेतील कामकाजाच्या दिवसांबाबत बँक युनियन २०१५ पासून मागणी करत असून दर शनिवार आणि रविवारी सुट्टी द्यावी, अशी त्यांची मागणी आहे. हीच मागणी लक्षात घेऊन २०१५ मध्ये दुस-या व चौथ्या शनिवारी सुट्टी देण्याचा निर्णय घेण्यात आला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) बँकिंग तास आणि बँकांतर्गत कामकाजावर नियंत्रण ठेवते त्यामुळे हा प्रस्ताव आरबीआयकडेही पाठवला जाईल. अद्यापपर्यंत या प्रस्तावावर सरकारने मंजुरीची वेळ निश्चित केलेली नाही मात्र, वर्षअखेरीस याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. दरम्यान, बँक कर्मचा-यांना पाच दिवस कामाचा आठवडा लागू झाल्यास ग्राहकांना विकेण्डला बँकेतील कामे करण्यात अडचणी येतील.

## कांग्रेसमध्ये अंतर्गत वाद वाढण्याची शक्यता

उमेदवारी देतंय हे पाहणं महत्वाचे ठरणार आहे. उमेदवारीवरून या मतदारसंघामध्ये रस्सीखेच सुरू आहे. तर काँग्रेसचा तिसरा मतदारसंघ असलेले शिवाजीनगर मतदारसंघातून उमेदवारीसाठी चढाओढ सुरू आहे. गेल्या वेळेस निवडणूक लढवणारे दत्तात्रय बहिरट, मनीषा आनंद, दिप्ती चौधरी हे पक्षाकडून तिकीट मिळावी यासाठी इच्छुक आहेत. तर माजी आमदार विनायक निम्हण यांचे पुत्र सनी निम्हण हे देखील काँग्रेसमधून निवडणूक लढवणार अशा चर्चा सुरू आहेत. त्यामुळे पुण्यातील काँग्रेसच्या तिन्ही जागांवरून वाद होण्याची शक्यता आहे.

## झारखंडमध्ये 'इंडिया' आघाडीचे जागावाटप


मात्र कोणता पक्ष किती जागा लढवणार याचा निर्णय अद्याप झालेला नाही. पत्रकार परिषदेत सोरेन म्हणाले, की आम्ही 'इंडिया' आघाडीचे लोक ही निवडणूक अतिशय गांभीर्याने घेत आहोत आणि प्रत्येक पैलू लक्षात घेऊन या निवडणुकीत एकत्र उतरण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही आघाडी करून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

## निधी अभावी तब्बल २०० कोटींच्या निविदांना स्थगिती

पाच आमदारांच्या प्रभागातील नाल्यांच्या ठिकाणी कामे केली जाणार होती. त्यानुसार, प्रशासनाने निविदांचे प्रस्ताव मागील आठवड्यात स्थायी समितीच्या मान्यतेसाठी ठेवले होते. मात्र, या कामासाठी शासनाचा निधी न आल्याने या निविदा मंजूर करण्यात आलेल्या नसल्याचे समोर आले आहे. आंबिल ओढ्याला २५ सप्टेंबर २०१९ मध्ये ढगफुटी होऊन पूर आला. अनेक सोसायट्यांच्या सीमाभिंती पडल्या. २० पेक्षा अधिक जणांचा त्यामध्ये बळी गेला होता.त्यानंतर महापालिकेने आंबिल ओढ्याच्या दोन्ही बाजूने संरक्षण भिंती, नवीन पूल बांधले. पण काही ठिकाणी तांत्रिक अडचणीमुळे काम करता आले नाही. त्यामुळे राज्य सरकारने या कामासाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला.

## तीन मेडिकल कॉलेज चौकशीच्या भोवऱ्यात

राखून ठेवल्या जातात. मात्र, ही प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या शुल्क नियमन प्राधिकरणाकडून खासगी वैद्यकीय महाविद्यालयातील अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविले जाते. त्यामध्ये शैक्षणिक शुल्क तसेच विकसन शुल्क अर्थात डेव्हलपमेंट फीचा समावेश होतो. इन्स्टिट्यूशनल कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी नियामित शुल्काच्या तीन पट शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित महाविद्यालयांनी या शुल्काची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारणे अपेक्षित आहे. मात्र, दोन नियमित प्रवेश फेऱ्यांचा अभ्यास करता इन्स्टिट्यूशनल कोट्याच्या जागा अनेक खासगी महाविद्यालयांमध्ये रिक्त दिसून येत आहेत.
या जागांवर प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये गेले. मात्र, त्यांना विविध कारणे देत त्यांचे प्रवेश नाकारण्यात आले. त्यामुळे या जागा पहिल्या फेरीत आणि दुसऱ्या फेरीत रिक्त राहिल्या.
या संपूर्ण प्रक्रियेत महाविद्यालयांनी आर्थिक गैरव्यवहार केला की काय. या पार्श्वभूमीवर सर्व महाविद्यालयांची चौकशी करून त्यांच्या इन्स्टिट्यूशनल कोट्यातील प्रवेश प्रक्रियेचा अहवाल मागविण्यात यावा, अशी मागणी युवा सेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय कार्यालयाकडे केली होती. त्यानुसार चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती:** येथील औद्योगिक वसाहतीमध्ये नव्याने उभारण्यात आलेला एका खांबाला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने तो वाकला असून मधील दीड दोन महिन्यापासून तो आहे त्या स्थितीत असून औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांचे या खांबाच्या दुरुस्ती कडे दुर्लक्ष होत आहे.

मागील पाच सहा महिन्यांपूर्वी औद्योगिक वसाहती मधील जुने विद्युत खांब काढून नवीन विद्युत खांब बसवण्यात आले मात्र मागील काही दिवसांपूर्वी पोलीस स्टेशन पासून हाकेच्या अंतरावर व वर्दळीच्या रस्त्यावर रात्रीच्या सुमारास अज्ञात वाहनाने एका खांबाला ठोकर दिली. गेल्या अनेक दिवसापासून हा खांब आहे त्या स्थितीत आहे मात्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने या खांबाच्या दुरुस्तीसाठी लक्ष दिले नाही त्यामुळे औद्योगिक वसाहतीच्या कारभारावरती नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. जर हा खांब अचानक कोसळला तर मोठी अघटीत घटना घडू शकते त्यामुळे सदर खांब त्वरित बदलण्यात यावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पान १ वरून

## बॉंबच्या धमकीने...

एअर ट्रॅफिक कंट्रोलशी बोलल्यानंतर वैमानिकाने लँडिंगच्या नियोजित वेळेनंतर विमानाचे पूर्ण इमर्जन्सी लँडिंग केले. एअर इंडिया एक्सप्रेस एअरक्राफ्ट आयएक्स-१९६ ने शुक्रवारी रात्री दुबईहून जयपूर विमानतळावर उड्डाण केले होते. दरम्यान, 'सोशल मीडिया'च्या माध्यमातून विमान बॉम्बने उडवण्याची धमकी एअर ट्रॅफिक कंट्रोल आणि वैमानिकांपर्यंत पोहोचली. यानंतर वैमानिकाने पहाटे १.२० वाजता जयपूर विमानतळावर विमानाचे पूर्ण इमर्जन्सी लँडिंग केले.

## दोन दहशतवाद्यांना...

लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. हायब्रीड अतिरेकी सामान्य नागरिकांप्रमाणेच परिसरात राहतात; परंतु गुप्तपणे दहशतवादी कारवायांमध्ये गुंतलेले असतात किंवा दहशतवाद्यांना मदत करतात. त्यांना ओळखणे कठीण होऊन बसते. दोन्ही दहशतवादी मंदिर, लष्करी तळ आणि हॉस्पिटलवर ग्रेनेड फेकण्याचा कट रचत होते. लोकांमध्ये भीती निर्माण करण्यासाठी त्यांनी पूंछमध्ये देशविरोधी पोस्टरही चिकटवले.

## राष्ट्रीय महिला...

आणि कायदेशीर मुद्दांचा फेरआढावा घेणे, संसदीय- वैधानिक शिफारशी करणे, महिलांविषयक धोरणात्मक बाबींसाठी केंद्र व राज्य सरकारांना सल्ला देणे, महिलांविषयक प्रश्नांचा संशोधन करणे, त्यांच्या अडीअडचणींची दखल घेऊन कारवाई करणे आदींचा त्यात प्रामुख्याने समावेश आहे. 1992 मध्ये विशेष कायद्यान्वये स्थापन झालेल्या या आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत.

## इंदापूर पोलिसांची खणखणीत हॅटट्रिक

- तीन दिवसात सराईत सोनंचोर पकडला
- तलवार दाखवून दहशत माजवणाऱ्यावर गुन्हा दाखल
- तहसीलदार हल्ला प्रकरणातील फरारी आरोपीस अटक

**इंदापूर :** सोने खरेदी करण्याच्या बहाण्याने हातचलाखी करुन दोन वेळा सोने चोरी करणा-या सराईत चोराला गुन्हा घडल्यानंतर अवघ्या तीन दिवसात जेरबंद करण्याची कामगिरी इंदापूर पोलीसांनी केली आहे. विठ्ठल रामचंद्र सानप (रा.संभाजीनगर) असे या सराईत चोरट्याचे नाव आहे. सोने खरेदी करण्याच्या बहाण्याने त्याने मंगळवारी ( दि.१५) येथील राजे ज्वेलर्स या सोन्याच्या दुकानात जावून हातचलाखी करुन दोन वेळा सोन्याची चोरी केली होती. या गुन्हूयात त्याला शिताफीने अटक करुन त्याने चोरलेला सोन्याची अंगठी व डोरले असा ३६ हजार रुपयाचा माल इंदापूर पोलीसांनी हस्तगत केला आहे.

आचार संहिता लागू झाल्यानंतर पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित रहाण्यासाठी गुन्हेगारांवर कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर तलवार हातात घेवून फोटो काढून दहशत माजवण्याचा प्रयत्न करणाऱ्या निखिल उर्फ लाला गणपत शिंदे ( रा.पळसदेव) इसमास सापळा रचून पकडून इंदापूर पोलीसांनी त्याच्याकडून तलवार जप्त केली. गु.र.नं.८५८/२०२४ शस्त्र अधिनियम कलम ४, २५ प्रमाणे त्याच्यावर गुन्हा दाखल केला.या कामी पोलीस शिपाई तुषार चव्हाण यांनी चमकदार कामगिरी केली. सहायक पोलीस फौजदार प्रकाश माने अधिक तपास करत आहेत. बदलून गेलेले तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यावरील हल्ला प्रकरणातील फरारी आरोपी पांडुरंग बाबूराव देवकर (रा.बेडसिंग ता.इंदापूर) यास आज इंदापूर पोलीसांनी अटक केली. पोलीस अधिक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.सुदर्शन राठोड,पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांचे मार्गदर्शनाखाली, सहायक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश माने, हवालदार सलमान खान, पोलीस अंमलदार गणेश डेरे, विशाल चौधर, तुषार चव्हाण, अंकुश माने, नंदु जाधव, प्रविण शिंगाडे यांनी कामगिरी केली.

## केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत : डिग्री ही विद्यार्थी जीवनातील माईलस्टोन

# एमआयटी डब्ल्यूपीयूचा ६ वा दीक्षांत समारंभ, ५४७८ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-काळभोर :** " सतत नवे ज्ञान आत्मसात करणे, आव्हानांचा सामना करणे, कठिण परिश्रम आणि सतत पुढे जाण्याची जिद्द हेच गुण विद्यार्थी जीवनाचा माईल स्टोन असेल. कॉर्पोरेट जगात पाऊल ठेवताना स्वतःला सिद्ध करा आणि आपल्या गुणांच्या आधारे कुटुंब व संस्थेची प्रतिष्ठा वाढविण्याचे कार्य करावे." असे विचार केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी व्यक्त केले. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचा ६ वा दीक्षांत समारंभ शनिवारी विश्व सभामंडप, विश्वराजबाग, लोणी-काळभोर, पुणे येथे पार पडला. यावेळी विद्यापीठाच्या ५४७८ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



विज्ञान क्षेत्रात आयुष्यभर केलेल्या अतुलनीय कार्याबद्दल प्रसिद्ध शास्त्रज्ञ भारत सरकारचे प्रधान वैज्ञानिक सल्लागार पद्मश्री डॉ. कृष्णस्वामी विजय राघवन यांना "एमआयटी डब्ल्यूपीयू विज्ञान महर्षी सन्मान " देऊन गौरविण्यात आले. सन्मानपत्र, सरस्वतीची मुर्ती व ५ लक्ष रूपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय व्यावसायिक सल्लागार प्रा. रामचरण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरु डॉ. आर. एम. चिटणीस, सीईओ डॉ. संजय कामतेकर, कुलसचिव प्रा. गणेश पोकळे आणि परीक्षा नियंत्रक डॉ. राहुल जोशी, तसेच विद्यापीठाचे अधिष्ठाता व संचालक हे सर्व उपस्थित होते.
या प्रसंगी विद्यार्थी अभिजीत पवार याला 'फाउंडर प्रेसिडेंट मेडल' व विद्यार्थिनी अनुश्री कुलकर्णी हिला 'एक्झिक्युटिव्ह प्रेसिडेंट मेडल' ने गौरविण्यात आले. तसेच १२२ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक, ८५ रौप्य व ८५ कास्य पदक असे एकूण २९५ विद्यार्थ्यांना मेडल बहाल करण्यात आले. तसेच २६ विद्यार्थ्यांना पी.एचडी देण्यात आली. यामध्ये ४३५ विद्यार्थी मेरीट लिस्ट मधील आहेत.

अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, कम्प्यूटर सायन्स अ‍ॅण्ड इंजीनियरिंग, रामचरण स्कूल ऑफ लिडरशीप बिझनेस, ईकॉनॉमिक्स अ‍ॅण्ड कॉमर्स, स्कूल ऑफ गर्व्हनमेंट, हेल्थ सायन्य अँड टेक्नॉलॉजी, सायन्स अँड एन्व्हायरमेंटल स्टडीज, डिझाइन, लिबरल ऑर्टस, लॉ आणि कॉन्शसनेस या व्यतिरिक्त अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

गजेंद्रसिंह शेखावत म्हणाले," तंत्रज्ञानाच्या काळात ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. हजारो वर्षाचे ज्ञान गेल्या १०० वर्षात कित्येक पटीने वाढले आहे. तसेच गेल्या १० वर्षात नवे प्रयोग व नवे ज्ञान समोर येत आहे. अशावेळेस विद्यार्थ्यांनी सतत शिकत रहावे आणि ज्ञान आत्मसात करावे. आज माहिती तंत्रज्ञानामुळे आपल्या बोटांमध्ये संपूर्ण जगाचे ज्ञान आले आहे. वर्तमान काळात मानव जीवनाला समृध्द करण्यासाठी सर्व समस्यां सोडविण्यावर भर दिला जावा."


२१ व्या शतकाला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी कृतीशील शिक्षणाकडे वळताना संकल्पनात्मक शिक्षणाची कास धरली पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपल्यामधील सुप्त कौशल्य गुणांचा शोध घेवून त्यांचा विकास करणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. असेही केंद्रीय मंत्री शेखावत यांनी सांगितले.

#रा

SUNDAY EDGE
राष्ट्रसंचार
www.rashtrasanchar.com
@rashtrasanchar
20•10•2024




संस्कृतसाठीच जीवन समर्पण' ह्या प्रतिज्ञेच्या ६१ वर्ष पूर्तीचे औचित्य साधून, गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री (सध्याचे भारताचे मा. प्रधानमंत्री) मा. नरेंद्र मोदी 'शारदा'कार पंडित वसंत अनंत गाडगीळ यांचा संस्कृत-सेवा-समर्पणासाठी सत्कार करताना, सोबत डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. विजय भटकर, प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, छत्रपती श्री शाहू महाराज, प्रा. राहुल वि. कराड. (स्वामी विवेकानंद सभागृह, माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे दिनांक ९ जुलै २०१२)



# पंडित श्री वसंतराव गाडगीळ चालते बोलते 'ज्ञानपीठ'

**मला प्रांजळपणे नमूद करावेसे वाटते की, जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या उक्तीनुसार आपण सदैव चांगल्या व्यक्ती वा घटना यांच्यापासून शोध व बोध घेणे आपले कर्तव्य आहे.**



जेष्ठ संस्कृततज्ञ पंडित वसन्त अनन्त गाडगीळ
जन्म १९३० - मृत्यु २०२४

— प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड
अध्यक्ष, विश्व शांती केंद्र, माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे, भारत

**दुर्लभं भारते जन्म । महाराष्ट्रे सुदुर्लभम् ॥** या उक्तीनुसार भारतात जन्म मिळणे कठीण आणि महाराष्ट्रात जन्म मिळणे अतिशय दुर्लभ आहे. आपल्या भारताला सत्यनिष्ठा, ज्ञाननिष्ठा, धर्मनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा अशा महापुरुषांची आणि द्रष्ट्या सत्पुरूषांची जणू परंपराच लाभली आहे. परंतु, दुर्दैवाने, हिमालयाच्या उंचीची आदर्श माणसे दुर्मिळ होत गेली आणि ज्यांच्याकडे आदर्श म्हणून पहावे, ज्यांच्यासमोर नतमस्तक व्हावे, अशा वंदनीय व्यक्ती अलीकडे अभावानेच आढळतात. या सर्व पार्श्वभूमीवर स्व. पंडित वसंतराव गाडगीळ यांच्या जीवनातील सामाजिक, शैक्षणिक व आध्यात्मिक क्षेत्रातील कार्य समाजाला निश्चितपणे मार्गदर्शक ठरत असल्याचे मान्य करावे लागेल.

**मन करा रे प्रसन्न। सर्व सिध्दीचे कारण॥**

पंडित वसंतराव गाडगीळ यांना आपण कितीही अडीअडचणीच्या, त्रासाच्या वेळी भेटलात तरी त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारच स्मितहास्य व दृढ निश्चयाचा भाव स्पष्टपणे दिसायचा. त्यांच्या सुदृढ व संपन्न व्यक्तिमत्त्वाचे ते एक द्योतक होते.

**मऊ मेणाहूणी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रासी भेदूं ऐसे ॥**

पंडित वसंतराव गाडगीळ म्हणजे खऱ्या अर्थाने वैष्णव व शैव पंथाचे समन्वयक होते. हरी हरामध्ये किंवा इतर सर्व जातीधर्मांच्यामध्ये त्यांना कधीच भेद दिसला नाही. ते खऱ्या अर्थाने पंढरीच्या पांडुरंगाचे निष्ठावंत भक्त व हाडाचे वारकरी होते.

पंडित वसंतराव गाडगीळांची आणि माझी पहिली भेट टिळक स्मारक मंदिरामध्ये झाली. जगात देव आहे की नाही अशा आणि धर्म, श्रध्दा, अंधश्रद्धा अशा विविध स्वरूपाच्या विषयांवर वादविवाद व चर्चा आयोजित करण्यात आली होती. अशा स्वरूपाच्या चर्चेमध्ये ईश्वराचे अस्तित्व मानणारे व ईश्वराचे अस्तित्व अजिबात न मानणारे लोक हजर होते. त्यावेळी पंडित वसंतराव गाडगीळ यांनी अत्यंत शास्त्रशुध्द पध्दतीने ईश्वराचे अस्तित्व सिध्द करण्याविषयी जे विचार व्यक्त केले, ते मला अंत:र्मुख करणारे वाटले. त्यावेळेपासून माझ्या मनामध्ये पंडित गाडगीळांच्या ज्ञानसाधनेविषयी एक प्रकारचा आदरभाव निर्माण झाला आणि नकळत आमचे ऋणानुबंध घनिष्ठ होत गेले.

पुढे हळुहळु गाडगीळांच्या ठायीच्या नि:स्पृहतेची अधूनमधून प्रचिती येवू लागली आणि त्यांच्या अंतर्यामी वास करीत असलेल्या सात्विक भावाची व निर्मळ मनाची ओळखही पटली. अतिशय विद्वान अशा पंडित गाडगीळांच्या व्यक्तिमत्त्वात, भारतीय संस्कृतीचे व सद्गुणांचे यथार्थ असे मूर्तिमंत दर्शन घडायचे, अशी माझी भावना आहे.

आपल्या भारतामध्ये गेल्या कित्येक वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व वैचारिक असे परिवर्तन घडत आहे. त्यातून नवनवीन पुरोगामी विचार समाजामध्ये रुजविण्याचा प्रयत्न चालू आहे. समाज विघातक अशा बुरसटलेल्या अनेक रूढी परंपरा लोप पावत आहेत, हे एक शुभलक्षणच आहे. तथापि दुर्दैवाने अंधश्रद्धा निर्मूलनाच्या नावाखाली मूलभूत अशा श्रद्धेलाच तडा जातो की काय? अशी भीती निर्माण होते आहे. अशावेळी गीतेतील खालील सिध्दांताची समाजाला जाणिव करून देणे मला गरजेचे वाटते.

सोरटी सोमनाथच्या सोमेश्वराची प्राणप्रतिष्ठा भारताचे पहिले राष्ट्रपती कै. बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या शुभहस्ते १९५२ साली झाली. त्यावेळी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पुढाकाराने तरूण वयातील वसंतराव गाडगीळ यांना स्वयंसेवकाची भूमिका देण्यात आली होती. दुर्दैवाने त्यावेळचे टोपलीचे संडास साफ करणारे मेहतर समाजातील सेवक अचानकपणे संपावर गेलेले, संडास साफ करण्यासाठी इतर कोणी हाताखाली माणसे नसल्यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्वत:च हातात खराटा घेवून त्यावेळची टोपलीच्या संडासांची साफसफाई सुरू केली. हे वसंत गाडगीळांनी पाहिले आणि त्याच क्षणी त्यांनी तर्कतीर्थांचं हे काम नाही असे सांगून, त्यांच्या हातातला खराटा व बादली घेवून संडास साफ करण्याचे काम स्वत:कडे घेतले. तर्कतीर्थांना वसंत गाडगीळांचे हे कोणताही संकोच वा लाज न बाळगता अगदी तरूण वयात, उत्स्फूर्तपणे त्यांनी स्वत: होऊन स्वीकारलेले संडास साफ करण्याचे काम पाहून, खूप मोठा अचंबा वाटला व मनातून या पोराचे कौतुकही वाटले. त्या दिवसापासून तर्कतीर्थांनी वसंत गाडगीळांना ब्रम्हवृंदाला पाणी पुरविण्याचे पाणक्याचे काम सोडून गाभाऱ्यातील पुजाअर्चेच्यावेळी पुजेचे साहित्य पुरविण्याची जबाबदारी सोपवली. गाडगीळांना त्यावेळी आपल्याला फार मोठी बढती वा प्रमोशन मिळाल्याचा आनंद झाला.

> ● **पंडित वसंत गाडगीळ हे आपले विचार व्यक्त करताना आपल्या भूमिकेशी अगदी ठाम असत. तसेच, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यामध्ये मेळ घालत असतानाच, त्यांच्या प्रत्येक कृतीतून, ते प्रभावीपणे समन्वय साधत असल्याची प्रचिती यायची. यातच पंडित गाडगीळांचे वैशिष्ट्य होते. अगदी लहानपणीच १२ - १३ वर्षाच्या वयातच वसतरावांनी कोल्हापूरहून त्यांच्या चुलत भावाकडे, त्यावेळच्या अखंड भारतातील कराचीला प्रयाण केले. त्यानंतरचा त्यांचा जीवनाचा प्रवास खऱ्या अर्थाने उद्बोधक ठरत गेला असे दिसते.**

प्राणप्रतिष्ठेच्या समाप्तीनंतर पौराहित्य करणाऱ्या अनेक विद्वान ब्रम्हवृदांच्या बरोबरीनेच महावस्त्र व दक्षिणा प्रदान करुन तर्कतीर्थांनी स्वत: गाडगीळांना सन्मानित केले. गाडगीळांचा आनंद गगनात मावेनासा झाला. हा प्रसंग वसंत गाडगीळांच्या जीवनाला विधायक स्वरूपाची कलाटणी देणारा ठरला, त्यावेळेपासून वेदविद्या, धर्मशास्त्र व संस्कृत भाषेचा अभ्यास करण्याचा गाडगीळांनी सकल्प सोडला. पुढे गाडगीळांच्या जीवनामध्ये कालानुरुप, बदलत्या परिस्थितीनुसार त्यांनी अंगीकारलेल्या कार्याचे दुसरे एक उदाहरण म्हणजे गाडगीळांनी हिंदुधर्मातून धर्मांतर केलेल्या अनेक व्यक्तींना पुन्हा हिंदुधर्मात सामील करून घेण्याचे फार मोठे सामाजिक कार्य केले.

पंडित वसंतराव गाडगीळांच्या या समाजाभिमुख आणि सुधारणावादी जीवनाचा वेध घेतल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, त्यांचे जीवन खऱ्याअर्थाने समर्पित वृत्तीच्या ब्राह्मण्याला साजेसे होते. दुर्दैवाने सध्या मात्र नकळत भारतीय संस्कृती व परंपरेचा ऱ्हास होत असताना दिसतो. यात दोष कोणी कोणाला द्यायचा हे समजत नाही. अभक्ष भक्षण आणि अपेयपान ही सध्याची संस्कृती बनत चालली आहे. अशा स्थितीत पंडित वसंतराव गाडगीळ यांच्या सात्विक व समर्पित जीवनाची वाटचाल अर्थपूर्ण आहे, असे वाटते. सध्या मात्र सर्व जगातल्या अनेक देशांनी संस्कृत भाषेचा सखोल अभ्यास करण्याचे कार्य सुरू केल्यानंतर आपल्या भारतीयांना संस्कृत भाषेचे महत्व पुन्हा पटू लागले आहे. संगणक तज्ञ महाराष्ट्रभूषण डॉ. विजय भटकर यांनी सर्व जगाला ओरडून, या पुढे संस्कृत भाषा ही संगणकाच्यासाठी सर्वात योग्य भाषा ठरेल असे ठामपणे सांगण्यास सुरूवात केली हे आपले भाग्य आहे.

पंडित गाडगीळांचे, एरवी अत्यंत क्लिष्ट वाटणाऱ्या संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, चिंतन, मनन व व्यासंग हे एक त्यांच्या जीवन साधनेचे ठळक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. खऱ्या अर्थाने या भाषेला सुबोधता आणि गेयता प्राप्त करून देण्याचा पंडित वसंतराव गाडगीळांनी कसोशीने प्रयत्न केला. सर्वसामान्य श्रोत्यांना त्यांचं संस्कृतमधील भाषण ऐकणं ही एक पर्वणीच असायची. संस्कृत भाषा एवढी सोपी, सुबोध व रसाळ आहे याची तेंव्हा जाणिव व्हायची. 'ज्ञानसाधना' हेच ध्येय व 'सद्गुणांची पूजा हीच ईश्वर पूजा' असे मानून पंडित वसंतराव गाडगीळांनी अनेक अडीअडचणीतून सुध्दा आपल्या जीवनातील साधना चालू ठेवली आहे. पंडितजींच तीन खोल्याच घर पाहिलं तर जणुकाही अनेक ग्रंथांच्या व पुस्तकांच्या गुहेमध्येच वसंतराव गाडगीळ राहतात असे आपल्याला दिसेल. या व्यक्तीने आयुष्यभर ग्रंथसंपदा प्राप्त करून, आपले स्वत:चे व समाजाचेही जीवन समृध्द केले आहे.

खऱ्या अर्थाने पंडित वसंतराव गाडगीळ हे मला एकविसाव्या शतकातील एक ऋषितुल्य असेच व्यक्तिमत्त्व वाटते.

माऊलींच्या कृपेने आमच्या जीवनामध्ये राजबाग, लोणी काळभोर येथे 'विश्वशांती गुरुकुल' प्रकल्पाचा शुभारंभ झाला. त्या शुभप्रसंगी भूमिपूजनाच्या निमित्ताने पंडित वसंतराव गाडगीळ, ह.भ.प. श्री. किसन महाराज साखरे, शतंजीवी योगमहर्षि थोर स्वातंत्र्य सेनानी श्री शेलारमाला यांचे मिळालेले आशीर्वाद आणि सदिच्छा मला फार मोलाच्या वाटतात. विश्वशांती गुरूकुल संकल्पना रूजवात करण्याच्या भूमिकेतून या गुरूकुलाचा प्रमुख आचार्य वा गुरू कसा असावा, कोण असावा, याचा जेंव्हा मी विचार करू लागलो तेंव्हा मला पंडित वसंतराव गाडगीळ हेच या गुरूकुलाचे आचार्य शोभतील अशी भावना माझ्या मनात निर्माण झाली व त्यानुसार मी पंडितजींना ही जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केली, व ती त्यांनी मनापासून स्वीकारली, हे आमचं भाग्य. आमच्या जीवनात गुरूवर्य पूज्य साखरे महाराज, पंडित वसंतराव गाडगीळ, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ.विजय भटकर यांच्या झालेल्या भेटी हा आम्ही आमच्या पूर्वजन्माचा ऋणानुबंध मानतो.

ज्ञानाचे खरे उपासक असणारे पंडित वसंतराव गाडगीळ यांच्या जीवनाचा प्रवास व वाटचाल बारकाईने अभ्यासल्यानंतर, पंडित वसंतराव गाडगीळ हे माझ्यामते खऱ्याअर्थाने चालते-बोलते ज्ञानपीठच आहेत अशी माझी भावना आहे. भारतीय धर्म, संस्कृती आणि परंपरा हाच ज्यांचा श्वास आहे आणि संस्कृत हेच ज्यांनी आपले जीवन मानले आहे, अशा पंडित वसंतराव गाडगीळ यांच्यासारख्या उच्च विद्याविभूषित, ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचा अमृत महोत्सवी सोहळा आमच्या संस्थेच्या वतीने २००५ साली संपन्न झाली आणि त्यावर कळस म्हणजे २०१२ मध्ये तत्कालीन गुजरातचे मुख्यमंत्री आणि भारताचे आत्ताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदीजी यांनी पंडीजींच्या कार्याचा गौरव केला. दि. १८ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी पंडीतजींचे देहावसान झाल्याचे कळले आणि पंडितजींच्या संपूर्ण जीवनकार्य समोरून तरळून गेले. अशा या चालत्याबोलत्या संस्कृतच्या विद्यापीठाला आमच्या कराड कुटुंबियांच्या आणि एमआयटी शिक्षण संस्थेच्या वतीने **विनम्र श्रद्धांजली** वाहतो!

राष्ट्रसंचार

# मंगळवेढेकरांचे पुण्यातील हक्काचे व्यासपीठ !



आझादभाई पटेल
संस्थापक अध्यक्ष
मंगळवेढा तालुका रहिवाशी संघ



डॉ. वृषाली पाटील
महिला आघाडी अध्यक्ष
मंगळवेढा तालुका रहिवाशी संघ पुणे



विजय कुलकर्णी
अध्यक्ष
मंगळवेढा तालुका रहिवाशी संघ पुणे

पहिल्या काही वर्षांपासून पुण्यातील मंगळवेढेकरांचा स्नेहमेळा आयोजित होत आहे. यावर्षी आज रविवारी हा स्नेहमेळा आयोजित होत असताना त्याला समाधान आवताडे यांच्या सक्रिय सहभागाची जोड आहे.

आझादभाई पटेल यांच्या संकल्पनेतून या व्यासपीठाची निर्मिती झाली. पुणे हे प्रगतशील आणि विकसित शहर आहेत अशा विकसित शहराकडे आजूबाजूच्या जिल्ह्यांचा चेहरा असतो. पंढरपूर हे केवळ यात्रेवर जगणारे तर मंगळवेढा हे बऱ्यापैकी दुष्काळी पट्ट्यातील शहर त्यामुळे मागच्या पिढीचा बहुतांश एवढा हा आजूबाजूच्या विकसित शहराकडे असायचा त्यातूनच पुण्यामध्ये असणाऱ्या मोठ्या रोजगाराच्या आणि व्यवसायाच्या संधी पाहता अनेक मंगळवेढेकरांनी पुण्याचा रस्ता धरला.

परंतु पुण्यात जगणे आणि उभा राहणे तितके सोपे नाही तथापि मूळ मंगळवेढेकर असलेल्या अनेकांचा एक राबता या शहरांमध्ये होता त्याला एकत्रित करण्याचे काम आझादभाई पटेल यांनी केले. यातून स्थलांतरित असलेल्या मंगळवेढेकरांचे सुखदुःख समजून घेत त्याला एक व्यासपीठ देण्याचे काम या माध्यमातून होऊ लागले.

सुदैवाने समाधान अवताडे यांच्याकडे मागील पोटनिवडणुकीमध्ये आमदारकी आल्यानंतर त्यांनी याला राजकीय दृष्टीकोनातून पाहण्यापेक्षा एक सामाजिक जाणीव आणि त्याचे संवेदना विस्तारित करण्याच्या दृष्टीने पाहिले आणि या चळवळीला खऱ्या अर्थाने बळ आले.

आझाद भाई पटेल यांच्यासोबतच समीर उर्फ विजय कुलकर्णी यांचे त्यांना खंबीर साथ लाभली शैक्षणिक क्षेत्रामध्ये असलेल्या विजय कुलकर्णी यांनी हा सगळा मंगळवेढेकरांचा गोतावळा एकत्रित केला आणि प्रत्येकाला सामाजिक आर्थिक वैद्यकीय शैक्षणिक मदत देण्यासाठी एक मोठी केंद्र उभा राहिले कोरोनाच्या काळापासून ते शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीपर्यंत अनेक ठिकाणी त्या मंगळवेढेकरांच्या खांद्याला खांदा लावून ही चळवळ उभी राहिली आहे रात्री अपरात्री पटेल विजय कुलकर्णी संतोष सुडके यांच्यासारखी मंडळी येथील विद्यार्थ्यांसाठी आणि नोकरदारांसाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे.

यासोबतच येथे आलेल्या माहेरवाशीनेची तसेच नोकरी आणि शिक्षणानिमित्त आलेल्या मुलींची देखील संख्या मोठी आहे यातूनच मंगळवेढा तालुका रहिवासी संघटनेची पुणे महिला आघाडीची स्थापना झाली आणि डॉक्टर वृषाली पाटील यांनी त्यासाठी पुढाकार घेतला. शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या भाग्यश्री वठारे रुक्मिणी दोलतडे यांची त्यांना साथ लाभली.


महाराष्ट्र शासनाने आता लाडकी बहीण सुरू केली परंतु या सगळ्या मंगळवेढेकरांना लाडक्या बहिणींना समाधान अवताडे यांच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांपासून मदतीचा हात दिला जात आहे.

मंगळवेढा आणि पंढरपूर तालुक्यातील पुण्यामध्ये आलेल्या स्थलांतरित विद्यार्थ्यांना तसेच नोकरदार आणि महिलांसाठी एक हक्काची जागा असावी आणि तेथे वसतिगृह सुरू व्हावे ही अनेक वर्षांपासूनची सूप्त इच्छा आहे त्याला आता लवकरच मूर्त रूप मिळत आहे आपल्या हक्काची एक महिला पतसंस्था असावी आणि त्यातून या सगळ्या माहेरवासींनीना हक्काचे आर्थिक स्थैर्य लाभण्यासाठी मोठी योजना आकारास यावी यावरती देखील काम सुरू आहे संघटनेच्या नावाने एक ट्रस्ट स्थापन करून या माध्यमातून पुण्यामध्ये उपलब्ध असणाऱ्या अनेक संधी रोजगार चर्चासत्र या माध्यमातून मदतीचा हात दिला जावा याबाबतची एक व्यापक चर्चा सध्या सुरू आहे त्यासाठीच्या सदस्य निवडीची प्रक्रिया आणि ट्रस्ट स्थापन करण्याचे प्रक्रिया लवकरच पूर्ण होईल. हक्काचा रोजगार हे सगळ्यांची पहिली प्राथमिकता आहे त्यासाठी नोकरीविषयक एक व्यासपीठ निर्माण व्हावे आणि त्यातून येथे येणाऱ्या प्रत्येक पंढरपूर आणि मंगळवेढ्यातील तरुणाला नेमकी दिशा समजावी यासाठी एक योजनाबद्ध आराखडा आकारास येत असल्याचे विजय कुलकर्णी यांनी सांगितले. कुलकर्णी आणि त्यांचे शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणारे स्नेही यावर सध्या अहोरात्र मेहनत करीत आहेत.

आजच्या या मेळाव्याला नुकत्याच जाहीर झालेल्या निवडणुकांची पार्श्वभूमी असली तरी या संपूर्ण चळवळीमध्ये आजपर्यंत कुठल्याही लोकप्रतिनिधींनी सहभाग घेतला नाही मागील पोटनिवडणुकीत समाधान आवताडे हे प्रथमच राजसत्तेमध्ये पोहोचल्यानंतर त्यांनी ही चळवळ मोठी करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला किमान सातत्याने सर्वांना भेटून प्रश्न समजून घेण्यासाठी औत्सुक्य दाखवणे त्यामुळे या सर्वच मंडळींना अवताडे यांच्या नेतृत्वाबद्दलची एक आपुलकी दिसून येते.

## मंगळवेढेकर पुण्यालाही समृद्ध करतील : आमदार अवताडे यांचा मेगाप्लॅन

● पुणे हे महाराष्ट्राचे दुसऱ्या क्रमांकाचे शहर असून ते सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने पुढारलेले आहे. परंतु गेल्या दहा वर्षात औद्योगिक क्षेत्रात देखील प्रचंड प्रगतशील झाले आहे तथापि या प्रगतीला पुणेकरांच्या बरोबरीने पुण्याच्या बाहेरील मंडळी देखील तितकीच कारणीभूत आहेत या पुण्याला पुणे जिल्ह्याच्या बाहेरील महाराष्ट्रीय माणसाने खऱ्या अर्थाने समृद्ध केले आहे त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे पंढरपूर, मंगळवेढा या दोन्ही तालुक्यातील लोक मोठ्या प्रमाणात पुण्यामध्ये स्थलांतर होत आहेत किंबहुना हे स्थलांतर नोकरी निमित्ताने होत असताना ते उद्योगधंद्याच्या माध्यमातून पुढे जावे आणि येथे औद्योगिक योगदानाच्या माध्यमातून मंगळवेढेकर श्रीमंत व्हावा अशी माझी व्हिडिओ प्रिंट आहे मंगळवेढ्याचे खपते, पिकते, उगवते त्याचे एक मोठे मार्केटिंगचे व्यासपीठ पुणेकरांसाठी उपलब्ध करून देण्याचा एक ब्ल्यू प्रिंट मी आणत आहे गेल्या काही वर्षांपासून यावरती काम सुरू आहे.



● नोकरीच्या निमित्ताने येथे येणाऱ्या मंगळवेढेकराला त्याच्या समस्येतून मुक्त करायचे आहे परंतू त्याहीपेक्षा एक ठराविक काल नोकरी केल्यानंतर त्याला व्यावसायिक दृष्टिकोनातून सुस्थीर करण्यासाठी आपल्याला काही आर्थिक पाठबळ शासकीय संधी आणि त्या निमित्ताने सामूहिक संघटनांच्या माध्यमातून मार्केटिंग उपलब्ध होते का याच्या काही दिशा शोधण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

● लवकरच याबाबत एक मोठी आणि व्यापक चर्चा घडवून आणत स्थलांतरित झालेल्या मंगळवेढेकराला येथे श्रीमंत करायचे, प्रगतशील करायचं आणि त्यांच्या माध्यमातून पुण्याची देखील श्रीमंती वाढवायची या शहराचाही नावलौकिक वाढवायचा असा एक प्रयत्न या माध्यमातून करणार आहे अशी माहिती समाधान अवताडे यांनी राष्ट्र संचारशी बोलताना दिली.




**आधारस्तंभ : समाधान अवताडे**
**मार्गदर्शक : संजय अवताडे**
**संस्थापक अध्यक्ष आझाद भाई पटेल**
**अध्यक्ष श्री. विजय कुलकर्णी**
**सचिव : श्री. दत्तात्रय दोलतडे**
**सहसचिव : श्री. संतोष सुडके**
**उपाध्यक्ष :**
श्री. नंदकुमार स्वामी
श्री. अनिल कोळेकर
श्री. शिवाजी पवार
श्री. बिरा वाघमोडे
**खजिनदार : श्री. रमेश माने**
सहखजिनदार : श्री. बसवराज पाटील
कार्याध्यक्ष : श्री. आप्पासो पवार
सहकार्याध्यक्ष : श्री. मल्लिकार्जुन पाटील
**सदस्य**
श्री. उमेश कराळे
श्री. सूर्यभान भोसले
श्री. संजय माळी
श्री. विजय माने
श्री. मंगेश मागणे
श्री. बंडू शिंदे
श्री. संतोष सावंजी
श्री. सुनिल करपट्टी
श्री. पांडुरंग भोसले
श्री. नागेश चव्हाण

**◆ मंगळवेढा तालुका रहिवासी संघटना, पुणे महिला आघाडी**
अध्यक्षपदी - डॉ. वृषाली पाटील
सचिव : भाग्यश्री वठारे
सहसचिव : रुक्मिणी दोलतडे
**उपाध्यक्ष :**
सौ. श्रीदेवी दोलतडे
सौ. सुप्रिया शिंदे
सौ. सारिका दोलतडे
सौ. सुवर्णा दोलतडे
खजिनदार : सौ. श्वेता माळी
सहखजिनदार : कु. सिद्धानी किरकिरे
कार्याध्यक्ष : सौ. वर्षा शहापुरे
सहकार्याध्यक्ष : सौ. दीपाली नागणे
**सदस्य**
सौ. अश्विनी गायकवाड
सौ. ज्योती मोडक
सौ. कविता फोपळे
सौ. वंदना शेजाळ
सौ. सुवर्णा फुलमाम्डीकर
सौ. उज्वला गवळी
सौ. राजश्री हुरने
सौ. सुजाता कोळेकर
सौ. वैशाली कोळेकर
सौ. अर्चना नागणे

राष्ट्रसंचार

# तणावमुक्त आनंदी कार्यसंस्कृती जपण्याची गरज!

पुण्यातील अर्नेस्ट अँड यंग ( ई वाय) कंपनीच्या पुणे कार्यालयातील एका 26 वर्षे वयाच्या ॲना नावाच्या चार्टर्ड अकाउंटंट मुलीने आत्महत्या केली. तिच्या आईने कंपनी व्यवस्थापनाविरुद्ध गंभीर तक्रार केलेली असून कामाच्या अतिताणामुळेच ही आत्महत्या झाल्याचा आरोप केला आहे. या घटनेच्या निमित्ताने उपस्थित होत असलेल्या विविध समस्यांचा घेतलेला हा वेध.



भारतात सध्या चार्टर्ड अकाउंटंट क्षेत्रामध्ये "बिग फोर" म्हणजे डेलॉईट, प्राईस वॉटर हाऊस कूपर्स, लंडन स्थित अर्निस्ट अँड यंग व नेदरलँड मधील केपीएमजी या चार आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा समावेश आहे. याशिवाय काही अन्य मोठ्या कंपन्या असून तेथे अक्षरशः लाखो चार्टर्ड अकाउंटंट काम करीत आहेत. सुमारे चार महिन्यापूर्वी अर्नेस्ट अँड यंग (ई अँड वाय) या ख्यातनाम चार्टर्ड अकाउंटंट कंपनीमध्ये एका तरुण मुलीने कामाच्या अतिताणापोटी आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेबाबत त्या मुलीची आई अनिता अगस्ती यांनी कंपनी व्यवस्थापनाविरुद्ध गंभीर आरोप केलेले आहेत. किंबहुना याची दखल राज्य शासनाच्या कामगार विभागाने घेतली असून या कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या एकूणच कार्यपद्धतीबाबत थेट चौकशी सुरू केलेली आहे.

पुण्यासारख्या शहरात घडलेली ही घटना ही केवळ पहिलीच घटना नाही तर आज जगभरातील अनेक देशांमध्ये तरुण व्यावसायिकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसते. जपानमध्ये २०२३ मध्ये २९०० तरुणांनी अती कामापोटी आत्महत्या केलेल्या होत्या. जपानी भाषेत 'करोशी' असे त्यास संबोधले गेले होते. भारतासह जगभरातील सर्व खाजगी किंवा अन्य व्यावसायिक कंपन्यांचे उद्दिष्ट केवळ प्रचंड नफा मिळवणे असल्यामुळे त्या सातत्याने उत्पादकतेमध्ये वाढ करत राहतात. याचा परिणाम कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींच्या मानसिक आरोग्यावर आणि सुख स्वास्थ्यावर होतो हे यामागचे खरे कारण आहे. दोन वर्षांपूर्वी भारतातील अशा आत्महत्यांचे प्रमाण ११ हजाराच्या घरात होते आणि या मागचे खरे कारण आहे ते कंपन्यांमध्ये असलेल्या नफेखोरी या हिंसक कार्य संस्कृतीचे. आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येक कंपनीला अस्तित्व टिकवण्यासाठी खर्चामध्ये कपात करणे, कार्यक्षमता वाढवणे व त्याचप्रमाणे उत्पादकतेत वाढ करणे हे अपरिहार्य आहे.याचा परिणाम प्रत्येक कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर होत राहतो. प्रत्येक कंपनी अवास्तव कामाच्या अपेक्षांचे ओझे कर्मचाऱ्यांवर सातत्याने लादत असते. त्यामुळे दररोजच्या आठ तासाच्या ऐवजी १२ ते १६ तास काम करावे लागते. आणि हे काम करत असताना कर्मचारी सातत्याने प्रचंड मानसिक तणावाखाली काम करत राहतात. कदाचित या कर्मचाऱ्यांना उत्तम वेतनही मिळत असते परंतु केवळ पैसे मिळाल्याने समाधान लाभत नाही कारण त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य हे जवळजवळ संपुष्टात येत असते. एक प्रकारची ही कामाची गजबजलेली संस्कृती तरुणाईवर मोठा आघात करत आहे.



सामाजिक
प्रा. नंदकुमार काकिर्डे
राष्ट्रसंचार

कामामध्ये असणारी व्यस्तता ही हानिकारक ठरते असेही लक्षात आलेले आहे. अनेक कंपन्या सातत्याने त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून उत्पादकतेची जास्तीत जास्त अपेक्षा करत राहतात आणि अखेर या कर्मचाऱ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा विचार कुठेही केला जात नाही ही वस्तुस्थिती आहे. अर्थात हा सर्व प्रकार काही नव्याने घडतोय असे नाही. जगभरात सर्वत्र तंत्रज्ञान, पैसा, कायदा यामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होत राहिल्याने केवळ सतत कार्यरत राहिल्याने या कंपन्यांचे प्रश्न आणखी गंभीर होताना दिसत आहेत. प्रत्येक कर्मचाऱ्यांची काही कार्यक्षमता असते परंतु त्याला सातत्याने जादा पैशाचे आमिष दाखवले जाते आणि या साऱ्या प्रक्रियेमध्ये कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेचा किंवा शारीरिक क्षमतेचा कोठेही विचार केला जात नाही आणि अखेर त्याची परिणीती असह्य ताणामध्ये होते. यातूनच कर्मचाऱ्यांच्या मनात निर्माण होणारी सततची चिंता,सतत उदास असणे किंवा चिडचिड करणे आणि नैराश्याच्या गर्तेत जाण्यामध्ये होते. त्यातूनच हे आत्महत्यांचे प्रमाण प्रमाणाबाहेर गेलेले सर्वत्र दिसते.

- प्रत्येक कर्मचाऱ्यांशी सातत्याने संवाद साधणे व त्यातून त्याची कार्यक्षमता कशाप्रकारे वाढवली जाईल किंवा मनाचे स्वास्थ्य त्याला लाभून त्याच्या कामात कशी सुधारणा होईल यासाठी सर्व कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्याची गरज आहे.
- ताणतणावाचे व्यवस्थापन हा आज परवलीचा शब्द झाला आहे.परंतु प्रत्यक्षामध्ये त्याचा किती उपयोग होतो आहे हे कंपनीने पाहण्याची वेळ आली आहे.
- कंपनीची उत्पादकता आणि त्यांना मिळणारा नफा याची गणित बदलण्याची आवश्यकता आहे.
- जर प्रत्येक कर्मचारी आनंदी आणि समाधानी असेल तरच त्याच्या हातून कार्यक्षमपणे काम केले जाऊ शकते हे निश्चित.
- समतोल आणि शाश्वत कार्य संस्कृती हा या सगळ्या चा गाभा आहे आणि त्या दृष्टिकोनातूनच प्रत्येक कंपनीने यावर जाणीवपूर्वक काम केले तर नजीकच्या भविष्यकाळात हे आत्महत्यांचे प्रमाण कमी होईल यात शंका नाही.
- कंपन्या व कर्मचारी या दोघांनी दोन्ही घटकांनी एकत्र येऊन काही ठोस पावले उचलून वाजवी कामाचा ताण व तास यातून परिपूर्ण आरोग्य व आयुष्य यांची सांगड घातली पाहिजे.

## फेरमुल्यांकन करण्याची वेळ

माहिती तंत्रज्ञान कंपन्या किंवा विविध प्रकारच्या सेवा देणाऱ्या कंपन्यांमध्ये याबाबत सतत वेगवेगळे उपक्रम हाती घेतले जातात. परंतु प्रत्येक कंपनीनेच कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या एकूण कामाचे फेरमुल्यांकन करण्याची निश्चित वेळ आलेली आहे. अनेक कंपन्या त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रकारच्या सोयी सुविधा देण्याचा प्रयत्न करत असतात. त्यामध्ये खेळाच्या सुविधा तसेच उपहारगृह किंवा मनोरंजनाच्या सुविधा दिल्या जातात. एक प्रकारे कर्मचाऱ्यांना मानसिकदृष्ट्या समाधान चांगल्या प्रकारे कसे लाभेल याचे प्रयत्न केले जातात परंतु दुसरीकडे त्यांच्याकडून व्यवस्थापनाने सातत्याने केलेल्या अपेक्षांमध्ये वाढ होत जात असल्यामुळे कर्मचाऱ्यांना हा समतोल साधणे जमत नाही. यासाठी कर्मचाऱ्यांचे कामाचे तास हे अत्यंत प्रमाणित केले पाहिजेत. शारीरिक कष्ट असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आठ तासांची कामाची शिफ्ट किंवा पाळी असते.मात्र ज्यांना मानसिक कष्ट किंवा बौद्धिक कष्ट होणार असतात त्यांना सहा तासापेक्षा जास्त काम करणे हे त्रासदायक ठरते. प्रसारमाध्यमांसारख्या क्षेत्रांमध्ये कर्मचाऱ्यांची शिफ्ट ही आठ तासांच्या ऐवजी सहा तासांची असते. या सर्व गोष्टी लक्षात घेता प्रत्येक कंपनीने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्याची सातत्याने काळजी घेऊन त्या दृष्टिकोनातून उपायोजना करण्याची निश्चित गरज आहे. ज्याप्रमाणे शाळांमध्ये विद्यार्थी शिकत असताना प्रत्येक विद्यार्थी व्यवस्थितपणे शिकेल असे नसते त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांना अध्ययन अक्षमता असते.त्यांच्यासाठी वेगळे प्रयत्न समुपदेशन करून केले जाऊ शकतात. त्याच धर्तीवर कंपन्यांमध्येही कर्मचाऱ्यांच्या मानसिक समुपदेशनाचा उपक्रम हाती घेतला गेलेला दिसत आहे.

# रम्य आठवणींचे नजराणे

**काही जुनी हिंदी गाणी खरंच कितीही वेळा ऐकली तरी परत परत ऐकावीशी वाटतात. कारण, त्यातील शब्द आपल्याला रम्य आठवणींचे सुखद नजराणे देतात. जसं व.पु. म्हणतात, "काही रम्य आठवणींचे नजराणे देण्याचं सामर्थ्यही भूतकाळात असतं.."**



एखाद्या जोडप्याचं नवीन लग्न होतं तेव्हा तिचं संपूर्ण विश्व म्हणजे तिचा नवरा अर्थात जोडीदार असतो. त्याचं असणं, त्याचं बोलणं हे सगळं तिला हवंहवंसं वाटणारं असतं. कारण, ती त्याच्या प्रेमात आकंठ बुडालेली असते. कोणत्याही स्त्रीला कुटुंबातील व्यक्तीच्या आनंदात आपला आनंद मानणं हे कधीही आवडते. मी आता ज्या गाण्याबद्दल लिहिते आहे ते गाणं चित्रित झालं आहे अभिनेत्री जया बच्चन यांच्यावर. जोडीदारावरचं आपलं प्रेम व्यक्त करताना ती म्हणते आहे,

**"अब तो हैं तुमसे हर खुशी अपनी,
तुम पे मरना है जिंदगी अपनी.."**

व.पु. म्हणतात, "प्रेम म्हणजे नेमके काय तर समोरच्याच्या डोळ्यात आपली प्रतिमा पाहणं.." हे प्रेम असंच होतं का? या साठी मनात त्या व्यक्तीप्रती ओढ असते, जिव्हाळा असतो. कोणतंही नातं हे एकतर्फी कधीच नसावं. प्रेमात आपण जेव्हा पडतो तेव्हा सारं जग अगदी रंगीबेरंगी दिसतं. या गाण्यात नेमकं हेच नायिका म्हणते आहे, जेव्हा पासून तो तिच्या आयुष्यात आला आहे तेव्हा पासून तिच्या मनात त्याचेच विचार रुंजी घालत आहेत. कारण, मन हे गुंतलेलं असतं ना. एरव्ही व.पु. या मनाला चुकार मन म्हणतात पण हेच मन जेव्हा प्रेमाच्या गावात जाते तेव्हा ते बेभान होते. तिच्या या प्रेमात समर्पण आहे आणि ते खरं प्रेम असल्यामुळे कोण काय बोलतय या पेक्षा तिला तिचा जोडीदार महत्वाचा आहे. प्रेमात अटी, शर्ती नसाव्यात. तिथे सहवास, ओढ आणि समर्पणाची भावना असेल तर त्या प्रेमात प्रचंड ताकद असते.

**"कोई बनाये बाते,चाहे जब जितनी.."**

तुमचा जोडीदार तुमच्यावर कितीही रागावला, रुसला तरी तुमचं त्याच्या वरचं प्रेम हे कधीच कमी होत नाही. कारण, त्या प्रेमात तुम्ही आकंठ बुडालेले असता की तो रुसवा देखील प्रेमाच्या चार क्षणांनी घालवायची ताकद तुमच्यात असते. जसं व.पु. म्हणतात, "आपल्या आवडत्या व्यक्तीचं आपल्या सोबत असणं ही जगातली सर्वात मोठी कमाई असते.." इथे तर आयुष्याचा जोडीदारच आहे.. फक्त या प्रेमात ईगो नसावा. दोघांपैकी एक जण जर पुढे जात असेल तर दुसऱ्याने पाय मागे खेचण्यापेक्षा किंवा त्या गोष्टींवरून रुसवे फुगवे करण्यापेक्षा पुढे जायला जर प्रोत्साहन दिले तर त्या नात्याची वीण अधिक घट्ट होते. जेव्हा एकाच क्षेत्रात दोघेही काम करतात तेव्हा तिथे बरोबरी ही ओघाने आलीच. कारण, तिथे माणसापेक्षा त्याच्या आवाजावर श्रोते मंत्रमुग्ध होतात. या चित्रपटातील त्याचा सहवास हा तिला इतका हवाहवासा वाटणारा असतो की या साऱ्या गोष्टींचा देखील तिला विसर पडतो. आज त्याच्यामुळे ती प्रसिद्ध आहे हे ती त्याला सांगू पाहत आहे. म्हणून तर ही साथ तिला कायम हवी आहे.



ललित
मानसी देशपांडे (विरार)
राष्ट्रसंचार

**"देखो कहाँ ले जाये बेखुदी अपनी,
अब तो है तुमसे हर खुशी अपनी.."**

हा चित्रपट म्हणजे, नात्यात जेव्हा प्रेमाची जागा ईगो घेतो त्यावेळी ते नाते कसे कोमेजते हे दाखवले आहे. तुम्ही बाहेर कितीही प्रसिद्ध असाल पण चार भिंतीत जर तो स्वभाव जाचक असेल, संशयी असेल तर ते काहीच कामाचे नाही. कारण,' अभिमान..' म्हणजे काय तर गर्व. मग तो कसलाही असो तो वाईटच.. हेच व.पु. म्हणतात," सुरांच्या निकट राहणारा कलावंत एरव्हीही एखाद्या स्वरा इतका कोमल असावा लागतो, तेव्हा त्याने मैफलीत बेसूर आणि मैफली बाहेर असुर असू नये.." जया बच्चन यांचा उत्तम अभिनय, ते गाणं गाताना जे काही भाव त्यांनी चेहऱ्यावर आणले ते इतके शुद्ध होते की तो चेहराच सांगतो.

**"अब तो हैं तुमसे हर खुशी अपनी.."**

या सुंदर गाण्यावर गुलजार साहेबांची एक शायरी

**"मुश्किल भी तुम हो, हल भी तुम हो,
होती है जो दिल में, वो हलचल भी तुम हो.."**



# ऑनलाइन शॉपिंग करताय? सावधान!




आजकाल इंटरनेटमुळे अनेक व्यवहार करणे सुलभ झाले आहेत. मात्र, जरी ही सुलभता असली तरी अनेक धोके आहेत. तुमची याच्या माध्यमातून फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही गोष्टींची खबरदारी घेणे आवश्यक आहे.ऑनलाइन म्हणजेच इंटरनेट शॉपिंग करण्याकडे ग्राहकांचा कल दिसून येतो. घरबसल्या खरेदी असल्यामुळे बाजारातली गर्दी, वेळ आणि इंधनाची बचत होते. परंतु ऑनलाइन शॉपिंगबद्दल लोकांच्या मनात अनेक शंकाकुशंका असतात.


प्रतिष्ठित आणि सुरक्षित साइट्सची निवड तुम्ही खरेदीसाठी साइटची निवड करता तेव्हा ब्राउझरच्या अ‍ॅड्रेस बारमध्ये छोटे कुलपाचे चिन्ह आहे का याची खात्री करा.

वेबसाइटचा पत्ता https:// पासून सुरू व्हायला हवा. येथे s म्हणजेच secure. तरीही खरेदी करण्याआधी काही गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. ज्या योजना अतिशय आकर्षक वाटतात त्याची खात्री करून घेणे महत्वाचे आहे. जर एखाद्या संकेतस्थळाबाबत खात्री वाटत नसल्यास मित्र, नातेवाइकांकडे चौकशी करा. इंटरनेटवर सर्च करून त्या साइटबद्दलची मतं जाणून घ्या आणि नंतरच खरेदीचा बेत आखावा. माहीतर तुमची फसवणूक होण्याची शक्यता आहे.

ज्या वस्तू खरेदी करावयाच्या आहेत. त्याचे आधी पैसे भरू नका. वस्तू घरी आली की त्याचे पैस द्यावेत. तसेच ऑनलाइन पैसे भरण्यापूर्वी तुम्हाला पासवर्ड विचारला जातो जेणेकरून तुमची वैयक्तिक माहिती गोपनीय राहील. हा पासवर्ड निवडताना तुम्हाला अक्षरे, अंक आणि चिन्हे यांची सरमिसळ केली पाहिजे. सार्वजनिक जागांवर wi-fi असलेल्या ठिकाणी ऑनलाइन खरेदी टाळावीच.

ऑनलाईन खरेदीसाठी तुम्ही तुमचा क्रेडिट किंवा डेबिट कार्ड नंबर तेथे नोंदवू शकता. जेणेकरून तुमच्या खात्यातून पैसे वळते होतील. या सेवेसाठी तुम्हाला क्रेडिट कार्ड फी भरणे आवश्यक आहे. एकदा तुम्ही पैसे भरलेत की submit किंवा proceed चे बटन क्लिक करू शकता. त्यानंतर अधिक सुरक्षिततेसाठी परत लॉगइन आणि पासवर्ड विचारला जातो. काही साइट्स मध्यस्थाचे काम करतात. पण थोडी खबरदारी घ्यावी.

आपल्या बँकेचा ऑनलाइन पासवर्ड कुणालाही देऊ नये. ई-मेलने पाठवू नये. जेव्हा तुम्ही ऑनलाइन खरेदी करता तेव्हा क्रेडिट कार्डसाठी बँकेचा पिन किंवा पासवर्ड विचारला जात नाही हे लक्षात घ्या. त्याऐवजी ३-४ अंकी सिक्युरिटी नंबर विचारला जातो. बहुतेक साइटवर तुम्ही दिलेली गोपनीय माहिती साठवली जात नाहीच, त्यामुळे काळजीचे कारण नाही. सरतेशेवटी साइटवरून खरेदी करताना त्यावर सिक्युरिटीचे चिन्ह आहे की नाही हे तपासून पाहाणे गरजेचे आहे.



आली दिवाळी!
प्रा. योगेश हांडगे-पाटील
(सहाय्यक प्राध्यापक)
राष्ट्रसंचार

## ऑनलाइन शॉपिंग टिप्स

- शक्यतो नावाजलेल्या वेबसाइट्सवरून शॉपिंग करा . जेणे करून काही अडचण आल्यास त्यांच्याशी थेट संपर्क साधता येतो.
- कोणत्याही साइटवरून शॉपिंग करताना खाली ' लॉक सिम्बॉल ' आहे का याची खात्री करून घ्या आणि पेमेण्ट करताना आपल्या ब्राउजरवर असणाऱ्या अ‍ॅड्रेस बारमध्ये द्धह्लह्लश्चह्य आहे याकडे लक्ष असू द्या, कारण सुरक्षित व्यवहार होत असल्याची ती खूण असते .
- कोणतीही शॉपिंग वेबसाइट तुमची जन्मतारीख किंवा तुमची अन्य माहिती मागवत नाही . पण जर तुमची जन्मतारीख आणि क्रेडीट - डेबिट कार्ड नंबर जर कोणालामिळाला तर ते कॉम्बीनेशन करून कार्ड वापरायचा प्रयत्न करू शकतात .
- आपले क्रेडीट आणि बँक स्टेटमेण्ट चेक करत राहा आणि कोणतेही अन्य चार्जेस लावलेले नाहीत हे पडताळा .
- तुमचा कॉम्पुटरवर अपडेटेड ॲण्टिव्हायरस आणि लेटेस्ट ऑपरेटिंग सिस्टम अपडेट्स इन्स्टॉल्ड आहेत याकडे लक्ष असू द्या .
- आपला पासवर्ड कोणाला सहज कळेल असा नसावा .
- शक्यतो बाहेरच्या मशीन्सवरून ऑनलाइन ट्रान्झॅक्शन करणे टाळावे .
- वायफाय नेटवर्क सिक्युअर्ड आणि पासवर्ड प्रोटेक्टेड असावे .

## ऑनलाईन शॉपिंगचे फायदे

1. जाण्या-येण्याचा वेळ वाचतो. बऱ्याच वेळेस एखाद्या वस्तूवर चांगल्याप्रकारे सूट मिळते.
2. वस्तुची उपलब्धता आणि किंमत कळल्याने इतर वस्तुंबरोबर तुलना करता येते.
3. कधीही खरेदी करू शकत कारण इथे वेळेच बंधन नाही.
4. बऱ्याच वेबसाइटवर निरनिराळ्या वस्तुंच्या खरेदी नंतर ती वस्तू खरेदी केलेल्या लोकांच्या प्रतिक्रिया देण्याची सोय असते त्यामूळे आपण खरेदी करत असलेली वस्तू कशी आहे याचा अंदाज येतो.
5. खरेदी केलेल्या वस्तुचे पैसे देण्याचे बरेच सोयीचे पर्याय उपलब्ध असतात.

## ऑनलाईन शॉपिंगचे तोटे

1. खरेदी केलेली वस्तू आपल्याला ताबडतोब मिळत नाही. ती कुरीअरने येण्यासाठी 3-4 दिवस वाट पहावी लागते.
2. बऱ्याच वेळेस वेबसाइटवर खरेदी केलेली वस्तू आणि नंतर घरी आलेल्या वस्तूमध्ये तफावत असते. याचे कारण नंतर आपली वस्तू उपलब्ध नव्हती असे सांगितले जाते.
3. कुरीअरने आपल्या घरी येईपर्यंत ती सुरक्षित राहण्याची जबाबदारी कोणीच स्वीकारत नाही.
4. काही वेळेस आपली वस्तू आपल्यापर्यंत पोहोचतच नाही व तिची पोच झाली अशी नोंद केलेली असते.
5. प्रत्यक्षात ऑनलाईन शॉपिंगमध्ये सोयीच्या तसेच गैरसोयीच्या ब-याच गोष्टी आहेत. असे जरी असले तरी वाढती मागणी आणि जागृत ग्राहक यामूळे ऑनलाईन शॉपिंगची सुरक्षितता वाढत आहे

# संस्कृतीरंग..

हे पुस्तक सुचवले होते डॉ. गीता जोशी यांनी. पुस्तकाची अर्पणपत्रिका त्यातील भाषा तुमच्या मनाचा ठाव घेते. आत्मतळातले प्रत्येक स्पंदन अचूक टिपणारे आई अप्पा...मनोगतामध्ये संस्काराची व्याख्या छान केली आहे. संगणकीय भाषेत बोलायचे झाले म्हणजे एखाद्या समाजाकडून व्यक्तीचे झालेले collective programing म्हणजे संस्कार.


Cultura या मूळ लॅटिन शब्दापासून कल्चर शब्द आला. लॅटिन मध्ये cultura चा अर्थ, शेतकऱ्याने केलेली जमिनीची मशागत. संस्कार हे खरच मनाची मशागत करत असतात. रॉन हबर्ड या शास्त्रज्ञाने १९५७ मध्ये एक विधान केले आहे. "Electronic is going to capture the human soul."

ब्रुईन आणि टिळक यांच्या भेटीच्या कथेने पुस्तकाची सुरुवात होते. तो किस्सा काय आहे, हे पुस्तकात जरुर वाचावा.

सांस्कृतिक साक्षरता म्हणजे काय हे या पुस्तकात मांडले आहे. पुस्तकात बंगलोरच्या मुमताजचा उल्लेख आहे. भारताच्या लोकसंख्येची घनता प्रती चौरस किलोमीटर २७९ आहे. जर्मनीत प्रति चौरस किलोमीटर २३१ लोक रहातात. तर मुंबईत हीच संख्या २२,००० आहे. माणसा माणसात आक्रमकता वाढते यात नवल ते काय. एक उंदराचा शास्त्रीय प्रयोग आधार म्हणुन पुस्तकात आहे. पुस्तकात संदर्भ म्हणुन भरपुर फोटो आहेत. एकूणच जागतिक आणि भारतीय संस्कृतीरंग मन मोहवून टाकतात. लेखिकेचे रसाळ भाषेतील संशोधन अचंभित करते.

| | |
|---|---|
| **पुस्तक:** | संस्कृतीरंग |
| **लेखिका:** | वैशाली करमरकर |
| **प्रकाशक:** | राजहंस प्रकाशन |
| **पृष्ठे:** | ३०६ |
| **मुल्य:** | ३०० ₹ |



# भारताचे 'रत्न' रतनजी टाटा

"सरकार जेव्हा भारतरत्न म्हणून एखाद्या व्यक्तीला सन्मानित करते तेव्हापासून त्या व्यक्तीच्या नावापुढे भारतरत्न म्हणून लावले जाते. पण ज्येष्ठ उद्योगपती आणि अत्यंत उदार व्यक्तीमत्व असणाऱ्या रतनजी टाटा यांनी ज्याप्रमाणे देशातल्या तळागाळातल्या लोकांसाठी स्वतःला समर्पित केलं आणि प्रत्येक संकटात ते ज्या प्रमाणे धावून आले ते पाहून सोशल मीडियावर सगळ्यांनी श्रद्धांजली वाहताना त्यांना 'भारतरत्न' हीच उपमा दिली. हे पाहून राज्यसरकार आणि अनेक राजकीय सामाजिक संघटनांनी सुद्धा केंद्रात रतनजी टाटा यांना भारतरत्न हा भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान देऊन सन्मानित करावे हि विनंती केली आहे." महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रतनजी बदल "श्रीमंत योगी" हा शब्द वापरला तो खऱ्या अर्थाने सार्थक ठरतो. त्यांनी त्याच संपूर्ण आयुष्य एका योगी तपस्वी सारखे लोक कल्याणकारी विचाराने जगले.







## आदरांजली

सचिन तळे

राष्ट्रसंचार

देशासाठी सर्वोच्च प्रतीचे काम करणाऱ्या भारताची कीर्ती जगभरात वृद्धींगत करणाऱ्या व्यक्तीस हा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरविले जाते. अशा व्यक्तींनी उभी हयात यासाठी घालविलेली असते. अनेकांना तर हा सन्मान मरणोत्तर दिला गेला आहे. रतन टाटा हे फक्त देशातच नव्हे तर जगभर त्यानी त्यांच्या कार्यातून भारताचे नाव उद्योग क्षेत्रात पुढे घेऊन आले आहेत. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले अन् भारताने काय गमावलं हे फक्त या देशातला कामगार वर्गच सांगू शकतो. "मी गेलो तर कंपनी बंद करू नका, कामगारांचं नुकसान करू नका" अश्या शब्दात त्यांनी त्यांच्या पूर्ण सहकाऱ्यांना संदेश दिला होता. कोरोनाच्या महामारीत जेव्हा देश संकटात होता तेव्हा कामगारांच्या आणि देशवासीयांच्या मागे सर्वात प्रथम रतनजी टाटा उभे राहिले. जेव्हा जेव्हा संकटाची चाहूल लागली तेव्हा स्वतःहून रतनजी धावून आलेत. अश्या व्यक्तीच्या जाण्याने संपूर्ण देशात शोककळा पसरली. त्यांचे आदर्श, विचार आणि तत्त्वे नेहमी युवकांना मार्गदर्शक ठरली आहेत. रतन टाटा यांना २००० मध्ये पद्मभूषण आणि २००८ मध्ये पद्मविभूषण, भारत सरकारचा तिसरा आणि दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला होता. टाटा यांना २००६ मध्ये महाराष्ट्रातील सार्वजनिक प्रशासनातील त्यांच्या कामासाठी 'महाराष्ट्र भूषण' आणि आसाममध्ये कर्करोगाच्या उपचारात योगदान दिल्याबद्दल २०२१ मध्ये 'आसाम वैभव' असे विविध राज्य नागरी सन्मानही मिळाले आहेत. रतन टाटा हे केवळ उद्योगपती नव्हते तर ते सामाजिक जबाबदारी, आरोग्यसेवा आणि शिक्षणाचे खंबीर पुरस्कर्ते होते.

तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की टाटा स्टीलच्या ब्लास्ट फर्नेसची देखरेख करणारी रतन टाटा यांची पहिली नोकरी होती. वास्तविक अमेरिकेत असताना रतन टाटा यांना 'आयबीएम' या बलाढ्य कंपनीचे बोलावणे होते. त्यांनी ते नाकारले आणि त्याऐवजी भारतात परत येऊन टाटा समूहाच्या पोलाद कारखान्यात एखाद्या अन्य कुशल कामगाराप्रमाणे नोकरी पत्करली. सन १९९२ मध्ये इंडियन एअरलाइन्सचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यांना विचारण्यात आले, दिल्ली ते मुंबई दरम्यान कोणता प्रवाशी आहे, ज्यांनी तुमच्यावर सर्वाधिक प्रभाव टाकला. त्यात सर्वाधिक कर्मचाऱ्यांनी रतन टाटा यांचे नाव सांगितले. जेव्हा त्याचे कारण शोधले तेव्हा समजले, ते एकमेव असे व्हिआयपी होते, जे नेहमी एकटे जात होते. त्यांच्यासोबत त्यांची बॅग आणि फाईल उचलण्यासाठीसुद्धा असिस्टेंट नव्हता. विमानाचे उड्डाण होताच ते आपले काम सुरु करत होते. देशात सात्त्विकतेने संपत्ती निर्मिती होऊ शकते आणि सभ्य, सुसंस्कृत, सालस, सोज्वळतेने राहता येते हे रतन टाटा यांनी दाखवून दिले. ते अत्यंत शिस्तबद्ध आणि संतुलित वर्तन असलेले टाटा हे पहिले उद्योगपती होते ज्यांनी एक लाखात कार देण्याचा संकल्प पूर्ण केला. रतन टाटा त्यांच्या साधेपणाने त्यांना इंडस्ट्रीत विशेष स्थान मिळवून दिले होते. टाटा समूहाचे जागतिक समूहात रूपांतर करण्यात, ऑटोमोटिव्ह, पोलाद, तंत्रज्ञान आणि आदरातिथ्य यासारख्या क्षेत्रांमध्ये त्याचा प्रभाव वाढवण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने जग्वार लँड रोव्हर आणि कोरस स्टीलसह ऐतिहासिक अधिग्रहण केले आणि जागतिक स्तरावर आपले स्थान मजबूत केले.

### सामाजिक कल्याणाला प्राधान्य

● अफाट संपत्ती आणि अफाट प्रभाव लोकांवर असूनही, रतन टाटा त्यांच्या नम्रता आणि साधेपणासाठी प्रशंसनीय ठरलेत. नैतिक नेतृत्वाबद्दलचे त्यांचे समर्पण आणि व्यवसायाचा चांगल्यासाठी शक्ती म्हणून वापर करण्याचा त्यांचा विश्वास यामुळे ते सर्वांसाठी एक आदर्श ठरले. रतन टाटा यांचा वारसा केवळ त्यांच्या व्यावसायिक कामगिरीनेच नव्हे तर त्यांच्या नैतिक नेतृत्व आणि सामाजिक जबाबदारीनेही दिसून आले. त्यांनी नेहमीच सामाजिक कल्याणाला प्राधान्य दिले, शिक्षण, आरोग्यसेवा आणि ग्रामीण विकासासाठी संसाधने समर्पित केली. रतन टाटा हे केवळ व्यापारी नेते नव्हते; त्यांची दृष्टी, सचोटी आणि नम्रता यांनी भारताच्या कॉर्पोरेट लँडस्केपवर अमिट छाप सोडली होती. त्यांच्या परोपकारी हितसंबंधांसाठी त्यांची खूप प्रशंसा झाली, ज्यात शिक्षण, औषध आणि ग्रामीण विकासामध्ये संशोधन आणि सुधारणांचा समावेश आहे. त्यांनी रुग्णालये आणि संशोधन केंद्रे स्थापन केली आणि वर्धित केली ज्यांनी कर्करोगाची काळजी घेण्यास मदत केली. टाटा समूह आणि टाटा ट्रस्ट नावाच्या संबंधित परोपकारी समूहाने दिलेल्या देणग्यांमुळे यूएस विद्यापीठांमध्ये विविध संस्था आणि शिष्यवृत्तींची स्थापना झाली आहे. यामध्ये कॅलिफोर्निया विद्यापीठ , सॅन दिएगो येथे जैविक आणि भौतिक विज्ञान संशोधन सुविधा आणि हार्वर्ड बिझनेस स्कूलमधील एक कार्यकारी केंद्र यांचा समावेश आहे.

### प्राणीप्रेमी - एक आदर्श

● टाटा त्यांच्या प्राण्यांवर, विशेषतः कुत्र्यांवरच्या प्रेमासाठी ओळखले जात होते. टाटांनी आयुष्यभर प्राणी कल्याणाचा पुरस्कार केला. बॉम्बे हाऊस, टाटा समूहाच्या मुख्यालयात, टाटा यांनी हे सुनिश्चित केले की भटक्या लोकांना सुसज्ज कुत्र्यासाठी प्रवेश मिळेल आणि त्यांना आवारात मुक्तपणे फिरण्याची परवानगी आहे. प्राण्यांच्या हक्कांचे उत्कट समर्थक म्हणून ओळखले जाणारे, त्यांनी लंडनमधील बकिंगहॅम पॅलेसमधील एक शाही कार्यक्रम देखील वगळला होता. कॉर्पोरेट टायटनने मुंबईच्या महालक्ष्मी परिसरात टाटा ट्रस्ट्स स्मॉल ॲनिमल हॉस्पिटल सुरू केले. त्यांनी १६५ कोटी रुपयांचा पाळीव प्राणी रुग्णालय प्रकल्प सुरू करण्याची घोषणा केली तेव्हा ज्येष्ठ उद्योगपती रतनजी टाटा म्हणाले, "पाळीव प्राणी हे आमचे कुटुंब आहे आणि त्यांचे जीवन प्रत्येक पाळीव पालकांसाठी महत्त्वाचे आहे. मी आजूबाजूला पाहिले आणि पायाभूत सुविधांचा अभाव पाहिला. भारतातील पाळीव प्राणी, यामुळे मला आश्चर्य वाटले की, एवढ्या मोठ्या पाळीव प्राण्यांच्या लोकसंख्येच्या मोठ्या देशात, जीव वाचवणारी आणि पाळीव प्राण्यांचे जीवन चांगले बनवणारी सुविधा आपल्याकडे का नाही?"

❝

- आपल्याला जिवंत ठेवण्यासाठी आयुष्यातले चढ-उतार महत्त्वाचे असतात. कारण ईसीजीप्रमाणे सरळ रेषा, तुम्ही जिवंत नसल्याचे दर्शवते!
- आपल्या पाल्यांना फक्त श्रीमंत होण्याकरिता शिकवू नका, तर त्यांना आनंद मिळविण्याच्या हेतूने शिकवा. कारण जेव्हा ते प्रौढ बनतील तेव्हा त्यांना गोष्टींच्या किंमतींपेक्षा त्यांचे महत्त्व कळून चुकेल."
- जर तुम्हाला जलद पुढे जायचे असेल तर एकटे चला. परंतु जर तुम्हाला दूरवर जायचे आहे, तर सर्वांना सोबत घेऊन चला.

- रतनजी टाटा

# तंत्रज्ञानाचा दुरुपयोग



**सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या कामासाठी केला पाहिजे मात्र काही महाभाग या तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करून समाजातील प्रतिष्ठित लोकांची विशेषतः सेलिब्रेटींची बदनामी करत आहे. सोशल मीडियाचा गैरवापर वाढलाय का ?**

## गैरवापर

श्याम ठाणेदार

राष्ट्रसंचार

सध्या फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडिया साईटवर सेलिब्रिटींचे त्यातही हिंदी आणि मनोरंजन सृष्टीतील अभिनेत्रींचे मॉर्फ केलेल्या अश्लील छायाचित्रांचा आणि व्हिडिओचा पूर आला आहे. हे छायाचित्र पाहिले की असे वाटते की हे छायाचित्र त्या अभिनेत्रींनीच काढून सोशल मीडियावर टाकले आहेत मात्र नीट पाहिले की लक्षात येते की हे छायाचित्र मोर्फ केलेले आहे. मागील वर्षी बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री असलेली रश्मीका मंधना हीचा डीपफेक व्हिडिओ प्रसार माध्यमात व्हायरल करण्यात आला होता. सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर कला क्षेत्रात चांगलीच खळबळ माजली होती. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर स्वतः अभिनेत्री रश्मीका हिने हा व्हिडिओ तिचा नसल्याचे सांगून व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून तिला मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे सांगितले होते. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर बिग बी अमिताभ बच्चन यांनीही संताप व्यक्त केला होता.

सोशल मीडियावर व्हायरल झालेला व्हिडिओ हा एका दुसऱ्याच मुलीचा होता. मात्र एडिटिंग करून त्या मुलीच्या चेहरा लपवून त्याजागी अभिनेत्री रश्मीका मंधनाचा चेहरा लावण्यात आला होता. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर पोलीसातही तक्रार दाखल झाली होती तेंव्हा वाटले होते की या प्रकाराला आळा बसेल मात्र आळा बसणे तर दूरच उलट हा प्रकार वाढतच चालला असून सध्या तर अशा मॉर्फ केलेल्या छायाचित्रांचा आणि व्हिडिओजचा महापूर आला आहे. हे व्हिडिओ एडिटिंग करताना एआय या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. एआयच्या मदतीने व्हिडिओ आणि फोटो एडिट करून लोकांना त्रास दिला जातो. तंत्रज्ञानाने मानवी जीवनात क्रांती केली आहे. विज्ञानाच्या मदतीने दररोज नवे तंत्रज्ञान उदयास येत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर मानवी कल्याणासाठी केला पाहिजे. विज्ञान तंत्रज्ञानाचा हेतू मानवी कल्याण हेच आहे मात्र काही नतद्रष्ट लोक या तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी नाही तर समाज विघातक कार्यासाठी करतात हा प्रकार त्यातलाच आहे. वास्तविक कोणाचाही फेक व्हिडिओ किंवा छायाचित्र बनवून बदनामी करणे हा गुन्हा आहे. अशा समाज विघातक लोकांना कायद्याने कडक शिक्षा व्हायलाच हवी. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग ही नवीच समस्या आता निर्माण झाली आहे.





# रास्त कारणाशिवाय सासरचे घर सोडून जाणे चुकीचे..!



**सासरकडील मंडळी छळ करतात असे सांगून देखभालीचा खर्च मिळावा अशी मागणी करणाऱ्या महिलेला न्यायालयाने फटकारले असून, फक्त घरात बसून पोटगी मागता येणार नाही, असे म्हटले आहे. पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयानं एका महिलेनं दाखल केलेली याचिका फेटाळून लावताना ही महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे.**



## कायदा

ॲड. गायत्री कांबळे

राष्ट्रसंचार

पतीला धडा शिकवायच्या हेतूने काही महिला जाणीवपूर्वक कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दाखल करतात. तसेच कोणतेही रास्त कारण नसताना पतीचे घर सोडून माहेरी जाऊन राहतात. मात्र, घर संसार याला महत्व न देता केवळ घरात राहून पोटगीची मागणी करता येणार नाही, अशी महत्वाची टिपण्णी न्यायालयाने केली आहे.

महिला सशक्तीकरण, महिलांचे हक्क किंवा महिलांचं संरक्षण अशा अनेक मुद्द्यांची समजामध्ये सातत्याने चर्चा होते. न्यायालयांसमोर अशा मुद्द्यांवर आधारित प्रकरणांच्या सुनावणीदरम्यानही महिलावरील अन्यायाबाबत कठोर भूमिका घेतली जाते. पण काही प्रकरणांमध्ये महिलांकडून कायद्यांचा गैरवापर फायद्यासाठी केला जात असल्याचंही निदर्शनास येतं. असंच एक प्रकरण पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी आलं असता न्यायालयानं संबंधित याचिकाकर्त्या महिलेला कठोर शब्दांत फटकारलं. तसेच, तिची याचिकाही न्यायालयानं फेटाळून लावली.

पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयासमोर या प्रकरणाची सुनावणी चालू असताना न्यायालयाने कठोर शब्दांत भूमिका मांडली. एका विवाहित महिलेनं पतीपासून वेगळं झाल्यानंतर अंतरिम किंवा एकरकमी देखभाल खर्च मिळावा अशी मागणी करणारी याचिका दाखल केली होती. मात्र, न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. असं करताना न्यायालयाने त्यासंदर्भात केलेली टिप्पणी चर्चेत आली आहे.

या जोडप्याचा विवाह २०१० साली झाला होता. त्यांना दोन मुलंही झाली. पण पतीशी मतभेद झाल्यानंतर विवाहाच्या चार वर्षांत म्हणजेच २०१४ साली दोघेही विभक्त झाले. त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात महिलेनं पतीकडून आपल्याला व आपल्या मुलांसाठी देखभाल खर्च मिळावा, अशी मागणी करणारी याचिका दाखल केली. त्याशिवाय, आपल्या पतीला महिना १२ हजार रुपये पगार असल्याचाही दावा महिलेनं केला होता.



पोटगी वा देखभाल खर्चासंदर्भातील कलम १२५ चा आधार ही याचिका करताना महिलेनं घेतला होता. यावेळी आपण ग्रामीण भागात राहणारी एक सामान्य महिला असून आपल्याकडे कमाईचे कोणतंही साधन नाही असंही महिलेनं म्हटलं होतं. लग्नानंतर हुंड्यासाठी आपला पती व सासरच्या व्यक्तींकडून कौटुंबिक हिंसा केली जात होती, असाही आरोप महिलेकडून करण्यात आला. यासंदर्भातली स्वतंत्र याचिका प्रलंबित असल्याचं महिलेनं नमूद केलं.

### कलम १२५ चा गैरवापर अमान्य

दरम्यान, न्यायालयाने हा कलम १२५ चा गैरवापर असल्याचं यावेळी नमूद केलं. "कलम १२५ चा मूळ हेतू हा परित्यक्ता पत्नींना दैनंदिन जीवनात कोणत्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये, ज्या आपला उदरनिर्वाह करण्यासाठी असमर्थ आहेत अशा महिलांना आधार देणं हा आहे. मात्र स्वतःचा उदरनिर्वाह करू शकणाऱ्या पण तरीही फक्त घरात बसून राहणाऱ्या पत्नींना कलम १२५ चा गैरवापर करू दिला जाऊ शकत नाही", असं न्यायालयाने नमूद केले. तसेच, कुटुंब न्यायालयानं यासंदर्भात महिलेची याचिका फेटाळताना नमूद केलेल्या निरीक्षणाचा पुनरुच्चार यावेळी उच्च न्यायालयाने केला. महिलेनं कोणत्याही रास्त कारणाशिवाय आपलं सासरचं घर सोडलं असून पतीसोबत न राहण्याची महिलेचीच इच्छा आहे, असेही न्यायालयाने नमूद केले आहे.

**सत्तरच्या दशकात प्रदर्शित झालेला 'जय संतोषी माँ' हा कमी बजेटचा चित्रपट. परंतु उत्पन्नाच्या बाबतीत आजही आघाडीच्या ब्लॅक ब्लस्टर चित्रपटात त्याचा समावेश केला जातो. अशा चित्रपटांची सद्दी सिनेसृष्टीने पाहिली आणि प्रेक्षकांनीही त्याला भरभरून प्रतिसाद दिला. पण गेल्या काही वर्षांत अध्यात्मिक चित्रपटांची संख्या रोडावत गेल्याचे दिसते. आजही उत्सवात, धार्मिक मिरवणुकीत जुन्याच काळातील गाणी, भजने, गीते वाजविली जातात. एकीकडे दुरचित्रवाणीवर धार्मिक मालिकांची संख्या लक्षणीय असताना दुसरीकडे मोठ्या पडद्यावर धार्मिक, पौराणिक कथांवरील चित्रपट, गीतांचे प्रमाण कमी झाले आहे.**




# कुठे गेले अध्यात्मिक चित्रपट?

सिनेविशेष
■ सोनम परब

मोठ्या पडद्यावरील धार्मिक, अध्यात्मिक चित्रपटांचा नेहमीच बोलबाला राहिला आहे. प्रामुख्याने सुरुवातीच्या काळात धार्मिक, पौराणिक, अध्यात्मिक चित्रपटांनीच मनोरंजन विश्व व्यापले होते. राजा हरिश्चंद्र, रामराज्य, संत तुकाराम यासारख्या चित्रपटांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. मूकपटापासून ते डिजिटल युगापर्यंत या चित्रपटांचा पगडा निर्मात्यांवर आणि साहजिकच प्रेक्षकांच्या मनावर राहिला आहे. परंतु गेल्या काही वर्षांत अध्यात्मिक चित्रपटांची संख्या रोडावत गेल्याचे दिसते. आजही उत्सवात, धार्मिक मिरवणुकीत जुन्याच काळातील गाणी, भजने, गीते वाजविली जातात. एकीकडे दुरचित्रवाणीवर धार्मिक मालिकांची संख्या लक्षणीय असताना दुसरीकडे मोठ्या पडद्यावर धार्मिक, पौराणिक कथांवरील चित्रपट, गीतांचे प्रमाण कमी झाले आहे. काळाचा आपल्या आयुष्यावर नेहमीच परिणाम दिसला आहे. काळानुसार, वेळेनुसार बदलाची कास धरतच मनुष्य वाटचाल करत आला आहे. आपण चित्रपटांना आयुष्याचे प्रतिबिंब मानले आणि त्यामुळे त्यातही बदल दिसले. धार्मिक श्रद्धा हा जीवनातील महत्त्वाचा घटक आहे, म्हणूनच कृष्णधवल ते आजच्या डिजिटल तंत्रापर्यंत अनेक चित्रपटात त्याचे प्रतिबिंब उमटले आहे. प्रारंभीचा काळ हा धार्मिक कथांनी व्यापलेला होता. पटकथा आणि गीते देव देवतांवर केंद्रीत राहिले आहेत. मात्र चित्रपटातून हळूहळू भजन अणि भक्तीगीत कमी होत गेले आणि ते आता दिसतच नाहीत. एखादे धार्मिक गीत जरी आणले गेले तरी ते श्रद्धा जपण्यासाठी नाही तर चित्रपटातील क्लायमॅक्सच्या प्रसंगात आणले जाते. 'अग्निपथ'मधील 'देवा श्री गणेशा देवा श्री गणेशा' हे गाणे आठवता. 'बजरंगी भाईजान'मधील सलमान खानचे देवासमोरील नृत्य 'सेल्फी तू सेल्फी ले ले रे...' त्याचवेळी १९७९ मधील अमिताभ बच्चन आणि शशी कपूर यांच्या 'सुहाग' चित्रपटातील 'नाम रे सबसे बडा तेरा नाम रे' हे गीत आजही लोकप्रिय आहे. नवरात्रात हे गाणे कानावर पडते. अमिताभ बच्चन आणि रेखा यांचा समावेश असलेल्या या भजनात दोघांनीही गरबा केला. एखादा व्यक्ती किंवा नायक-नायिका अडचणीत असतील तेव्हा त्याला देवाची आठवण होते. तो अडचणींच्या काळात देवाचा धावा करतो. अशावेळी ते पात्र देवाच्या मूर्तीसमोर धार्मिक गीत किंवा भजन म्हणते. अनेक चित्रपटात नायक-नायिका भजन म्हणताच भगवान त्यांची प्रार्थना ऐकताना दिसतात.

**मानसिक शांतता देणारे गीत**

चित्रपटविश्वात कृष्णधवल काळापासून धार्मिक श्रद्धा जोपासणारे गीत, कथा वेळोवेळी सादर करण्यात आले असून आजही त्यात बदल झाला नाही. काही चित्रपटातील गीते आणि भजने तर एवढी लोकप्रिय आहेत की ती उत्सवाच्या काळात सतत ऐकण्यात येतात. ही गीते मनःशांती देणारी आहेत. त्यांचे श्रवण करून काही क्षण आपण दुःख विसरून जातो. यशस्वी ठरलेल्या पौराणिक चित्रपटांचा विचार केला तर १९७५ मधील 'जय संतोषी माँ' हा कमी बजेटचा चित्रपट. परंतु उत्पन्नाच्या बाबतीत आजही आघाडीच्या ब्लॅक ब्लस्टर चित्रपटात त्याचा समावेश केला जातो. या चित्रपटातील सर्व गीते लोकप्रिय ठरली. उषा मंगेशकर, महेंद्र कपूर आणि मन्नाडे यांनी कवी प्रदीप यांचे भक्ती गीत गायले. 'करती हूं तुम्हारा व्रत मै स्वीकार करो मां', 'यहा वहाँ मत पूछो कहाँ कहाँ', 'मै तो आरती उतारू रे' आणि 'जय संतोषी माँ' यासारख्या गाजलेल्या गीतांचा उल्लेख करता येईल. ही गीते आजही मंदिरात कानावर पडतात. अनेक गायकांनी कालातित धार्मिक गाणे, भजन आणि आरती म्हटल्या आहेत. भजन गायक, कलाकारांवरही श्रद्धा गायकांनी सादर केलेली भक्तीगीते ही त्यांचा भाव, एकरुपता, तन्मयतेमुळे प्रेक्षकांना भावली. यात सर्वाधिक लोकप्रियता अनुराधा पौडवाल, नरेंद्र चंचल, अनुप जलोटा यांना मिळाली. चित्रपटांत धार्मिक गीत आणि भजन म्हणणारे गायक देखील बऱ्याच काळापासून एकच राहिलेले आहेत. अर्थात चित्रपटात धार्मिक भूमिका साकारणाऱ्या कलांकारांबाबत प्रेक्षकांच्या मनात अधिकच आदर आणि श्रद्धा दिसून आली आहे.'जय संतोषी माँ' चित्रपटात माता संतोषी यांची भूमिका साकारणाऱ्या अनिता गुहा यांची पूजा केली जात होती. रामायण मालिकेतील राम आणि सीता यांची भूमिका साकारणारे अरुण गोविल आणि दीपिका चिखलिया यांना आजही भक्तीभावाने पाहिले जाते. हिंदी चित्रपटात ईश्वराची सर्वाधिक भूमिका बजावणाऱ्या महिपाल यांना तर लोकांनी देव मानले होते. त्यांनी ३५ पेक्षा अधिक चित्रपटांत देवाची भूमिका साकारली. ते तुलसीदास झाले, अभिमन्यूही. महिपाल यांनी आपल्या आयुष्यात रामायण, वीर भीमसेन, वीर हनुमान, हनुमान पाताल विजय, जय संतोषी माँ यासारख्या यशस्वी धार्मिक चित्रपटात काम केले. त्यांनी भगवान राम, कृष्ण, गणेश, विष्णू यांची भूमिका इतक्यांदा साकारली की प्रत्यक्ष जीवनातं तेदखील त्यांना देव समजले जात होते. तसेच धार्मिक चित्रपट असो किंवा रामायणांसारखी मालिका अभिनेते दारासिंह आणि हनुमानाचे पात्र असे समीकरण बनले होते.


चित्रपटातील कालातीत भक्तीगीते

अजरामर भक्ती गीतांत १९६५ मधील 'खानदान' चित्रपटातील गीत 'बडी देर भई नंदलाला तेरी राह ताके बृजबाला' यास लोकप्रियतेच्या श्रेणीत ठेवता येईल. हे भजन सुनील दत्त यांच्यावर साकारले आहे. राजेंद्र कृष्ण यांनी लिहलेले भजन मोहंमद रफी यांनी म्हटले. जन्माष्टमीच्या दिवशी हे गीत लावण्यात येते. तत्पूर्वी १९५२ मध्ये चित्रपट 'बैजू बावरा'मधील गीत मोहंमद रफी यांनी म्हटलेले गीत धार्मिक श्रद्धेचा कळस म्हणता येईल. 'ओ दुनिया के रखवाले, सुन दर्द भरे मेरे नाले' हे गीत आजही एखाद्या दुःखी व्यक्तीचा चेहरा समोर आणतो. शकील बदायुँनी यांनी लिहलेल्या गीताला नौशाद यांनी संगीत दिले.१९५४ मध्ये तुलसीदास लिखित गीत 'मुझे अपनी शरण मे लेलो राम' देखील मोहंमद रफी यांनी म्हटले आहे. संगीकार चित्रगुप्त यांनी संगीत दिले हेते. मराठीचा उल्लेख केला तर मोहंमद रफी यांचे अजरामर 'शोधी शी मानवा' हे भावगीत अत्यंत श्रवणीय आहे. श्रीकांत ठाकरे यांनी संगीतबद्ध केलेल्या गीताची लोकप्रियता आजही कायम आहे. रामचंद्र कह गये सिया से १९५८ च्या 'दो आंखे बारह हाथ' या चित्रपटातील गीत 'ऐ मालिक तेरे बंदे हम, ऐसे हो हमारे करम' हे वाईटावर चांगल्याचा विजय सांगणारा अजोड नमुना आहे. हे गीत दरोडेखोरांना चांगल्या मार्गावर आणण्यासाठी गायले गेले. भारत व्यास लिखित गीताला वसंत देसाई यांनी संगीत दिले. लता मंगेशकर यांनी या गीताला गोड आवाज दिला. दिलीपकुमार यांचा १९७० मध्ये झळकलेला 'गोपी'मधील महेंद्रकपूर यांच्या आवाजातील गीत 'रामचंद्र कह गये सिया से ऐसा कलयुग आयेगा' हे भजन भविष्यातील चित्र सांगणारे आहे. राजेंद्रकृष्ण यांनी लिहलेल्या गीताला कल्याणजी आनंदजी यांनी संगीत दिले. भक्तीगीतात साईबाबा यांच्यावर विपूल गीतरचना आहेत. १९७७ मध्ये 'अमर अकबर ॲन्थोनी' चित्रपटातील गीत 'तारीफ तेरी निकाली है दिलसे, आये है लब पे बनके कव्वाली' ही साईभक्तांसाठी एकप्रकारे आशेचा किरण दाखविणारी आहे.

**राम जी की निकाली सवारी**

सरगम (१९७९) हा चित्रपट संगीतप्रधान होता. यातील 'राम जी की निकाली सवारी, रामजी की लीला है न्यारी'मध्ये भगवान श्रीरामाच्या महिमेचे अतुलनीय वर्णन केले आहे. दसऱ्यात श्रीरामाची मिरवणूक काढतात तेव्हा हे गीत हमखास लावले जाते. आनंद बक्षी यांनी लिहलेले गीत मोहंमद रफी यांनी गायले आणि त्याला लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी संगीत दिले होते. अंकुश (१९८६) हा चित्रपट तत्कालिन काळात वेगळ्या धाटणीचा चित्रपट ठरला. यातील भक्तीगीत 'इतनी शक्ती हमे दे ना दाता, मन का विश्वास कमजोर हो ना' हे मानसिक आधार देणारे आहे. 'भर दो झोली मेरी या मुहम्म लौटकर मै ना जाऊंगा खाली' हे बिगरफिल्मी गीत. परंतु २०१५ मध्ये 'बजरंगी भाईजान'मध्ये त्याचा समावेश केला. नायक सलमान खान हा हरवलेल्या मुलीला तिच्या गावी सोडण्यासाठी शेजारच्या देशात जातो तेव्हा अडचण दूर करण्यासाठी अदनान सामी यांनी म्हटलेले गीत प्रार्थनेच्या रुपातून सादर करण्यात आले. पण अलीकडच्या काळातील चित्रपट पाहिले तर पात्रांना आता ईश्वराचा आशीर्वादाची गरज राहिलेली दिसत नाही. म्हणूनच दीर्घकाळापासून धार्मिक गीत, भजन, आरतीचा समावेश असणारे चित्रपट प्रदर्शित झाले नाहीत. ◆◆◆

## एक चूक पडली महागात



हिंदी आणि तामिळ सिनेसृष्टीतील आघाडीची नायिका रकुलप्रीत सिंह आपल्या हॉट आणि बोल्ड अंदाजामुळे नेहमीच चर्चेत राहिलेली आहे. रकुलने १० जानेवारी २०१४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'यारियां' या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. त्यानंतर रकुलप्रीतने बॉलिवूडमध्ये अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहे. आज अभिनेत्री बॉलिवूडच्या टॉप अभिनेत्री मध्ये समाविष्ट आहेत. मात्र, अश्यातच अभिनेत्री रकुलप्रीत सिंहबद्दल एक बातमी समोर आली आहे. रकुलप्रीत सिंह सोबत जिमध्ये वर्कआउट करताना एक घटना घडली आहे. ज्यामध्ये ती जखमी झाली आहे. यानंतर रकुलप्रीत सिंहला बेडरेस्टवर जावे लागले आहे.

अभिनेत्री रकुल प्रीत सिंग ही ५ ऑक्टोबर रोजी जिममध्ये वर्कआउट करण्यासाठी गेली होती. त्यावेळी तिने बेल्ट न लावता ८० किलो वजन उचलले. दरम्यान, यावेळी तिला जखम झाली. यानंतर रकुल प्रीत सिंगची प्रकृती बिघडली.

डॉक्टरांनी सध्या अभिनेत्रीला बेडरेस्ट घेण्याचा सल्ला दिला आहे. यानंतरही अभिनेत्री पेनकिलर घेऊन 'दे दे प्यार दे' या चित्रपटाचे शूटिंग करत आहे. सततच्या शूटिंगमुळे तिला पाठदुखीचा त्रास सुरु झाला. त्यानंतर अभिनेत्रीने या होणाऱ्या त्रासाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे तिच्या वाढदिवसाच्या दिवशी तिची तब्येत आणखी बिघडली. स्वतः अभिनेत्री याबद्दल इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे. ◆◆◆

## रिलीजची तारीख ठरली

अभिनेता अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा' चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई केली होती. त्यानंतर दुसऱ्या भागाची 'पुष्पा द रुल'ची घोषणा करण्यात आली. तेव्हापासून 'पुष्पा २' चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. आता या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. काही कारणामुळे या चित्रपटाची रिलीज डेटमध्ये बदल होण्याची शक्यता होती. मात्र समोर आलेल्या वृत्तानुसार, पुष्पा द रुलच्या रिलीज डेटबाबत स्पष्ट माहिती समोर आली आहे. नुकतेच या चित्रपटाचे नवीन पोस्टर समोर आले आहे. या पोस्टरमध्ये चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. हा चित्रपट ६ डिसेंबरला थिएटरमध्ये दाखल होणार आहे. नव्या पोस्टरमध्ये अल्लू अर्जुनचा जबरदस्त लुक पाहायला मिळत आहे.

दरम्यान, 'पुष्पा २ द रुल' हा अल्लू अर्जुन आणि रश्मिका यांच्या २०२१ मध्ये आलेल्या 'पुष्पा: द राइज' चित्रपटाचा दुसरा भाग आहे. पुष्पा हा चित्रपट २०२१ मधील सर्वात मोठा सुपरहिट चित्रपट ठरला. यापूर्वी 'पुष्पा २' हा चित्रपट यावर्षी १५ ऑगस्टला म्हणजेच स्वातंत्र्यदिनी प्रदर्शित होणार होता, मात्र शूटिंग पूर्ण न झाल्यामुळे निर्मात्यांनी तिची तारीख बदलली. त्यानंतर आता निर्मात्यांनी याचे पोस्टर जारी केले आणि त्याची अधिकृत रिलीज तारीख देखील जाहीर केली आहे. ◆◆◆



## आलियाला काय झालंय?

बॉलिवूड अभिनेत्री आलिया भटचा 'जिगरा' चित्रपट नुकताच रिलीज झाला आहे. मात्र हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर कमाल दाखवण्यास अपयशी ठरत असल्याचे दिसत आहे. अलीकडेच एका मुलाखतीत आलियानं तिला असलेल्या एका गंभीर आजाराविषयी सांगितले.आलियाला एडीएचडी अर्थात अटेंशन डिफीसिएट हायपरॲक्टिव्ह डिसऑर्डर आजार असल्याचे तिने सांगितले आहे. याबाबत सांगताना आलिया म्हणाली की 'लहानपणी अनेकवेळा मी वर्गातील मुलांपासून दूर राहायचे आणि कधी-कधी बोलत असताना अचानक राग यायचा. या आजारामुळे माझ्याकडे अजिबात धीर नव्हता. मी काही दिवसांपूर्वी एक सायकोलॉजिकल टेस्ट केली, ज्यात एक गोष्ट समोर आली की माझ्यात एडीएचडीची लक्षण दिसून येत आहेत. या आजारामुळे अजिबात धैर्य राहत नाही.'

आलियाला याविषयी काही माहित नव्हतं. जेव्हा तिनं टेस्ट केली त्यानंतर तिला हे कळालं. पण तिला कॅमेऱ्यासमोर खूप चांगलं आणि शांत वाटतं. याशिवाय ती जेव्हाही मुलगी राहासोबत वेळ घालवते तेव्हा ती खूप शांत राहते. ते क्षण सर्वोत्तम असल्याचे आलिया सांगते.

एडीएचडी एक न्यूरोडेव्हलपमेंट संबंधीत आजार आहे. हा आजार लहाणपणी होतो आणि आपण मोठे झालो तरी राहतो. त्यामुळे त्या व्यक्तीला त्याच्या रोजच्या कामावर आणि आयुष्यावर परिणाम होतो. अशा व्यक्तीला कोणत्याही कामात लक्ष केंद्रित करण्यास अडचणी निर्माण होतात. आलिया भट्टच्या 'जिगरा'




चित्रपटाबद्दल बोलायचे तर, हा चित्रपट ११ ऑक्टोबरला प्रदर्शित झाला. चित्रपटात आलिया आणि वेदांग भाऊ आणि बहिणीच्या भूमिकेत दिसतात. या चित्रपटाची संपूर्ण कथा या दोघांभोवती फिरते. या चित्रपटाचे दिग्दर्शन वासन बाला यांनी केले आहे. ◆◆◆

## 'भूलभूलैय्या ३'मध्ये कियाराची एन्ट्री?

कार्तिक आर्यनच्या 'भूलभूलैय्या ३' या चित्रपटाची मागील काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. नुकत्याच या चित्रपटाच्या ट्रेलरने सोशल मीडियावर धुमाकूळ घातला. कार्तिक आर्यन, विद्या बालनसह अनेक कलाकार मंडळी यात पाहायला मिळणार आहे. यातच आता या चित्रपटात आणखी एका जुन्या भूमिकेची पुन्हा एन्ट्री होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

कार्तिक आर्यनने पिंकविलाला दिलेल्या मुलाखतीत याबद्दल चर्चा केली. चित्रपटाचे दोन क्लायमॅक्स खरेच शूट झाले आहेत का, असा प्रश्न त्याला विचारण्यात आला. त्याबद्दल बोलताना कार्तिकने सांगितले की, भूल भूलैय्या ३ चे दोन क्लायमॅक्स होते. त्यापैकी आम्हाला फक्त एका क्लायमॅक्सची स्क्रीप्ट देण्यात आली होती. पुढे तो म्हणाला, स्क्रीप्टमधली शेवटची १५ पानं गायब होती. केवळ आमच्याकडेच नाही तर सिनेमाचे



असिस्टंट डायरेक्टर, प्रॉडक्शन डिपार्टमेंट सर्वांकडे अशीच स्क्रीप्ट गेली होती. इतकंच नव्हे तर आम्ही कियारासोबत शूट करत होतो. असं म्हणताच कार्तिक गडबडला आणि त्याने कियाराचं नाव बदलून विद्या बालनचं नाव घेतलं. त्याच्या या विधानानंतर 'भूलभूलैय्या ३'मध्ये कियारा अडवाणी दिसणार असल्याची शक्यता आहे. कियाराने कार्तिकसोबत यामध्ये काम केलं होतं.

क्लायमॅक्सबद्दल बोलताना कार्तिक आर्यन म्हणाला, आम्ही २ क्लायमॅक्स शूट केले आहेत. मला एवढेच सांगायचे आहे. हे माझ्यासोबत पहिल्यांदाच घडत होतं की मला खूप गोष्टी लपवायच्या होत्या. हा एक वेगळा चित्रपट आहे आणि मला वाटते भूल भुलैया भाग ३ मध्ये तुम्हा सर्वांसाठी खूप सरप्राईज असतील आणि जेव्हा हा चित्रपट प्रदर्शित होईल तेव्हा तुम्हाला त्याचा आनंद मिळेल.

कार्तिक आर्यनशिवाय या चित्रपटात तृप्ती डिमरी, विद्या बालन, माधुरी दीक्षित यांच्या भूमिका आहेत. १ नोव्हेंबर २०२४ रोजी हा चित्रपट रिलीज होणार आहे. या चित्रपटाची टक्कर रोहित शेट्टीच्या 'सिंघम अगेन' या चित्रपटाशी होणार आहे. ◆◆◆

## तेजस्विनीचा ट्रिपल धमाका

अभिनेत्री तेजस्विनी पंडित हिने आपल्या कामामुळे प्रेक्षकांच्या मनात स्वतःची एक वेगळी जागा निर्माण केली आहे. नुकतंच तिनं राजेश मापुस्कर दिग्दर्शित 'येक नंबर' या चित्रपटाच्या निमित्ताने लिखाण क्षेत्रात पदार्पण केलं आहे. ती आपल्याला या चित्रपटाच्या माध्यमातून तिहेरी भूमिकेत पाहायला मिळणार आहे.

'येक नंबर' या चित्रपटात निर्मिती आणि लेखनाव्यतिरिक्त ती अभिनय करतानाही दिसणार आहे. या चित्रपटात तेजस्विनी पोलिसाच्या भूमिकेत दिसणार आहे. ती पहिल्यांदाच पोलिसाची भूमिका निभावणार आहे. एकाच वेळी अशा तिहेरी भूमिकेत पाहणे, म्हणजे तिच्या चाहत्यांसाठी मोठी पर्वणीच ठरणार आहे.

या चित्रपटाबद्दल बोलायचे झाल्यास झी स्टुडिओज आणि



नाडियाडवाला ग्रँडसन एंटरटेनमेंट प्रस्तुत, सह्याद्री फिल्म्स निर्मित, तेजस्विनी पंडित, वरदा नाडियाडवाला यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. तसेच झी स्टुडिओजच्या उमेश कुमार बन्सल यांचेही या चित्रपटाला सहकार्य लाभले आहे. राजेश मापुस्कर यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. धैर्य घोलप, सायली पाटील हे या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहेत. ◆◆◆



## रकुलला डच्चू

अभिनेत्री रकुल प्रीत सिंगने कन्नड आणि तेलुगू चित्रपटातून आपल्या करियरला सुरुवात केली. यानंतर तिने हिंदी चित्रपटांमध्ये काम करत बॉलीवूडमध्ये यश मिळवले. नुकतेच तिने तिच्या सुरुवातीच्या संघर्षांबद्दल खुलासा केला. चार दिवसांच्या शूटिंगनंतर प्रभासच्या चित्रपटातून तिला अचानक काढून टाकण्यात आले होते.

याबाबत रकुल म्हणाली, प्रभासच्या एका तेलगू सिनेमात मी चार दिवस शूट केले आणि नंतर मला रिप्लेस करण्यात आले. या चित्रपटाचे नाव मिस्टर परफेक्ट होते. पण हे माझ्या चांगल्यासाठीच होते. त्यावेळी मी नवीन होते आणि कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होते. मी माझ्या परिक्षेचा अभ्यासपण सेटवर करत होते.

पुढे ती म्हणाली, पहिला शेड्युल संपल्यानंतर जेव्हा मी दिल्लीला गेले तेव्हा मला कळलं की माझ्या जागी काजल अग्रवालला घेण्यात आले आहे. शूटिंगदरम्यान काजल आणि प्रभासची आणखी एक सिनेमा रिलीज झाला होता आणि हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला होता. त्यामुळे निर्मात्यांनी त्यांच्या चित्रपटात त्याच कलाकारांची पुनरावृत्ती करण्याचा विचार केला.

नवोदित मुलींना अनेकदा असे रिप्लेस करण्यात येते. दरम्यान, रकुल प्रीत सिंगने २००९ मध्ये साऊथ चित्रपटातून तिच्या करिअरची सुरुवात केली आणि त्यानंतर तिने २०१४ मध्ये 'यारिया'मधून बॉलिवूडमध्ये प्रवेश केला. ◆◆◆

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात
# पुरंदरची कदमवस्ती शाळा ठरली अव्वल

■ पुरंदर (प्रतिनीधी)

**पुरंदर :** शिक्षक आणि ग्रामस्थांच्या समन्वयातून.... घडलेल्या जयाद्री खोऱ्यातील पुरंदरच्या जिल्हा परिषदेच्या कदमवस्ती प्राथमिक शाळा जिल्ह्यामध्ये अव्वल ! ठरल्याने विद्यार्थ्यानं सह शिक्षक ग्रामस्थानी आनंद व्यक्त करित जल्लोष केला.




सुमारे सहा वर्षापूर्वी कदमवस्ती(ता.पुरंदर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला जागा कमी पडत होती म्हणून ग्रामस्थांनी सुमारे पन्नास लक्ष किंमतीची अकरा गुंठे जागा मोफत दिली.त्यावेळी हस्तांतर कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित राहण्याचा योग आला.त्या जागेवर ग्रामस्थांच्या व प्रशासनाच्या सहकार्याने टुमदार,आकर्षक व देखणी इमारत उभी राहिल्याचे पाहून निश्चित समाधान वाटते. शाळेकडे पाहून ज्ञानमंदिरात आल्याचे समाधान मिळते. येथील राज्य गुणवंत पुरस्कार प्राप्त शिक्षक अनंता जाधव व जिल्हा गुणवंत पुरस्कार प्राप्त शिक्षिका सुरेखा जाधव या दांपत्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी राबवत असलेले विविध उपक्रम पुणे जिल्ह्यातील शिक्षकांना प्रेरणादायी असल्याचे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी व्यक्त केले. नुकताच पुणे जिल्हा अध्यक्ष चषक पुरस्कार जाहीर झाल्यानंतर 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा'अंतर्गत पुणे जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कदमवस्ती (ता.पुरंदर) प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल पुणे जिल्ह्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी कदमवस्ती येथे भेट देवून विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले. तालुक्यातील इतर शिक्षकांनी या शाळेलाआवर्जून भेट द्यावी असे आवाहन ही त्यांनी केले.

भेटी दरम्यान प्रवेशद्वाराची सुंदर कमान,बोलक्या व बालस्नेही भिंती, ज्ञान वृद्धिंगत करणारे व शिकण्याची गोडी लागेल असे शैक्षणिक तक्ते,चित्रे,पेंटिंग्ज,संदेश,सुविचार, सामान्य ज्ञान,नकाशे,वर्गातच छोटीशी संगणक लॅब,मुलांना खेळण्यासाठी छोटीशी लॉन,घसरगुंडी, प्रवेशद्वारापासून वर्ग खोल्यांकडे नेणारा छोटासा रस्ता,पेव्हर ब्लॉक,वर्ग खोल्यांपुढे ठेवलेल्या कुंड्या व त्यातील फुलझाडे विद्यार्थ्यांकडे सोपवलेली झाडांची जबाबदारी,विद्यार्थ्यांचे साहित्य ठेवण्यासाठी स्वतंत्र कपाटाचे कप्पे,प्रत्येक वर्गात स्मार्ट टीव्ही,व्हाईट बोर्ड,स्वतंत्र खोलीत अवांतर वाचनाची पुस्तके,भरपूर शैक्षणिक साहित्य,प्रश्नपेढी,प्रयोग साहित्य पाहून समाधान व्यक्त केले. यावेळी पुरंदरचे गटशिक्षणाधिकारी संजय जाधव, केंद्रप्रमुख अनिल जगदाळे,अड बी एम काळे,संदीप कदम,नंदकुमार चव्हाण, संजय बारवकर उपस्थित होते.


विद्यार्थी शिक्षक ग्रामस्थांचा जल्लोष!

आजपर्यंत कदमवस्ती शाळा दत्तक घेतलेले, अड बी.एम. काळे, ग्रामस्थ व शिक्षक साकुर्डे व बेलसर ग्रामपंचायतींच्या समन्वयातून शाळेला पुरंदर तालुका सभापती चषक, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक १- अंतर्गत पुणे जिल्ह्यामध्ये तृतीय क्रमांक,पुणे जिल्हा अध्यक्ष चषक,मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक 2 अंतर्गत पुणे जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक पुरस्कार मिळाल्याबद्दल निश्चित समाधान असल्याचे येथील ग्रामस्थ संपत गरुड,ईश्वर कदम,गोकुळ कदम,विशाल चव्हाण,श्रीकांत कदम,संदीप टिळेकर,भरत चव्हाण,बबन कदम,हनुमंत कदम,प्रियंका चव्हाण यांनी सांगितले.



## जिल्हा परिषद शाळेच्या वतीने दफ्तरमुक्त शाळा उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** शनिवारी (दि.१९) आनंददायी शनिवार उपक्रमा अंतर्गत ओतूर(ता.जुन्नर) येथील जिल्हा परिषद शाळा नं.१ मध्ये दिवाळी बाजार हि संकल्पना मांडून दिवाळी मध्ये ज्या ज्या वस्तू लागतात त्या विद्यार्थ्यांनी आणून विकणे, विक्रीचा आनंद घेणे,ग्राहकांशी संवाद साधणे,आपली वस्तू कशी दर्जेदार उपयुक्त आहे हे पटविणे,रूपये पैशाचा व्यवहार करता येणे या सारखे अनुभव मुलांना यावेत याकरीता हा बाजार भरविण्यात आला.

मुलांनी व पालकानी या उपक्रमास भरपूर प्रतिसाद दिला. या बाजाराला व्यवस्थापन समिती अध्यक्ष नितीन डुंबरे व जयवंत डुंबरे, उपसरपंच प्रशांत डुंबरे सर्व समित्याचे अध्यक्ष व सदस्य यांनी भेट देऊन मूलांकडून वस्तू खरेदी करून आनंद घेतला. शाळेच्या मुख्याध्यापिका लिला धिरडे व सर्व शिक्षकांनी नियोजन करून हा उपक्रम आनंदाने पार पडला. अनेक पालकांनी समाधान व्यक्त केले. दफ्तरमुक्त ज्ञानाचा अनुभव मुलांनी घेतला.


विद्यार्थ्यांनी घेतला दिवाळी निमित्त दुकाने मांडून घेतला व्यावहारिक ज्ञानाचा अनुभव

## विशेष अनुदानातून बारामतीसाठी एक कोटी निधी मंजूर–सुरेंद्र जेवरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजने अंतर्गत बारामती नगरपरिषद करीता १ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र जेवरे यांनी याबाबत पाठपुरावा केला. मुस्लीम आम जमात कब्रस्थान, मुजावर वाडा अंतर्गत सुधारणा करण्यासाठी १५ लाख रुपये मंजूर झाले आहेत. शिवधाम स्मशानभूमी लिंगायत कोष्टी समाज अंतर्गत सुधारणा करणे २० लाख राजयोग ध्यानकेंद्र, ओपनस्पेस वाघोलिकर पार्क अशोकनगर बारामती येथील बगीचा अंतर्गत कामे करणे ५० लाख विमलधाम सोसायटी, भिगवण रोड बारामती बगीच्या अंतर्गत कामे करणे १५ लाख ,प्रभाग क्र. १६ येथे ओपन जिम तयार करणे. इत्यादी कामे या निधीच्या माध्यमातून होणार आहेत.



> नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजतेअंतर्गत बारामती नगर परिषदेसाठी एक कोटींचा निधी मिळाला आहे. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष सहकार्य मिळाले. बारामतीच्या विकास कामासाठी मी निधीची मागणी केली होती. त्याबाबत सदर कामांना निधी पुरवण्याचे सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या व तात्काळ निधी मंजूर झाला.
>
> — सुरेंद्र जेवरे (शिवसेना पुणे जिल्हा प्रमुख)

## पक्षातील निष्ठावंतांना उमेदवारी द्या



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** शिरूर-हवेली विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख पदाधिकाऱ्यांची वाघोली येथे बैठक पार पडली.

यावेळी पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांनाच उमेदवारी द्यावी, असा ठराव सर्वांनी एकमताने केला व तसेच कोणत्याही परिस्थितीत अन्य पक्षातील इच्छुक उमेदवार आयात करू नये, असे पत्रही उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देण्यात येणार आहे. शिरूर-हवेली विधानसभा मतदारसंघाच्या इच्छुक उमेदवारांची यादीत आयात उमेदवारांची भर नको, असा सूर या सभेत होता. निष्ठावंतांना संधी मिळावी ही प्रामाणिक इच्छा या सभेमागील होती. राष्ट्रवादीचा हा मेळावा पक्ष नेतृत्वाला वेगळा संदेश देऊन गेल्याची चर्चा हवेलीत वाऱ्यासारखी पसरली आहे. याप्रसंगी घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन दादा पाटील- फराटे, पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक शांताराम बापू कटके, माजी संचालक बाबासाहेब फराटे, हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष दिलीप वाल्हेकर, शिरूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष रवी काळे, तसेच शिरूर हवेली मधील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## मुखईच्या आश्रमशाळेसाठी तीन वर्ग खोल्यांचे बॉस इंडिया फाउंडेशनच्या वतीने लोकार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुखई :** ता. शिरुर येथील श्री काळभैरव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कै .रामराव गेणूजी पलांडे प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय येथे शैक्षणिक गुणवत्ता जिल्ह्यात गाजत असताना शालेय मुलांना वर्गखोल्यांची कमतरता भासत असल्याने बॉस इंडिया फाउंडेशनच्या माध्यमातून शाळेसाठी तीन वर्गखोल्या बांधून देऊन बॉस इंडिया फाउंडेशन कडून नवीन वर्ग खोल्यांचे लोकार्पण करण्यात आले आहे.

मुखई ता. शिरुर येथील श्री काळभैरव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कै. रामराव गेणूजी पलांडे प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय शाळेतून भटक्या विमुक्त जाती जमातीतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळत असताना शाळेचा शैक्षणिक दर्जा अतिशय उत्तम असल्याने दरवर्षी विद्यार्थी पटसंख्येत वाढ होत असल्याने मुलांना वर्गखोल्या शाळेला अपुऱ्या पडू लागल्या, त्यामुळे वर्ग खोल्यांची अडचण सोडण्यासाठी बॉस इंडिया कंपनी पुढे आली, आणि त्यांनी शाळेला तीन नवीन वर्ग खोल्या बांधून देत त्या वर्ग खोल्यांचे बॉस कंपनीचे अविनाश चिंतावर, उदयसिंह खरात व सुरज जाधव यांच्या हस्ते लोकार्पण केले, याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा जयश्री पलांडे, कार्याध्यक्ष अॅड. अशोक पलांडे, सचिव सुरेश पलांडे, उपाध्यक्ष सुभाष पलांडे, संचालक सदाशिव मोरे, बबन पलांडे, गणेश पलांडे, संस्थेचे सीईओ मंगेश मोरे, प्राचार्य तुकाराम शिरसाट, मुख्याध्यापक बापूसाहेब लगड, शरद पलांडे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान संस्थेच्या अध्यक्षा जयश्री पलांडे यांनी आपल्या मनोगतातून संस्थेचा १९६८ पासूनचा इतिहास व शाळेच्या गुणवत्तेचा आलेख मांडला, तर शाळेची गुणवत्ता व क्रीडा क्षेत्रातील यश पाहून समाधान व्यक्त करत आमची मदत योग्य ठीकाणी होत असून यापुढेही नक्कीच शाळेसाठी मदत केली जाईल असे बॉस कंपनीचे अविनाश चिंतावर यांनी सांगितले, सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन किशोर गोगावले यांनी केले तर प्रास्ताविक सुधिर ढमढेरे यांनी केले आणि प्राचार्य तुकाराम शिरसाट यांनी आभार मानले.


शाळेच्या वर्ग खोल्यांचे लोकार्पण करताना पदाधिकारी.

## निमगाव म्हाळुंगीतील जखमी मुलींसाठी माजी सैनिक एकवटले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**निमगाव म्हाळुंगी :** निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील गरीब कुटुंबातील दोघा बहिणींचा अपघात झाल्यानंतर त्यांची परिस्थिती हलाखीची असल्याने माजी सैनिकांनी मदतीचा हात पुढे करत सदर दोघा बहिणींच्या उपचारासाठी तब्बल पासष्ट हजारांची मदत मुलींच्या पालकांच्या स्वाधीन केली आहे.

निमगाव, म्हाळुंगी ता. शिरुर येथील गरीब कुटुंबातील विजय धोत्रे यांच्या नम्रता व अमृता दोन मुलींचा शाळेत जात असताना त्यांचा अपघात होऊन दोन्ही जखमी होऊन एक मुलगी गंबीर जखमी झाल्याने त्यांच्या कुटुंबियांपुढे खर्चाचा मोठा पेच निर्माण झाला, यावेळी जय जवान माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सुभेदार रामचंद्र विधाटे व सचिव सुभेदार चंद्रकांत चव्हाण यांनी विजय धोत्रे यांना फोन धीर देत आर्थिक मदतीचे आश्वासन दिले होते, त्यांनतर नुकतेच अध्यक्ष सुभेदार रामचंद्र विधाटे व सचिव सुभेदार चंद्रकांत चव्हाण यांनी धोत्रे कुटुंबियांसाठी मदत संकलित करत पासष्ट हजारांची मदत आदर्श सरपंच बापूसाहेब काळे यांच्या हस्ते धोत्रे कुटुंबातील विजय धोत्रे, सुरेखा धोत्रे यांच्याकडे सुपूर्त केली,

यावेळी जय जवान माजी सैनिक संघटनेचे बाळासाहेब घोलप, लक्ष्मण शिंदे, मारुती चौधरी, अंकुश काळे, लक्ष्मण कुसाळे, आनंदा पवार, सुनील चव्हाण, बाबा मराठे, संजय पाटील, भावना दौंडकर यांसह आदी उपस्थित होते. दरम्यान धोत्रे कुटुंबियांना माणुसकीची मदत मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते, तर बोलताना देशाची सेवा करुन सेवेतून निवृत्त होऊन देखील गावायील सामाजिक सेवा माजी सैनिकांनी जपल्याचे सांगत माजी सैनिकींनी दाखवलेल्या मदतीबाबत आदर्श सरपंच बापूसाहेब काळे यांनी माजी सैनिकांचे आभार मानले.


दोघींच्या उपचारासाठी माजी सैनिकांची पासष्ट हजारांची मदत

## » Selected



## आंबेगाव विधानसभा मतदारसंघात मतदार जागृती अभियान

**आंबेगाव :** आंबेगाव विधानसभा मतदारसंघात मतदार जागृती अभियान निमित्त मतदानाचा हक्क बजावण्यासाठी रांजणगाव गणपती येथील प्राथमिक शाळेत जनजागृती साठी विविध उपक्रम राबवण्यात आले. या मध्ये रांजणगाव गणपती येथील शेळके-वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांमध्ये मतदाणाचा हक्क व जागरूकता या विषयावर विविध स्पर्धा, प्रभातफेरी, निबंध स्पर्धा,चित्रकला स्पर्धा असे कार्यक्रम घेऊन लोकांना मतदान करा असा संदेश शाळेमर्फत देण्यात आला. यावेळी शाळेची मुख्याध्यापिका संगिता जगताप,दीपक सरोदे,सरिता शितोळे, शोभा आव्हाड. आणि हर्षद जाधव उपस्थित होते.

## निमोणेत गाडी लावण्यावरुन घरात घुसून मारहाण

**निमोणे:** निमोणे ता. शिरुर येथे घराशेजारी मोकळ्या जागेमध्य कार लावल्याच्या वादातून एका इसमासह पाच महिलांनी घरात घुसून एका इसमाला जातीवाचक शिवीगाळ, दमदाटी केल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे किशोर बाबुराव पतके, पूजा किशोर पतके, सानिका किशोर पतके, सविता जगदाळे, सविता जगदाळे, सविता संजय कदम, लीलाबाई रावसाहेब मोतीमोड यांच्या विरुद्ध अॅट्रॉसिटी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **याबाबत देविदास राधुजी पोटे वय ५६ वर्षे रा. निमोणे ता. शिरुर जि. पुणे यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी किशोर बाबुराव पतके, पूजा किशोर पतके, सानिका किशोर पतके, सविता जगदाळे, सविता जगदाळे, सविता संजय कदम, लीलाबाई रावसाहेब मोतीमोड सर्व रा. निमोणे ता. शिरुर जि. पुणे यांच्या विरुद्ध अॅट्रॉसिटी प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले हे करत आहे.**

## टाकळी भीमात दारुला पैसे न दिल्याने इसमाला मारहाण

**टाकळी भीमा:** टाकळी भीमा ता. शिरुर येथे दारु पिण्यास पैसे न दिल्याने इसमाला मारहाण करुन जखमी केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे संतोष सदाशिव लोकरे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टाकळी भीमा ता. शिरुर येथील हनुमंत खडके हे गावात असताना संतोष लोकरे तेथे आला त्याने हनुमंत याच्याकडे दारु पिण्यास पैसे मागितले, यावेळी हनुमंत यांनी माझ्याकडे पैसे नाही असे म्हणत पैसे न दिल्याने संतोष याने जवळ पडलेला सिमेंटचा पोल घेऊन हनुमंत यांना बेदम मारहाण करत जखमी केले, याबाबत हनुमंत महादेव खडके वय ७० वर्षे टाकळीभीमा ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी संतोष सदाशिव लोकरे ता. टाकळीभीमा ता. शिरुर जि. पुणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार संदीप इथापे हे करत आहे.

## शिवाजी विद्यालय ज्यु. कॉलेजचे प्रा.छल्लारे यांचे अपघाती निधन

**धामणी :** धामणी (ता.आंबेगाव ) येथील शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे गणित विषयाचे प्रा.सचिन सुंदरलाल छल्लारे (वय.४२ वर्षे) राहाणार श्रीरामपूर यांचे अपघाती निधन झाल्याने गावावर शोककळा पसरली तर ही घटना अचानक समजल्याने विद्यार्थांना अश्रू अनावर झाले. प्रा.छल्लारे हे सुट्टी निमित्त त्यांच्या मुळ गाव श्रीरामपूर ला गेले होते. रविवार (दि.१३) रोजी कामानिमित्त प्रवरानगर येथे गेले असता पुन्हा माघारी श्रीरामपूर कडे येताना बाभूळसर दरम्यान त्यांच्या चारचाकी गाडीचा अपघात झाला व त्यामधे त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची बातमी कळताच त्यांच्या गावी तसेच धामणी गावावर शोककळा पसरली. प्रा.छल्लारे हे दोन वर्षापूर्वी धामणीतील ज्युनिअर कॉलेज येथे गणित विषयाचे प्राध्यापक म्हणून आले होते. दोन वर्षात त्यांनी कॉलेज मधील विद्यार्थां मध्ये अमुलाग्र बदल केले होते. विद्यार्थी-पालक-ग्रामस्थ-शिक्षक असे मैत्रीपूर्ण संबंध त्यांनी जपले असल्याने त्यांच्या अचानक अपघाती निधनाची हृदय पिळवून टाकणारी घटना समजताच विद्यार्थी,सहकारी शिक्षक ग्रामस्थांना अश्रू अनावर झाले. सर,आम्हाला सोडून जाऊ नका सर..... तुम्ही कुठे आहात.... तुम्ही परत या असा टाहो फोडीत विद्यार्थ्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. प्रा.छल्लारे हे महाविद्यालयाचे शिक्षक असूनही माध्यमिकच्या विद्यार्थांना नेहमीच सहकार्य करीत होते. शाळेतील विविध प्रकारच्या नविन उपक्रमामध्ये त्यांचा पुढाकार असल्याचे रयत शिक्षण संस्थेचे पश्चिम विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी डी.आर.गायकवाड तसेच शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक पोपट शेंडकर यांनी सांगितले .



### शिक्रापुरात निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेच्या सर्पमित्रांची कामगिरी
## सर्पमित्रांनी दिला कृत्रिम पद्धतीने सात सापाच्या पिलांना जन्म

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

शिक्रापूर : शिक्रापूर ता. शिरूर येथील सर्पमित्राने पकडलेल्या सापाने सर्पमित्राच्या घरात अंडी घातली असताना त्या अंड्यातील सात पिलांना कृत्रिम पद्धतीने जन्म देण्यात निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेच्या सर्पमित्रांना यश आले असून नुकतेच सर्व पिलांना निसर्गाच्या सानिध्यात मुक्त करण्यात आले आहे.

शिक्रापूर ता. शिरूर येथील निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख व शुभम वाघ यांनी रात्रीच्या सुमारास एक तस्कर जातीचा साप पकडला होता, सकाळच्या सुमारास सापाला सोडून देण्यासाठी घेऊन जाताना त्या सापाने आठ अंडी घातली असल्याचे सर्पमित्रांना दिसून आले, त्यांनी सर्व अंडी विशिष्ट अशा कृत्रिम पद्धतीने ठेवून देत सापाला निसर्गाच्या सानिध्यात मुक्त केले, त्यांनतर वेळोवेळी शेरखान शेख, शुभम वाघ, अमोल कुसाळकर यांनी अंड्यांची पाहणी केली, अखेर तब्बल सत्तर दिवसांनंतर त्या अंड्यांपैकी सात अंड्यातून पिल्ले सुखरूपपणे बाहेर आली आणि सर्पमित्रांच्या प्रयत्नांना यश आले, त्यांनतर याबाबतची माहिती शिरूर वनविभागाचे वनपाल विशाल चव्हाण, वनरक्षक प्रमोद पाटील यांना देत सर्व पिल्लांना सुखरूपपणे निसर्गाच्या सानिध्यात मुक्त करण्यात आले आहे.


शिक्रापूर ता. शिरुर येथे कृत्रिम पद्धतीने जन्म दिलेली सापाची पिल्ले.

#रा

## ठेकेदारांची कंत्राटे मिळवण्यासाठी जोरदार लॉबिंग
### कापूस, सोयाबीन मूल्यसाखळी योजनेसाठी आणखी ५०० कोटी रुपये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कापूस, सोयाबीन मूल्यसाखळी योजनेसाठी आणखी ५०० कोटी रुपये आल्यामुळे ठेकेदारांनी कंत्राटे मिळवण्यासाठी जोरदार लॉबिंग चालू केले आहे. कंत्राटे मिळविताना कृषी खात्याकडून कमीत कमी अटी शर्ती येतील, निधी लवकर बँक खात्यात कसा जमा होईल तसेच आपल्याला हव्या त्या दराने निविदा कशा मंजूर होतील, यासाठी ठेकेदारांची लॉबी सरकारच्याच एका महामंडळातील अधिकाऱ्यांची मदत घेत असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.



राज्यात कापूस, सोयाबीन व इतर तेलबियांच्या पिकांची उत्पादकता वाढविणे व मूल्यसाखळीचा विकास करणे अशा गोंडस नावाखाली संशयास्पदपणे राबविल्या जात असलेल्या योजनेसाठी आणखी ५०० कोटी रुपये निधी मिळाला आहे.

कापूस, सोयाबीन मूल्यसाखळी विकास योजनेत झालेल्या कथित गैरव्यवहाराबाबत राज्यपाल, मुख्य सचिव, सक्तवसुली संचालनालय, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व लोकायुक्त अशा सर्व ठिकाणी पुराव्यांसह तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. पारदर्शकतेसाठी या योजनेचे लेखापरीक्षण करावे व गैरव्यवहारास जबाबदार असलेल्या मंत्र्यासह कृषी आयुक्तालय, मंत्रालय व कृषिउद्योग महामंडळातील दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी या तक्रारींमध्ये करण्यात आलेली आहे. मात्र, यातील एकाही तक्रारीची दखल न घेता आता याच योजनेसाठी पुन्हा ५०० कोटी रुपये ऐन विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर मंजूर करण्यात आले आहे.

## पिंपरी विधानसभेत एकही संवेदनशील मतदान केंद्र नाही

# उमेदवारांना ४० लाख रुपये खर्चाची मर्यादा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** विधानसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरण्याकरिता मागस प्रवर्गातील उमेदवाराला 5 हजार रुपये तर खुल्या प्रवर्गातील उमेदवाराला 10 हजार रुपये अनमात रक्कम जमा करावी लागणार आहे. या निवडणुकीकरिता प्रत्येक उमेदवाराला 40 लाख रुपये खर्च करण्याची मर्यादा आहे. निवडणुकीसाठी होणाऱ्या खर्चाची नोंद ठेवून त्याचा तपशील दररोज निवडणूक कार्यालयाकडे जमा करावयाचा आहे. त्याकरिता बँकेत उमेदवाराने स्वतंत्र खाते सुरू करायचे आहे. पिंपरी विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत एकूण 3 लाख 87 हजार 973 मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या मतदार संघात एका मतदान केंद्रावर मतदारांची संख्या सरासरी 975 असणार आहे.तर एकून मतदान ठिकाणे 87 असून, त्यामधील 398 मतदान केंद्रांवर हे मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील. या मतदार संघात एकही संवेदनशील मतदान केंद्र नसल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यातील सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यातील सर्वच मतदार संघातील तयारीचा आढावा घेतला आहे. काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रांच्या संख्येत काही प्रमाणात बदल झाल आहे.

विधानसभा निवडणुकीत मतदानाकरिता आणल्या जाणाऱ्या ईव्हीएम मशिनमहापालिकेच्या निगडीतील नेताजी सुभाषचंद्र बोस बॅडमिंटन हॉल येथिल स्ट्रॉंगरूममध्ये ठेवल्या जाणार आहेत.


तर चिंचवड येथील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटरमधून अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचे साहित्य वाटप केले जाणार असून, मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर याचठिकाणी हे मतदान साहित्य जमा करुन घेतले जाणार आहे.

त्यानंतर कडेकोट बंदोबस्तामध्ये या ईव्हीएम मशिन बालेवाडी येथील शिवछत्रपती स्टेडियममधील स्ट्रॉंगरूममध्ये सुरक्षितपणे ठेवले जाणार आहे.

### शहरातील 3 सोसायट्यांमध्ये 6 मतदान केंद्र

- मतदानाचा टक्का वाढावा, याकरिता निवडणूक आयोगाच्या वतीने विविध उपक्रम राबविले जात आहेत.
- या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीकरिता मोरवाडीतील त्रिवेणी व रिवरडेल सहकारी गृहनिर्माण सोसायटी, म्हाडा कॉलनीमध्ये प्रत्येकी दोन अशी एकूण चार मतदान केंद्र तर कासारवडीतील मंत्री इटेरनिटीसोसायटीमध्ये एकूण दोन मतदान केंद्र असणार आहेत.

### महिला मतदारांची संख्या 17 हजार 109 ने अधिक



- या मतदार संघात एकूण 3 लाख 87 हजार 973 मतदार आहेत. यामध्ये पुरुष मतदार 1 लाख 85 हजार 415, तर महिला मतदारांची संख्या 2 लाख 2 हजार 524 एवढी असून पुरुष मतदारांच्या तुलनेत ही संख्या 17 हजार 109 ने अधिक आहे. तर सैनिक मतदार 975, असून तृतीयपंथी मतदारांची संख्या 34 एवढी आहे.

» Selected



## वातावरणीय बदलाचा आरोग्यावर परिणाम; नागरिकांनी काळजी घ्यावी

**पिंपरी :** वातावरणात सतत होणाऱ्या बदलांमुळे शहर परिसरात सर्दी, खोकला, ताप, थंडी या आजाराचे रुग्ण वाढले आहेत. सोबत डासांचा प्रादूर्भाव वाढत असल्याने डेंग्यू, चिकनगुनिया सारख्या रोगांचाही प्रसार होत आहे. यापार्श्वभूमीवर कोणत्याही ताप अथवा इतर आजाराकडे नागरिकांनी दुर्लक्ष करू नये.प्रत्येक गुरुवारी कोरडा दिवस पाळावा, असे आवाहन नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. देहू परिसरामध्ये सुमारे १० मोठे रुग्णालये, २३ हून अधिक दवाखाने तर ७ पॅथॉलॉजी सेंटर आहेत. सध्या हवामानात वारंवार बदल होत आहे. त्यामुळे थंडी, ताप, सर्दी, खोकला यांसारख्या आजारातील रुग्णांची संख्या वाढत आहे. परिसरामध्ये जूनपासून साधारण १ हजार ७० हुन अधिक डेंगू सदृश्य रुग्णांची फक्त प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तपासणी केल्याची नोंद आढळली आहे.

यामध्ये डेंग्यू, चिकनगुनिया सदृश्य रुग्ण आढळून आले आहेत. खासगी रुग्णालयातील रुग्णाची माहिती संकलित करण्यात येते आहे.

नगरपंचायत प्रशासन आणि प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरातील नागरिकांच्या घरोघरी रुग्णांची तपासणी व सर्वे करण्यात येत असून जनजागृती करीत आहे. त्यासाठी औषध फवारणी सुरू करण्यात आले आहे. कोणताही ताप आल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधून त्यांचा सल्ला घेऊन उपचार घ्यावेत, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

## तीन जणांचा अभियंता पत्नीवर लैंगिक अत्याचार, पतीने चित्रीकरण केल्याचा धक्कादायक प्रकार

**पिंपरी :** तीन जणांना वेगवेगळ्या दिवशी पत्नीवर लैंगिक अत्याचार करण्यास सांगून पतीने त्याचे चित्रीकरण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पतीसह चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना पुनावळे येथे घडली. पीडिता आणि सर्व आरोपी हे उच्चशिक्षित असून, एका बहुराष्ट्रीय कंपनीत कार्यरत आहेत.याप्रकरणी ३० वर्षीय पत्नीने ठाणे शहरातील एका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मात्र, हा प्रकार रावेत भागात घडल्याने हे प्रकरण तपासासाठी बुधवारी (१६ ऑक्टोबर) रावेत पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले आहे. अभियंता असणाऱ्या पत्नीने फिर्याद दिल्यानंतर तिच्या पतीसह चार जणांविरोधात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सप्टेंबर २०२३ ते ६ एप्रिल २०२४ या कालावधीत पुनावळे येथे घडली आहे.आरोपी असलेल्या पतीने तीन जणांना वेगवेगळ्या दिवशी आपल्या पत्नीवर लैंगिक अत्याचार करण्यास सांगितले. तसेच या अत्याचाराची अश्लील चित्रफित तयार केली. ती चित्रफित प्रसारित करण्याची धमकी दिली. तसेच पतीने पत्नीसोबत अनैसर्गिक कृत्यही केले. पत्नीने त्यास विरोध केला असता, तिला शिवीगाळ केली. पत्नी सध्या ठाणे येथे असलेल्या घरी राहून काम करत आहे. तिचे आणि पतीचे गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू आहेत.

## भरधाव रिक्षाची दुचाकीला धडक; महिला गंभीर जखमी

**पिंपरी :** भरधाव वेगात जाणाऱ्या रिक्षाने एका दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकी चालक महिला गंभीर जखमी झाली. ही घटना महावीर चौक चिंचवड येथे घडली.याप्रकरणी जखमी महिलेने पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात रिक्षा चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला त्यांच्या मुलीला ट्युशन वरून घरी नेण्यासाठी आल्या होत्या. मुलीला दुचाकीवरून घरी घेऊन जात असताना महावीर चौक चिंचवड येथे भरधाव रिक्षाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात फिर्यादी महिला यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. अपघात झाल्यानंतर आरोपी रिक्षा चालक घटनास्थळी न थांबता पळून गेला. पिंपरी पोलीस तपास करीत आहेत.

## शाळेतील कर्मचाऱ्यानेच केला तीन विद्यार्थिनींचा विनयभंग

**पिंपरी :** शाळेतील अॅडमिन ऑफिसमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने तीन अल्पवयीन मुलींचा विनयभंग केला. ही घटना ऑगस्ट २०२४ ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत घडली. सरफराज मन्सुर शेख (वय ३२, रा. अकबर रेसिडन्सी, कोंढवा, पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत शाळेच्या मुख्याध्यापिकेने याबाबत नव्याने सुरू झालेल्या दापोडी (भोसरी) पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.शाळेतील १३ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीने शाळेच्या मुख्याध्यापकाला सांगितले की आरोपी सरफरात याच्या शरिराला वेगवेगळ्या ठिकाणी स्पर्श करीत बॅड टच केला. तसेच शाळेतील १५ वर्षीय मुलीलाही आरोपीने बॅडटच केल्याचे सांगितले. अन्य एका मुलीचा शाळेपासून तिच्या घरापर्यंत पाठलाग केला. दापोडी पोलीस तपास करीत आहेत.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## स्पेस ऑन व्हिल्स' पश्चिम महाराष्ट्रात दाखल

**पिंपरी :** 'स्पेस ऑन व्हिल्स' पश्चिम महाराष्ट्रात दाखल; १९-२२ ऑक्टोबर दरम्यान पिंपरी चिंचवड सायन्स पार्क व रहाटणी मधील एस एन बी पी शाळेमध्ये असणार आहे.भारतीयांचा स्वाभिमान असलेली भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्त्रो) आपल्या भेटीला येणार आहे. पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थी आणि विज्ञानप्रेमी नागरिकांना 'स्पेस ऑन व्हिल्स' या उपक्रमांतर्गत इस्त्रोच्या आजवरच्या पराक्रमांची रोमांचकारी सफर अनुभवता येणार आहे. विज्ञान भारती आणि इस्रो यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्पेस ऑन व्हील्स' हा विशेष विज्ञान प्रचार उपक्रमाची १७ ऑक्टोबर २०२४ रोजी पुण्यात उत्साहात सुरूवात झाली आहे. १९ व २० ऑक्टोबर, या शनिवार व रविवारी 'स्पेस ऑन व्हिल्स' पिंपरी चिंचवड सायन्स पार्क व तारांगण येथे विज्ञान रसिकांसाठी स. १०:०० ते सायं. ०६:०० या वेळेत सज्ज असणार आहे.त्यानंतर दिनांक २१-२२ तारखांना, रहाटणी मधील एस एन बी पी शाळेमधील तसेच परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना या प्रदर्शनाचा लाभ होणार आहे.विज्ञान भारती व पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या वतीने ही माहिती देण्यात आली. पुण्यासह नाशिक, अहिल्यानगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापर जिल्ह्यांत हे प्रदर्शन फिरणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून अंतराळ विज्ञानाचा प्रचार आणि विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश आहे. विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या समन्वयाने हा उपक्रम राबविला जात आहे. पहिल्या टप्प्यात पुणे, पिंपरी चिंचवड शहरांत 'स्पेस ऑन व्हिल्स' हा उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहे."भारताच्या विकासामध्ये अवकाश विज्ञानाच्या प्रगतीचे मोठे योगदान आहे. आधुनिक भारताच्या जडण-घडणीत भारतीय अवकाश संशोधन संस्थेने गेल्या साडे पाच दशकांत अनेक अडचणीचे टप्पे पार करून अंतरीक्ष युगात जी झेप घेतली आहे त्यामुळे संपूर्ण मानवजातीला विविध क्षेत्रांत लाभ मिळत आहे. या प्रगतीची झलक इस्रोच्या या प्रदर्शनातून दाखविली जाणार आहे. तरी, जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा", असे आवाहन संचालक मंडळ, पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या वतीने करण्यात आले आहे.

### कार्यक्रमाची वैशिष्ट्ये:

- अंतराळ संशोधनाची ओळख: इस्रोच्या यशस्वी मोहिमांचे प्रतिकृती मॉडेल्स आणि संबंधित माहिती.
- शैक्षणिक उपक्रम: विद्यार्थ्यांना व्यावहारिक अनुभव देणारे क्रियाकलाप आणि स्पर्धा.
- सर्वांसाठी खुला प्रवेश: हा उपक्रम विद्यार्थ्यांसह शिक्षक, विज्ञान प्रेमी आणि नागरिकांसाठी खुला आहे.
- कार्यक्रमात सहभागी शाळा आणि संस्थांना प्रशस्तीपत्रे प्रदान केली जातील.
- प्रदर्शनाच्या आयोजनात सहाय्य करणाऱ्या स्वयंसेवकांना विज्ञान भारती व इस्रोकडून प्रमाणपत्रे दिली जातील.

### बक्षिस समारंभ

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**प्रथम सात विजेत्यांसह १९२ स्पर्धकांनी जिंकली बक्षिसे**

## गणपती सजावट स्पर्धेचे बक्षिस वितरण संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेचे माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते यांच्या वतीने आयोजित केलेल्या गणेश महोत्सव घरगुती गणपती सजावट स्पर्धेचा बक्षिस वितरण आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान सोहळा गुरुवारी (दि.१७) सायंकाळी रहाटणी येथे उत्साहात पार पडला.

रहाटणी येथील नखाते पेट्रोल पंपासमोरील मोकळ्या मैदानात आयोजित भव्य सोहळ्यात विजयी स्पर्धकांना मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी-चिंचवड शहर भाजपाचे प्रवक्ते अमोल थोरात यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

गौरी गणपती सजावट स्पर्धेत प्रथम क्रमांकाची सात बक्षिसे देण्यात आली. विद्या किरण दाईवाल, वसंती उल्हास जावासकर, अभय मनोहर गायकवाड, ज्योती गणेश कुदरपाके, शरद गुरुदास सावलानी, प्रणील अनिल बोरकर, निलम श्रीकांत बर्गे यांना प्रथम क्रमांकाची ७ EV -bike बक्षिसे देण्यात आली. तर, ११ जणांना द्वितीय क्रमांकाची LED TV बक्षिसे देण्यात आली. तृतीय क्रमांकाची २१, चतुर्थ क्रमांकाची ५१, पाचव्या क्रमांकाची १०१ बक्षिसे विजेत्या स्पर्धकांना देण्यात आली. तसेच, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

त्याचबरोबर ७० व्या राष्ट्रीय फिल्म अवार्ड विजेता रहाटणीचा सुपुत्र अनंत शिंदे याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते द बेस्ट व्हॉईसओव्हर इन द हिस्टरी ऑफ नॅशनल अॅवॉर्ड देण्यात आला. याबद्दल चंद्रकांत नखाते यांच्या वतीने त्याचाही या व्यासपीठावर सन्मान करण्यात आला. तसेच, औंध येथे झालेल्या राज्यस्थरीय कुस्ती स्पर्धेत ओम तानाजी नखाते, साहिल विशाल नखाते, रणजीत हिप्परकर, हर्ष विवेक नखाते यांनी पुणे केसरी किताब पटकिवल्याबद्दल त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला सुमारे तीन हजार नागरिकांची गर्दी होती.

## भोसरी विधानसभेत बदल घडविण्यासाठी यंत्रणा सज्ज – अजित गव्हाणे

**भोसरीमध्ये होणार महाविकास आघाडीचा आमदार**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** निवडणुकीमध्ये केंद्र व बुथ प्रमुखांची जबाबदारी महत्वपूर्ण असून बुथ यंत्रणा सक्षम असेल तरच निवडणूक जिंकणे सोपे होते, त्यामुळे कार्यकर्त्यांनी बूथ यंत्रणेची जबाबदारी आत्मविश्वासाने पार पाडावी असे आवाहन स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले. आपली बूथ यंत्रणा सक्षम आहे. आता केंद्रप्रमुख या संरचनेप्रमाणे आपल्याला निवडणुकीला सामोरे जायचे आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर जो उमेदवार अधिकृतरित्या निवडणुकीला सामोरा जाणार आहे. त्यामागे ही यंत्रणा उभी करून भोसरी विधानसभेत आपल्याला बदल घडवायचा आहे. महाविकास आघाडीमध्ये एकजूट असून या एकजुटीतून भोसरी विधानसभेत महाविकास आघाडीचाच आमदार होणार असल्याचेही अजित गव्हाणे म्हणाले.इंद्रायणीनगर येथील पर्ल बँक्वेट हॉल येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने बूथ व केंद्रप्रमुख, पदाधिकारी, माजी नगरसेवक यांची बैठक पार पडली. त्यावेळी अजित गव्हाणे बोलत होते. यावेळी महाविकास आघाडीचे आजी-माजी पदाधिकारी, पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.अजित गव्हाणे यावेळी म्हणाले, प्रत्येक बुथ कार्यकर्त्यांनी गांभीर्याने घेऊन निवडणुकीची जबाबदारी पार पाडायची आहे. निवडणुकीची लढाई ही नेहमी कार्यकर्त्यांच्या जीवावर लढली जाते.



> भोसरी मतदारसंघांमध्ये परिवर्तनाची लढाई आपण सुरू केली असून भोसरी मतदारसंघातील भ्रष्टाचार, दडपशाही यामुळे येथील प्रत्येक नागरिक कंटाळलेला आहे. येथील प्रत्येक कामातील भ्रष्टाचार अनेक गैरसोयींसाठी कारणीभूत ठरत आहे. मतदार संघातील चहुबाजूच्या वाहतूक कोंडीने अक्षरशः येथील नागरिक मेटाकुटीला आला आहे..या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपल्याला परिवर्तन घडवायचे "
>
> — अजित गव्हाणे

### शहरात एक हजारांहून अधिक फटाक्यांची दुकाने

# दीपावलीनिमित्त नागरिकांची खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरात गल्लोगल्ली फटाक्यांची दुकाने लागतात. शहरात एक हजारांहून अधिक फटाक्याच्या दुकानांची संख्या आहे. मात्र परवानगी घेतलेल्या अधिकृत फटाक्यांच्या दुकानांची संख्या पाऊणशेच्या आताच आहे. महापालिका प्रशासन आणि पोलीस यांचे या दुकानांना अभय असल्याचे दिसून येते.

फटाके विक्रीच्या व्यावसायात गुंतवणुकीच्या जवळपास तिप्पट नफा अवघ्या काही दिवसांमध्ये मिळत असल्याने अनेकजण या व्यावसायाकडे वळत आहेत.

मात्र फटाके विक्री करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या अनेक दुकानदार घेतच नाही. त्यामुळे या फटाके विक्री करणाऱ्या दुकानदारांकडून पिंपरी चिंचवडकरांच्या जिवाशी खेळ सुरू आहे. जर महापालिका किंवा पोलीस कारवाईचे निमित्त करून आलेच तर त्यांच्या हातावर शे-पाचशे रुपये टेकविले जातात. त्यामुळे महापालिका आणि पोलीसही अशा दुकानांकडे दुर्लक्ष करतात. पिंपरी चिंचवडकरांच्या सुदैवाने शहरात अद्याप कोणत्याही फटाक्याच्या दुकानाला आग लागलेली नाही. मात्र भविष्यातही अशी घटना घडणार नाही, हे कोणीच छातीठोकपणे सांगू शकत नाही.



मात्र भविष्यात नियमांकडे दुर्लक्ष केल्यास काही घटना घडली तर त्यात किती जिवीतहाणी किंवा वित्तहानी होईल, हे सांगता येत नाही. असे असतानाही कोणतीच खबरदारी न घेता गल्लोगल्ली फटाके विक्री जोमात असते.



शहरातील गर्दीच्या ठिकाणी अथवा निवासी इमारतीच्या खाली फटाक्यांची दुकाने थाटली जातात. अशी दुकाने टाकताना शासनाने दिलेल्या नियमांचे पालन केले जात नाही. या दुकानांवर कारवाई करण्याचे अधिकारी महापालिकेचा अतिक्रमण विभाग आणि पोलिसांना असते. सर्व नियमांचे पालन झाले असल्यास अग्निशामक दल या दुकानांना केवळ ना-हरकत प्रमाणपत्र देते. मात्र अशा घटना घडल्यावर केवळ अग्निशामक दलास जबाबदार धरले जाते.

### कोणती कागदपत्र आवश्यक

- मागील वर्षाचा ना-हरकत दाखला प्रत
- मागील वर्षाचा पोलीस परवाना
- यंदाची मिळकतकर भरणा पावती
- दुकानाच्या जागेचा कच्चा नकाशा
- जागा मालकाचा ना-हरकत दाखला
- दुकान असलेल्या सोसायटीचा ना-हरकत दाखला
- अग्निशामक साधने खरेदीचा दाखला

### यंदा आत्तापर्यंत ७७ अर्जांचे वितरण

- फटाके विक्री करण्यासाठी आवश्यक असलेली परवानगी घेण्यासाठी आत्तापर्यंत ७७ अर्ज दुकानदारांनी घेतले आहेत. मात्र यापैकी अनेकांना आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करता येत नसल्याने ते अनधिकृत दुकाने थाटतात.
- तसेच दुकानाचे आरसीसी बांधकाम आहे का, त्यास लोखंडी शटर आहे का, स्टॉल असल्यास त्याचे क्षेत्रफळ किती, बाजूच्या दोन्ही दुकानदारांची नावे व त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच दुकान मुख्य रस्त्यालगत आहे की गल्लीत आहे याची सर्व माहिती अग्निशामक दलास देणे बंधनकारक आहे.

#रा

### ‘त्या’ १२ जागांसाठी ठाकरे गटाने धरला आग्रह

# मविआमध्ये विदर्भामधील जागांवरून तिढा कायम!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्यात निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. अद्याप महायुती आणि मविआ यांच्यातील जागावाटपाचा तिढा सुटलेला नाही. यादरम्यान मविआच्या गोटातून एक मोठी बातमी समोर आली आहे. विदर्भातील जागांवरून त्यांच्यात तिढा अद्याप कायम आहे. ठाकरे गटाने विदर्भामध्ये १२ जागांसाठी आग्रह धरला आहे.

विदर्भामध्ये ६२ विधानसभेच्या जागा आहेत, त्यापैकी ४६ जागा काँग्रेसकडे आठ जागा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष आणि आठ जागा शिवसेना ठाकरे गटाला असं वाटप झालं आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत वाटप झालेल्या जागांपेक्षा ठाकरे गटाला विदर्भामध्ये चार जागा अधिकच्या हव्या आहेत. त्यामुळे जागा वाटपाचा तिढा कायम आहे.

### कोणत्या जागांसाठी धरला आग्रह ?

● विदर्भामध्ये १२ जागांवर ठाकरे आग्रही आहे. विदर्भातील रामटेक, कामठी, दक्षिण नागपुर, वरोरा, आरमोरी, भंडारा, बुलढाणा, सिंदखेडराजा, आरणी, वर्धा, यवतमाळ, दिग्रज या जागांसाठी उद्धव ठाकरे गट आग्रही आहे. मात्र, विदर्भात काँग्रेसची ताकद जास्त असल्याने या जागा काँग्रेसला सोडाव्यात इतर ठिकाणी आम्ही कमी घ्यायला तयार असल्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे. यावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यामध्ये वाद झाल्याचे समजत आहे.



# पंतप्रधान मोदींच्या पुतळ्याचे दहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**टोरंटो** : कॅनडातील टोरंटो येथे झालेल्या निदर्शनादरम्यान खलिस्तानी समर्थकांनी भारतीय ध्वजाचा अपमान केला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुतळ्याचे दहन केले. खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जरच्या मृत्यूच्या १६ महिन्यांच्या जयंतीनिमित्त हे निदर्शन आयोजित करण्यात आले होते. निदर्शनादरम्यान समर्थकांनी ‘मोदींच्या राजकारणाला मारा’, ‘जय जस्टिन ट्रुडो’ आणि ‘जय खलिस्तान’ अशा घोषणा दिल्या.

आंदोलकांनी कॅनडातील सर्व भारतीय वाणिज्य दूतावास बंद करण्याची मागणी केली. या दूतावासांमुळे त्यांच्या समुदायाला धोका आहे, असा त्यांचा आरोप आहे. व्हिडीओमध्ये आंदोलक भारतीय राष्ट्रध्वजावर उभे राहून पंतप्रधान मोदींच्या पुतळ्याला मॉक जेलमध्ये ठेवून त्यावर बूट मारताना दिसत आहेत. या प्रदर्शनासोबतच गुरुद्वाराने तलविंदर सिंग परमारसह चार खलिस्तानी दहशतवाद्यांच्या स्मरणार्थ २० ऑक्टोबरला स्मारकाचा कार्यक्रम आयोजित करण्याची योजना आखली आहे. एअर इंडियाच्या फ्लाइट १८२ मधील १९८५ च्या बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी परमारने ३२९ लोक मारले होते.

## » Selected

### युक्रेन-रशिया युद्धात उत्तर कोरियाही उतरला

**सेऊल :** युक्रेन विरुद्धच्या युद्धात रशियाला मदत करण्यासाठी उत्तर कोरियाने आपले १२,००० सैन्य पाठविले आहे. यामध्ये तगड्या सैन्य तुकडीचा विशेष मोहिमांसाठी समावेश असल्याची माहिती दक्षिण कोरियाच्या गुप्तचर संस्थांनी दिली आहे. योनहापने राष्ट्रीय गुप्तचर सेवे (एनआयएस)च्या हवाल्याने म्हटलंय की, रशियाला मदत करण्यासाठी उत्तर कोरियाचे सैन्य आधीच रवाना झाले आहेत. हे माहिती समोर आल्यानंतर राष्ट्राध्यक्ष यून सूक येओल यांनी तातडीची बैठक घेतली. दक्षिण कोरियाच्या कार्यालयाने केलेल्या निवेदनानुसार, उत्तर कोरियाकडून सैन्य पाठवणे हा दक्षिण कोरिया आणि जगाच्या सुरक्षेला गंभीर धोका असल्याची भीती बैठकीत उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. आता या घडामोडींमुळे तणावामध्ये आणखी वाढ झाली आहे.

### सलमान खान कुणाचीही माफी मागणार नाही : सलीम खान

**मुंबई :** प्राणी मारण्याचं सोडाच, सलमाननं कधी साधं झुरळ मारलं नाही. त्यामुळं तो कुणाचीही माफी मागणार नाही,’ अशा शब्दांत सलमानचे वडील, पटकथा लेखक सलीम खान यांनी ठणकावले आहे. काळवीटाच्या शिकारीच्या प्रकरणात नाव आलेल्या सलमान खान याला लॉरेन्स बिष्णोई टोळीकडून सातत्यानं धमक्या येत असतात. काही दिवसांपूर्वी सलमानच्या मुंबईतील घराबाहेर गोळीबारही झाला होता. तसंच, त्याचे वडील सलीम खान हे मॉर्निंग वॉकला गेलेले असताना एकानं त्यानं पत्र देऊन धमकी दिली होती. त्या पार्श्वभूमीवर त्याला पोलीस सुरक्षा व रिव्हॉल्वर बाळगण्याचा परवानाही दिला होता. आता माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर सलमानच्या जिवाला धोका वाढला आहे. सिद्दीकी यांची हत्या बिष्णोई टोळीनंच केल्याचं तपासात उघड झालं आहे. सलमान व सिद्दीकी यांचे संबंध उत्तम होते. त्यामुळं उलटसुलट चर्चा सुरू झाली. त्यातच या हत्येनंतर मुंबई पोलिसांना धमकीचा मेसेज आला. सलमानला जिवंत राहायचं असेल आणि लॉरेन्स बिष्णोईशी शत्रुत्व संपवायचं असेल तर त्याला ५ कोटी रुपये द्यावे लागतील. नाहीतर त्याची अवस्था बाबा सिद्दीकीपेक्षा वाईट होईल, असं त्यात म्हटले होते.

### कल्याणमध्ये महायुतीत बंड

**कल्याण :** आगामी विधानसभेच्या तोंडावर कल्याण पूर्व मतदारसंघात महायुतीला बंडखोरीचा सामना करावा लागू शकतो. भाजपने विद्यमान आमदार गणपत गायवाड किंवा कुटुंबातील सदस्यांना तिकीट दिले, तर अपक्ष निवडणूक लढणार, असा इशारा शिंदे गटाचे नेते तथा शहरप्रमुख महेश गायकवाड यांनी भाजपला दिला आहे. या इशाऱ्यानंतर निवडणुकीआधीच महायुतीमध्ये बंडाळीचे संकेत पाहायला मिळत असल्याचे दिसून येत आहे.

## मुंबईतील चेंबूर येथील संतोषी माता मंदिरात भीषण आग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : मुंबई येथील चेंबूर कॉलनी परिसरातील संतोषी माता मंदिरात आज दुपारी भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत.

आगीचे कारण अद्याप समजू शकले नसून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू आहे. या आगीच्या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ माजली. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई येथील चेंबूर परिसरातील संतोषी माता मंदिरात आज दुपारी २.१५ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू आहे. या आगीत अद्याप कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे वृत्त आहे. हे मंदिर गांधी मार्केट म्हणून प्रसिद्ध असलेल्या बाजारात आहे. यामुळे या परिसरात नेहमीच लोकांची गर्दी पाहायला मिळते.

### सांगलीतील सुख ओढ्यात वाहात आल्या ५०० च्या नोटा

# ओढ्यात आला नोटांचा पूर !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सांगली** : सांगली - सांगली जिल्ह्यातील आटपाडीमध्ये असलेल्या सुख ओढ्यात पाचशे रुपयांचा नोटा वाहात असल्याचा आश्चर्यकारक प्रकार शनिवारी घडला. या प्रकारानंतर काही जणांनी थेट ओढ्यामध्ये उतरून या भिजलेल्या नोटा गोळा केल्या.

या नोटा ओढ्यामध्ये नक्की कशा आल्या, याबद्दल माहिती मिळालेली नाही. पण ओढ्यात पाचशे रुपयांच्या नोटा आल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचा पाहायला मिळाला. या प्रकरणी आटपाडी पोलिस तपास करीत आहेत.

आटपाडीमध्ये अंबाबाई मंदिरालगतच्या ओढ्यातून तेथील बाजार पटांगणाकडे येणाऱ्या ओढ्याच्या पाण्यामध्ये पाचशे रुपयांच्या नोटा वाहात असल्याचे काही नागरिकांना दिसले. त्यानंतर ही बातमी तिथे वाऱ्यासारखी पसरली.

गेल्या काही दिवसांमध्ये अचानक येणाऱ्या मुसळधार पावसामुळे या ओढ्याला सध्या पाणी आहे. त्यात पाचशे रुपयांच्या नोटा आढळल्यामुळे ऐन दिवाळीच्या तोंडावर स्थानिकांच्या तोंडावर आनंदाचे भाव उमटल्याचे पाहायला मिळाले.

ओढ्याच्या पाण्यात पाचशेच्या नोटा आल्याने ते बघण्यासाठी आणि वाहत्या पाण्यात हात धुवून घेण्यासाठी स्थानिकांनी गर्दी केली. काहींनी या नोटा गोळा करून खिशात घातल्या. हा प्रकार काही सजग नागरिकांनी लगेचच मोबाईल कॅमेऱ्यात कैद केला. या घटनेबद्दल माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर नागरिकांनी तेथून काढता पाय घेतला. आटपाडी पोलिस या पाचशेच्या नोटा ओढ्यामध्ये कशा वाहत आल्या याबाबत अधिक तपास करीत आहेत.

### मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार : दहशतवाद्यांकडून बॉंबस्फोट, गोळीबार

# नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**इंफाळ** : मणिपूरमधील जिरीबाम जिल्ह्यात पुन्हा एकदा हिंसाचार उसळला आहे. शनिवारी पहाटे पाच वाजता बोरोबेकरा भागातील एका गावात बंडखोरांनी गोळीबार केला. बोरोबेकरा पोलिसांनी सांगितले, की बंडखोरांनी गावात बॉम्बही फेकले. माहिती मिळताच पोलिस आणि राज्य राखीव दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले. दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये गोळीबार सुरू आहे. सध्या या हल्ल्यात कोणी जखमी झाल्याची माहिती नाही. वृद्ध, महिला आणि लहान मुलांना सुरक्षित स्थळी नेण्यात आले आहे.

पोलिसांनी सांगितले, की बोरोबेकरा हे जिरीबाम शहरापासून ३० किलोमीटर दूर आहे. या भागात घनदाट जंगल आणि डोंगर असल्याने याआधीही येथे गोळीबाराच्या घटना घडल्या आहेत. यापूर्वी १८ ऑक्टोबर रोजी जिरीबाममधील कालीनगर हमर वेंग भागातील एका शाळेला बंडखोरांनी आग लावली होती. १५ ऑक्टोबर रोजी केंद्रीय गृहमंत्रालयाच्या निमंत्रणावरून मैतेई, कुकी आणि नागा समुदायातील २० आमदार दिल्लीत पोहोचले होते. त्यांना मणिपूरमध्ये यापुढे हिंसाचार न करण्याची शपथ देण्यात आली. सभेच्या चार दिवसानंतर शनिवारी जिरीबाममध्ये हिंसाचार झाला. जिरीबाममधील कालीनगर हमर वेंग भागातील ब्लूमिंग फ्लॉवर स्कूलला बंडखोरांनी आग लावली.

चारदिवसांपूर्वी मणिपूरमधील शांततेसाठी दिल्लीत बैठक झाली होती. १५ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीत प्रथम कुकी, नंतर मैतेई आणि नंतर नागा नेत्यांशी बोलणे झाले. प्रत्येकाने आपल्या मागण्या केंद्रापुढे मांडल्या. यानंतर सर्वांनी एका सभागृहात एकत्र येऊन शपथ घेतली, की आजच्या सभेनंतर मणिपूरमध्ये एकही गोळी चालवली जाणार नाही आणि कोणीही मरणार नाही. याला तिन्ही समाजाच्या प्रतिनिधींनी सहमती दर्शवली. यानंतर प्रतिनिधींनी एकमेकांशी हस्तांदोलन केले.

### उपराज्यपालांची ओमर अब्दुल्ला मंत्रिमंडळाच्या प्रस्तावाला मंजुरी

# जम्मू-काश्मीरला मिळणार पूर्ण राज्याचा दर्जा ?

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेशात विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांचे सरकार स्थापन झाले आहे. त्यानंतर राज्याला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा यावर ओमर अब्दुल्ला यांच्या सरकारचा भर आहे. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. त्यानंतर उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी आज या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे जम्मू काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळण्याच्या आशांना आणखी बळ मिळाले आहे.



दरम्यान, ओमर अब्दुल्ला यांच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करण्यासंबंधीचा प्रस्ताव आणण्यात आला होता, परंतु त्यात कलम 370 आणि 35A चा उल्लेख नव्हता. केंद्रशासित प्रदेशाच्या प्रस्तावाला उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी मंजुरी दिली आहे.

# शिक्षा भोगत असलेल्या आसारामची प्रकृती खालावली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जोधपूर :** जोधपूरच्या मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला आसाराम आता आपल्या मुलाला भेटू शकणार आहे. गेल्या ११ वर्षांपासून जोधपूर तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसारामची प्रकृती खालावल्याने गुजरात तुरुंगात शिक्षा भोगत असलेला त्यांचा मुलगा नारायण साई याने वडिलांना भेटण्यासाठी गुजरात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. गुजरात उच्च न्यायालयाने ही मंजूर केली आहे. यासाठी नारायण साईला ५ लाख रुपये मोजावे लागणार आहेत.



आसाराम ११ वर्षांनंतर मुलगा नारायण साईला भेटणार आहे. आसाराम आणि त्याचा मुलगा नारायण साई हे दोघेही लैंगिक शोषण प्रकरणात वेगवेगळ्या तुरुंगात शिक्षा भोगत आहेत.

नुकतीच आसारामला राजस्थान उच्च न्यायालयाने महाराष्ट्रात उपचारासाठी जाण्याची परवानगी दिली होती. आसारामला उपचारासाठी पॅरोल मंजूर करण्यात आला होता. आसारामचा मुलगा नारायण साई गुजरातच्या मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. गुजरात उच्च न्यायालयाने नारायण साई याला वडील आसारामला भेटण्यासाठी काही अटींसह ४ तासांचा अवधी दिला आहे. या बैठकीला आसाराम याच्या कुटुंबातील एकही सदस्य उपस्थित राहणार नाही.

# यकृत दान करुन दिले जिवदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रायपूर :** छत्तीसगडमधील तिल्डा येथील अनिल कुमार यादव यांच्या मुलीने यकृत दान करून त्यांचे प्राण वाचवले आहेत. यकृत प्रत्यारोपणानंतर अनिल ऑपरेशन थिएटरमध्ये जुन्या गाण्यांवर नाचताना दिसले. त्याचा व्हिडीओही व्हायरल होत आहे.

लिव्हर सिरोसिससारख्या गंभीर आजाराने ग्रासल्यामुळे अनिल यांची प्रकृती चिंताजनक बनली होती. पोटात पाणी जमा होणे, कावीळ, रक्ताच्या उलट्या, अशक्तपणा यामुळे त्यांचे जीवन क्षणोक्षणी मृत्यूच्या जवळ जात होते. यापूर्वीही अनेक बड्या डॉक्टरांनी अनिल यांच्या जगण्याबाबत साशंकता व्यक्त केली होती. यानंतर श्री नारायण हॉस्पिटल रायपूरमध्ये उपचार सुरू झाले. या काळात त्यांच्या यकृताची स्थिती इतकी बिघडली होती, की ते फक्त सहा महिने जगू शकतील अशी स्थिती होती. अनिल यांना वाचवण्याचा एकमेव उपचार म्हणजे यकृत प्रत्यारोपण आणि अशा कठीण काळात त्यांची मुलगी वंदना हिने उचललेले पाऊल उदाहरण ठरले.

### आ.संतोष बांगर यांना निवडणूक आयोगाने धाडली नोटीस

# 'ते' वादग्रस्त वक्तव्य भोवणार !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हिंगोली** : एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यांनी भरसभेत केलेल्या विधानामुळे त्यांच्या अडचणी वाढणार आहेत. कारण त्यांच्या या विधानाची दखल निवडणूक आयोगाने घेतली आहे. हे नेमके काय प्रकरण आहे जाणून घेऊयात...

शिवसेनेचे आमदार संतोष बांगर हे नेहमी आपल्या वक्तव्यामुळे चर्चेत असतात. आपल्या रोखठोक भूमिकेमुळे अनेकदा त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. असेच एक प्रकरण समोर आले त्यामुळे त्यांच्या अडचणी वाढू शकतात. बाहेरगावी असलेल्या कार्यकर्त्यांची लिस्ट दोन-तीन दिवसांमध्ये द्यावी, त्यांना सांगा गाड्या करा, गाड्यांसाठी जे काही लागतं ते त्यांना फोन पे करतो, त्यांना सांगा येण्या-जाण्याचा जे काही लागते ते आम्हाला सांगा. असे आर्थिक प्रलोभन देणार वक्तव्य आमदार संतोष बांगर यांनी केले. ते हिंगोलीतील कळमनुरी येथील एका कार्यक्रमात बोलत होते.

### निवडणूक आयोगाने घेतली दखल

● आमदार बांगर यांनी मतदारांना पैशाचं प्रलोभन दिल्याने निवडणूक आयोगाने त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी उद्धव ठाकरे गटाने केली आहे. त्यांच्या या मागणीची दखल घेत निवडणूक आयोगाने आमदार संतोष बांगर यांना त्या वक्तव्याचा खुलासा सादर करण्याची नोटीस बजावली आहे. तसेच पुढील २४ तासांमध्ये आमदार बांगर यांनी खुलासा सादर करावा असं त्या नोटीसमध्ये म्हटलं आहे.

### संभाजीनगरमध्ये शिवसेना विरुद्ध शिवसेना सामना रंगणार

# पाच मतदारसंघात ठाकरेंचे शिलेदार ठरले!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील उद्धवठाकरेंच्या शिवसेनेचे उमेदवार निश्चित झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपाची घोषणा अद्याप झालेली नसतानाच उद्धव ठाकरेंनी छत्रपती संभाजीनगरमधील आपल्या पक्षाचे उमेदवार ठरवले आहेत. उद्धव ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत छत्रपती संभाजीनगरच्या उमेदवारांबाबत अंतिम निर्णय झाला आहे. छत्रपती संभाजीनगरमधून ठाकरे गटाचे५ शिलेदारजवळपास निश्चित झाले आहेत. या पाचही उमेदवारांना तयारी करण्याचे आदेश पक्षाकडून देण्यात आले असून लवकरच त्यांना एबी फॉर्म दिले जाणार आहेत. उद्धव ठाकरे यांच्याकडून संभाजीनगर मधील पाच इच्छुकांना निवडणूक लढण्याचे आदेश मिळाले आहेत. त्यांना तयारीला लागण्याचा दिल्या सूचना देखील दिल्या आहेत. पुढच्या दोन दिवसात एबी फॉर्म मिळतील. अर्ज दाखल करण्याची तयारी करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

वैजापूरमधून दिनेश परदेशी यांना उमेदवारीचे संकेत मिळाल्याने कार्यकर्त्यांकडून फटाके वाजवून केलं स्वागत करण्यात आले आहे. औरंगाबाद मध्य, औरंगाबाद पश्चिम,कन्नड,सिल्लोड आणि पैठण मतदारसंघातील उमेदवार निश्चित झाले आहेत.

### ठाकरेंनी कोणा-कोणाला दिली संधी?

● ठाकरेंनी आज पाच जणांचे तिकीट निश्चित केले आहे. छत्रपती संभाजीनगर मध्य या मतदार संघातून किशनचंद तनवाणी, छत्रपती संभाजीनगर पश्चिम मतदारसंघातून राजू शिंदे,वैजापूर मतदारसंघातून दिनेश परदेशी, कन्नड मतदारसंघातून उदयसिंह राजपूत आणि सिल्लोड मतदारसंघातून सुरेश बनकर यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे.




#रा



## खेळायला जाण्यास शाकिबचा नकार

बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू शकिब अल हसनने मायदेशात न परतण्याचा निर्णय घेतला आहे. शाकिब सध्या त्याच्या कुटुंबासह अमेरिकेत राहतो. बांगलादेशातील निदर्शनांदरम्यान झालेल्या खुनाच्या आरोपामुळे शकिब मायदेशी परतणार नसल्याचे त्याने सांगितले. भारत बांगलादेश कसोटी सामन्यादरम्यान शकिबने ट्वेंटी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. त्यावेळी शाकिबने मायदेशात अर्थातच बांगलादेशात अखेरचा कसोटी सामना खेळण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर २१ ऑक्टोबरपासून बांगलादेशमध्ये सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या मालिकेसाठी शाकिबला संघात स्थान देण्यात आले होते. त्यामुळे शाकिब त्याचा अखेरचा कसोटी सामना मायदेशात खेळेल, यावर शिक्कामोर्तब झाला होता. परंतु, हाती आलेल्या नव्या वृत्तानुसार शाकिब मायदेशी परतणार नसल्याची बातमी समोर येत आहे.

### टीम इंडियाने गटांगळ्या खाल्ल्या; ५४ धावांत ७ विकेट्स

# न्यूझीलंडला १०७ धावांचे लक्ष्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** न्यूझीलंडने बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर वर्चस्व गाजवलेले दिसतेय. भारताचा पहिला डाव ४६ धावांवर गुंडाळून त्यांनी ४०२ धावा उभ्या केल्या. ३५६ धावांची पिछाडी भरून काढण्यासाठी मैदानावर उतरलेल्या भारताने आघाडी घेतली. पण, सर्फराज खान आणि ऋषभ पंत यांच्या मेहनतीवर पाणी फिरले. सर्फराजच्या विकेटनंतर पुढील ५४ धावांत भारताचे ७ फलंदाज माघारी परतले आणि न्यूझीलंडसमोर १०७ धावांचे माफक लक्ष्यच उभे राहिले. त्यात दिवस संपायला २० षटकांचा खेळ शिल्लक असताना अम्पायरने सामना थांबवण्याचा निर्णय घेतला आणि कर्णधार रोहित शर्माचा पारा चढला.




भारताने दुसऱ्या डावात दमदार खेळ केला. यशस्वी जैस्वाल ( ३५), रोहित शर्मा ( ५२) ,विराट कोहली ( ७०) यांनी चांगली सुरुवात करून दिली होती. सर्फराज खान -ऋषभ पंतच्या जोडीने न्यूझीलंडला हादरवून टाकले आणि भारताला आघाडी मिळवून दिली. विराट व सर्फराज खान यांनी १३६ धावांची भागीदारी केली ,परंतु तिसऱ्या दिवसाच्या अखेरच्या चेंडूवर विराटची विकेट मिळवण्यात किवींना यश आले. सर्फराज व ऋषभ पंत या जोडीने चौथ्या दिवशी पैसा वसूल फटकेबाजी करताना २११ चेंडूंत १७७ धावा कुटल्या. सर्फराज १९५ चेंडूंत १८ चौकार व ३ षटकारांसह १५० धावांवर झेलबाद झाला. ऋषभ १०५ चेंडूंत ९ चौकार व ५ षटकारांच्या मदतीने ९९ धावांवर बाद झाला.

लोकेश राहुल ( १२) आणि रवींद्र जडेजा ( ५) अपयशी ठरला. आर अश्विनने काही सुरेख फटके मारले, परंतु त्यालाही १५ धावांवर माघारी पाठवले.अम्पायर कॉलमुळे आर अश्विन बाद ठरला. जसप्रीत बुमराह व मोहम्मद सिराज शून्यावर बाद झाले आणि भारताचा दुसरा डाव ४६२ धावांवर आटोपला. न्यूझीलंडकडून मॅट हेन्री व विलियम ओरोक यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. लक्ष्याचा पाठलाग करायला किवी संघ मैदानावर आला आणि भारतीय गोलंदाज विकेट घेण्यासाठी सज्जही होते. पण, अंधुक प्रकाशामुळे किवी फलंदाजांनी मैदानाबाहेर जाण्याचा निर्णय घेतला.

अम्पायरनेही खेळ थांबवला आणि हे पाहून रोहित संतापला. त्याने अम्पायरला जाब विचारला. किवी फलंदाज ड्रेसिंग रुममध्ये गेले असताना भारतीय खेळाडू मैदानावरच उभे होते आणि अम्पायरसोबत त्यांची चर्चा सुरू होती. अखेर चौथ्या दिवसाचा खेळ थांबवण्यात आला. किवींनी उद्या १०७ धावा करायच्या आहेत आणि आता भारताच्या मदतीला पाऊस धावून येईल अशी प्रार्थना चाहते करत आहेत.

## डेन्मार्क ओपन स्पर्धेतील भारताचे आव्हान संपुष्टात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** डेन्मार्क ओपन २०२४ स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात पी. व्ही. सिंधूचा पॅरिस ऑलिम्पिक ब्राँझपदक विजेत्या ग्रेगोरिया तुन्जुंगकडून पराभव झाला आणि त्याचबरोबर डेन्मार्क ओपन स्पर्धेतील भारताचे आव्हान संपुष्टात आले. एक तास चाललेल्या लढतीत सिंधूचा १३-२१, २१-१६, ९-२१ असा पराभव झाला. सिंधू आणि ग्रेगोरिया यांच्यात या लढतीअगोदर १२ सामने झालेले आहेत. यातील केवळ दोनच सामने ग्रेगोरियाला जिंकता आलेले आहेत. इतके वर्चस्व असूनही सिंधूला विजय मिळवता आला नाही. दुसरा गेम २१-१६ अशा फरकाने जिंकल्यानंतर तिसऱ्या गेममध्ये ती ९-२१ अशी निष्प्रभ ठरली.

या डेन्मार्क ओपन स्पर्धेत सिंधूने जागतिक क्रमवारीत चौथ्या आणि सातव्या स्थानावर असलेल्या खेळाडूंना पराभूत करून वाटचाल कायम ठेवली होती. आजच्या सामन्यात तिने दुसरा गेम जिंकला असला तरी त्यासाठी शर्थ करावी लागली होती.



## महाराष्ट्रास सुवर्णचा दुहेरी मुकुट

**पुणे :** पुष्पुर येथील अलबर्ट एक्का स्टेडियमवर सुरू असलेल्या ३४व्या किशोर-किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोर व किशोरी संघाने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. किशोर गटाचे सलग ९वे तर किशोरी गटाचे ७वे विजेतेपद आहे. साताराचा प्रसाद बळीप सर्वोत्कृष्ट खेळाडूचा भरत पुरस्काराचा तर सांगलीच्या वेदिका तामखडे ही इला पुरस्काराची मानकरी ठरले. महाराष्ट्र विरुद्ध तेलंगणा हा मुलांचा अंतिम सामना अतिशय अटीतटीचा झाला. मध्यंतराला १ गुणांनी पिछाडीवर असलेल्या महाराष्ट्र संघाने २४-१५ असा सामना जिंकला. महाराष्ट्र संघाकडून भीमसिंग वसावे २.०० मी. व१ गडी, श्री दळवी १.१०, ०.५० मी. व १ गडी, प्रसाद बळीप १.००, २.०० मी. व ३ गडी, सचिन थोरात १.१०, १.०० मी. व १ गडी, विनायक भांगे १.२० मी. अशी सांघिक कामगिरी बजावली.

## रोहीत रावत याला विजेतेपद

**पुणे :** पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना (पीडीबीएसए) तर्फे आयोजित राज्य निवड चाचणी १५-रेड स्नुकर स्पर्धेत रोहीत रावत याने कृष्णराज अरकोट याचा





पराभव करून स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. राज्य चाचणी स्पर्धेतून रोहीत रावत, कृष्णराज अरकोट यांच्यासह अमरदीप घोडके आणि सिद्धार्थ टेंभे यांची निवड झाली आहे. वानवडी रस्त्यावरील द क्यु कल्चर मध्ये झालेल्या अंतिम सामन्यामध्ये रोहीत रावत याने कृष्णराज अरकोट याचा ३-२ असा संघर्षपूर्ण पराभव केला. सामन्यामध्ये कृष्णराज याने पहिली फ्रेम ६२-५१ अशी तर, दुसरी फ्रेम ६०-०० अशी जिंकून दमदार सुरूवातीसह २-० अशी आघाडी घेतली. ०-२ अशा पिछाडीनंतरही रोहीत याने तिसऱ्या फ्रेममध्ये ४२ गुणांचा ब्रेक नोंदविला आणि ६३-२१ अशा गुणांनी फ्रेम जिंकली. चौथ्या फ्रेममध्येही अचूक खेळ करून ७३-५४ गुणांनी फ्रेम जिंकून सामन्यामध्ये २-२ अशी बरोबरी साधली. अंतिम आणि निर्णायक फ्रेममध्ये रोहीत याने आपली चिवट झुंझ कायम ठेवत ५८-४४ अशा गुणांसह फ्रेमसह सामन्यामध्ये विजय मिळवला. याआधी झालेल्या उपांत्य फेरीत रोहीत रावत याने सिद्धार्थ टेंभे याचा ७९-००, ३५-२४, २३-५७, ६९(४७)-४४ असा तर, कृष्णराज अरकोट याने अमरदीप घोडके याचा ६२-६८, ६१-४३, ३०-६२, ६५-५५, ६०-४३ असा पराभव केला.

## मुंबईकर जोरात, प्रतिस्पर्धी कोमात!

**नवी दिल्ली :** मुंबईने रणजी करंडक स्पर्धेत महाराष्ट्र संघाविरुद्ध मजबूत पकड घेतली आहे. १७ वर्षीय फलंदाज आयुष म्हात्रेने संघाला मजबूत स्थितीत आणले आणि त्यानंतर आज श्रेयस अय्यरने शतक झळकावले. अय्यरने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये तीन वर्षानंतर पहिले शतक झळकावले. महाराष्ट्राचा पहिला डाव १२६ धावांवर गुंडाळल्यानंतर मुंबईने दुसऱ्या दिवसाच्या लंच ब्रेकपर्यंत ४ बाद ३३५ धावा करून २०९ धावांची आघाडी घेतली आहे. कर्णधार अजिंक्य रहाणे बाद झाल्यानंतर श्रेयस फलंदाजीला आला आणि त्याने आयुष म्हात्रेसह द्विशतकी भागीदारी करून संघाला मजबूत स्थितीत आणले. आयुषने २३२ चेंडूंत २२ चौकार व ४ षटकारांसह १७६ धावांवर बाद झाला. भारताच्या कसोटी संघातून श्रेयस अय्यरला वगळले गेले आहे आणि २९ वर्षीय खेळाडूने नोव्हेंबर २०२१ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध शेवटचे प्रथम श्रेणी क्रिकेटमधील शतक झळकावले होते. आजच्या शतकी खेळीने अय्यरने प्रथम श्रेणी क्रिकेटमधील ६००० धावा पूर्ण केल्या. दुलीप ट्रॉफीत अय्यरने सहा इनिंग्जमध्ये १५४ धावा केल्या होत्या.



## क्रिकेटमध्ये “स्पार्टन टीमला विजेतेपद

**पुणे :** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री आणि कोथरूड चे आमदार चंद्रकांत दादा पाटील यांच्या वतीने कोथरूड प्रीमिअर लीग क्रिकेट व फुटबॉल चे आयोजन करण्यात आले होते. ५६ क्रिकेट टीम व ४५ फुटबॉल टीम ने सहभाग नोंदविला.


क्रिकेट मध्ये “स्पार्टन टीम विजयी झाली तर *“प्रदीप जोरी टीम ने उपविजेते होण्याचा मान मिळविला. विश्वेश ऊटांगडे मैन ऑफ टूर्नामेंट”

फुटबॉल मधे पन्ना बॉईज विजयी ठरले तर इमोर्टल्स टीम उपविजेता. निखिल पडवळ मैन ऑफ द टूर्नामेंट पुरस्कार जींकला. ह्या स्पर्धेचे संयोजक प्रतीक मंजुश्री संदीप खर्डेकर (अध्यक्ष,क्रीडा आघाडी यूवा मोर्चा,पुणे शहर) यांनी केले.

कोथरुड प्रीमियर लीग चे उदघाटन चंद्रकांत पाटील यांनी केले व या वेळी “युवा मोर्चा शहर अध्यक्ष : करण मिसाळ, मुख्य प्रदेश, संदीप खर्डेकर , प्रदेश प्रवक्ते कुणाल टिळक, पुणे शहर सरचिटणीस पुनीत जोशी , कोथरुड अध्यक्ष संदीप बुटला, कोथरुड सरचिटणीस गिरीश खत्री, माजी नगरसेवक दीपक पोटे, माजी नगरसेवक मंजुश्री खर्डेकर , महिला आघाडी उपाध्यक्ष कल्याणी खर्डेकर, हिंदू जिमखाना चे संस्थापक आशिष कांटे उपस्थित होते .

## मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघाचा पहिला विजय

**पुणे :** मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी वाकड यांच्या वतीने आयोजित मॅव्हेरिक्स आंतर क्लब क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत आरिब मलिक २० धावा व ३-१२) याने केलेल्या



अष्टपैलू खेळीच्या जोरावर मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघाने मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाचा ५ धावांनी पराभव करून पहिला विजय मिळवला. ३० वायसीए स्पार्क क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघाने पहिल्यांदा खेळताना २० षटकात ७ बाद १४२ धावा केल्या. यात अवनीश मोकाशी २८, अर्णव कट्टी २२, आरिब मलिक २०, गार्गी कुलकर्णी नाबाद १४ यांनी धावा केल्या. मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाकडून विहान वानखेडे (३-२३), पांशुल साठे (१-२२), क्रीदय झाला (१-२३) यांनी सुरेख गोलंदाजी केली. या आव्हानाचा पाठलाग करताना मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघ २० षटकात सर्वबाद १३७ धावावर संपुष्टात आला. यात पार्थ गवारी ३२, पांशुल साठे ३२, आयुष जमदाडे ११ यांनी दिलेली लढत अपुरी ठरली.मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघाकडून आरिब मलिक (३-१२), अर्जुन तेलंग (२-१४), आर्यन ताम्हाणे (१-१०) यांनी अचूक गोलंदाजी करत मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाला १३७ धावांवर रोखले व संघाला ५ धावांनी विजय मिळवून दिला.

# महाराणा प्रताप क्रीडा संघास कबड्डी मॅटचे लोकार्पण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कसबा विधानसभा मतदार संघाचे आ. रविंद्र धंगेकर यांनी त्यांच्या विकासनिधी मधून पुणे शहरातील महाराणा प्रताप क्रीडा संघाच्या वतीने गेली अनेक वर्षे सुरु असलेल्या कबड्डी खेळाचा नवीन पद्धतीने खेळाचा विकास होणे करीता आवश्यक अशा कबड्डी मॅट दिले.

याचा लोकार्पण सोहळयास अर्जुन पुरस्कार विजेता शांताराम जाधव, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन चे कार्याध्यक्ष दत्तात्रय कळमकर, सहकार्यवाह राजेश ढमढेरे, कामगार सेना-शिवसेना शिंदे गटाचे अध्यक्ष सुधीर कुरुमकर, पुणे जिल्हा हौशी शरीरसौष्ठव संघटनेचे - अध्यक्ष राजेंद्र नांगरे यांच्या उपस्थितीत पं नेहरू स्टेडियम येथील कबड्डीच्या मैदानावर पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तानाजी शिंदे, आभार प्रदर्शन संजय पासलकर यांनी केले. या कार्यक्रमाच संयोजन महाराणा प्रताप क्रीडा संघाचे अध्यक्ष व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन-चे सदस्य राजाभाऊ पासलकर यांनी केले

## वरिष्ठ महिला क्रिकेट संघात ईश्वरी, तेजस्विनी!

**नाशिक :** येथील ईश्वरी सावकार व तेजस्विनी बाटवाल या दोन क्रिकेटपटूंची वरिष्ठ महिला महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) तर्फे आयोजित कोलकता येथील वरिष्ठ महिला टी- ट्वेंटी स्पर्धेत या दोन्ही महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ईश्वरी, तेजस्विनीने यापूर्वीदेखील महाराष्ट्रातर्फे वरिष्ठ व एकोणीस वर्षांखालील तसेच विविध वयोगटात महिला क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. सलामीची फलंदाज ईश्वरी सावकारने १९ वर्षाखालील महाराष्ट्राचे कर्णधारपद भूषविले आहे. २०२३ मध्ये झालेल्या महिलांच्या २३ वर्षांखालील वयोगटात बीसीसीआयतर्फे आयोजित नॅशनल क्रिकेट अकादमीच्या राष्ट्रीय पातळीवरील हाय परफॉर्मन्स शिबिरासाठी तिची निवड झाली होती. याआधीच्या दोन हंगामात शिबिरात तिची निवड झालेली होती. ऑक्टोबर २०२२ मध्ये महिला टी-ट्वेंटी सामन्यांच्या चॅलेंजर ट्रॉफीसाठी १९ वर्षांखालील इंडिया अ संघाच्या उपकर्णधारपदी निवड झाली होती. या स्पर्धेत श्रीलंका, वेस्ट इंडिज संघाविरुद्ध सामने झाले होते.

### सुभाष बापट स्मृती चषक टेबल टेनिस स्पर्धा

# शौरेन सोमण याला दुहेरी मुकुट; दिया, मोहिल, सई यांनाही अजिंक्यपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** शौरेन सोमण याने १७ वर्षाखालील गटापाठोपाठ पंधरा वर्षाखालील गटात आहे विजेतेपद पटकावले आणि सुभाष बापट स्मृती चषक जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेत दुहेरी धमाका केला. या स्पर्धेतील अन्य गटात दिया शिंदे, मोहिल ठाकूर, सई कुलकर्णी यांनी अजिंक्यपद मिळविले.

ही स्पर्धा डेक्कन जिमखाना क्लब येथे रेडियंट स्पोर्ट्स अकादमी यांनी पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या




मान्यतेने आयोजित केली असून त्यास सुकृत इलेक्ट्रिक कंपनी यांचे आर्थिक सहकार्य मिळाले आहे. या स्पर्धेतील प्रौढांच्या एकेरीत संतोष वाकराडकर यांनी एकेरीत तर ओंकार जोग व कृपाल देशपांडे यांनी दुहेरीत विजेतेपद मिळविले.

मुलांच्या पंधरा वर्षाखालील गटाच्या अंतिम फेरीत सोमण याने तृतीय मानांकित खेळाडू श्रेयस माणकेश्वर याचा ७-११,११-६,




११-४,११-७ असा पराभव करीत आपले अव्वल मानांकन सार्थ ठरविले. त्याने याआधी या स्पर्धेतील सतरा वर्षाखालील गटातही अजिंक्यपद पटकावले होते. सोमण याने सांगली येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या राज्य मानांकन स्पर्धेमध्ये दोन



गटात विजेतेपद पटकाविले होते.

मुलांच्या १३ वर्षाखालील गटात ठाकूर याने तृतीय मानांकित खेळाडू शारंग गवळी याच्यावर मात करीत विजेतेपदावर मोहोर नोंदवली आणि आपले अग्रमानांकन सार्थ ठरविले. चुरशीने झालेला हा सामना त्याने



८-११,३-११,११-७,११-५,११-९ असा जिंकला. उपांत्य फेरीत गवळी याने द्वितीय मानांकित खेळाडू धैर्य शहा याच्यावर आश्चर्यजनक विजय मिळविला होता.

मुलींच्या पंधरा वर्षाखालील गटात कुलकर्णी या द्वितीय मानांकित खेळाडूने चौथी मानांकित खेळाडू वेदांगी जुमडे हिच्यावर रोमहर्षक विजय नोंदविला. हा सामना तिने ९-११, ४-११,११-३,११-८,११-६ असा जिंकला. पहिल्या दोन गेम्स गमावल्यानंतर तिने सामन्यावर नियंत्रण मिळवले आणि शेवटपर्यंत हे नियंत्रण कायम ठेवीत विजेतेपद नोंदविले. उपांत्य फेरीत वेदांगी हिने अग्रमानांकित खेळाडू आद्या गवात्रे या अग्रमानांकित खेळाडूला पराभवाचा धक्का दिला होता. मुलींच्या १३ वर्षाखालील गटात शिंदे या चौथ्या मानांकित खेळाडूने अंतिम फेरीत द्वितीय मानांकित खेळाडू श्रेया कोठारी हिच्यावर ११-६,१०-१२,११-५,११-५ अशी मात केली. प्रौढांच्या एकेरीत वाकराडकर यांनी अंतिम लढतीत तृतीय मानांकित खेळाडू दीपक कदम यांना ११-१३,११-५,१३-११,१३-११असे पराभूत केले. वाकराडकर यांना अग्रमानांकन मिळाले होते. त्या दर्जास त्यांनी साजेसा खेळ केला. दुहेरीत मात्र वाकराडकर यांना कदम यांच्या साथीत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. अंतिम सामन्यात ओंकार जोग व कृपाल देशपांडे या जोडीने त्यांचा ११-९, ३-११,११-९,११-७ असा पराभव केला.